Skill India
कौशल भारत - कुशल भारत

# अद्वैत

सन २०१८-१९

रयत शिक्षण संस्थेचे

# दहिवडी कॉलेज दहिवडी

ता.माण, जि.सातारा फोन : (०२१६५) २२०२३१

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर संलग्न
नॅक तृतीय मूल्यांकन : A ग्रेड (CGPA 3.25)

**ME TOO**




Scanned with CamScanner

## ।। कर्मवीर जयंती - रयत शताब्दी ।।




कर्मवीर जयंती प्रसंगी कर्मवीर अण्णा व सौ.वहिनी यांच्या प्रतिमेस पुष्पअर्पण करताना प्राचार्य डॉ.बी.टी.जाधव व उपस्थित प्राध्यापक



शताब्दी महोत्सव सहविचार सभेत मार्गदर्शन करताना मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मा.श्री.प्रभाकर देशमुख, आमदार जयकुमार गोरे, नगराध्यक्षा सौ.साधनाताई गुंडगे, प्राचार्य बी.टी.जाधव



शताब्दी महोत्सव मिरवणुकीत सहभागी प्राचार्य बी.टी.जाधव व मा.श्री.प्रभाकर देशमुख व इतर मान्यवर



शताब्दी महोत्सव मिरवणुकीत सहभागी विद्यार्थी



शताब्दी महोत्सवी चित्ररथात महापुरूषांच्या वेशभूषेतील सहभागी विद्यार्थी



शताब्दी महोत्सव मिरवणूक प्रसंगी नृत्य सादर करताना महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी




१३१ वी कर्मवीर जयंती सोहळा व संस्था शताब्दी महोत्सव आयोजन समारंभ प्रसंगी आमदार जयकुमार गोरे, प्राचार्य डॉ.बी.टी.जाधव व मान्यवर



शतशः ऋणी ; शताब्दी महोत्सवानिमित्त महाविद्यालयाला तीन गुंठे जमीन दान देणारे दाम्पत्य सौ.आशालता आणि श्री.शिवाजी पाटील, विटा

Scanned with CamScanner

स्थापना : १९६५



रयत शिक्षण संस्थेचे

# दहिवडी कॉलेज दहिवडी


**NAAC GRADE : A + (CGPA 3.25)**

ता.माण, जि.सातारा

फोन : (०२१६५) २२०२३१

Email : dcdprincipal@gmail.com


# अद्वैत

**वार्षिक नियतकालिक २०१८-२०१९**


अध्यक्ष व प्रकाशक

**प्राचार्य, डॉ.बी.टी.जाधव**

प्रमुख संपादक

**डॉ.देवानंद सोनटक्के**



Scanned with CamScanner

स्थापना : १९६५

रयत शिक्षण संस्थेचे

# दहिवडी कॉलेज दहिवडी

# अद्वैत

## वार्षिक नियतकालिक २०१८-२०१९

### संपादक मंडळ

✦ **अध्यक्ष व प्रकाशक**

**प्राचार्य, डॉ. बी. टी. जाधव**

✦ **प्रमुख संपादक**

**डॉ. देवानंद सोनटक्के**

✦ **विभागीय संपादक**

| | | |
|---|---|---|
| मराठी विभाग | - | डॉ.सौ.एस.बी.वाघमोडे |
| हिंदी विभाग | - | डॉ.के.एम.पवार |
| इंग्रजी विभाग | - | डॉ.एन.डी.लोखंडे |
| फोटो विभाग | - | प्रा.एम.बी.शिकलगार |
| अहवाल विभाग | - | प्रा.पी.के.तोणे |
| कलादालन | - | प्रा.ए.एच.कोळेकर |

**या अंकात प्रसिध्द झालेल्या लेखातील मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. मजकुराची जबाबदारी पूर्णतः संबंधित लेखकाची.**

अक्षरजुळणी - टाईप इनोव्हेटर्स, १९५, सदाशिव पेठ, वीर सावरकर मार्ग, सातारा.
दूरध्वनी ०२१६२-२३४३७२
मुद्रक - प्रिन्ट ओम ऑफसेट, २६९ ब/२, दौलतनगर, करंजे, सातारा.
दूरध्वनी ०२१६२-२३४०४९/२३२०८२

✦ रयत शिक्षण संस्थेचे, ✦

# दहिवडी कॉलेज दहिवडी

## महाविद्यालय विकास समिती - महाविद्यालयाचे आधारस्तंभ

१) चेअरमन - डॉ.अनिल पाटील, चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा
२) सभासद - डॉ.भाऊसाहेब कराळे, सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा
३) सभासद - डॉ.बी.एस.बलवंत, प्राचार्य नियुक्त प्रतिनिधी
४) सभासद - डॉ.व्ही.पी.गायकवाड, प्राध्यापक प्रतिनिधी
५) सभासद - प्रा.के.एस.शिंदे, प्राध्यापक प्रतिनिधी
६) सभासद - डॉ.सौ.एस.बी.वाघमोडे, प्राध्यापक प्रतिनिधी
७) सभासद - श्री.एम.डी.कांबळे, शिक्षकेतर प्रतिनिधी
८) सभासद - प्रा.एन.डी.पाटील, शिक्षण विभाग प्रतिनिधी
९) सभासद - श्री.सुनिल जाधव, उद्योजक विभाग प्रतिनिधी
१०) सभासद - श्रीमती चेतना सिन्हा, संशोधन विभाग प्रतिनिधी
११) सभासद - श्री.प्रभाकर देशमुख, समाजसेवा विभाग प्रतिनिधी
१२) सभासद - डॉ.अनिल दडस, समन्वयक, आय.क्यू.ए.सी. विभाग
१३) सभासद - डॉ.बी.टी.जाधव, चेअरमन, महाविद्यालय विद्यार्थी परिषद
१४) सभासद - , सचिव, महाविद्यालय विद्यार्थी परिषद
१५) सचिव - डॉ.बी.टी.जाधव, प्राचार्य, दहिवडी कॉलेज दहिवडी


**'अद्वैत' या वार्षिक नियतकालिकेच्या स्वामित्व व इतर बाबी विषयी निवेदन**

**फॉर्म ४ नियम ८अ नुसार**

| | | |
|---|---|---|
| प्रकाशन स्थळ | ....... | दहिवडी कॉलेज दहिवडी, फोन नं. २२०२३१ |
| नियतकाल | ....... | वार्षिक |
| प्रकाशकाचे नाव | ....... | प्राचार्य डॉ.बी.टी.जाधव |
| राष्ट्रीयत्व | ....... | भारतीय |
| पत्ता | ....... | दहिवडी कॉलेज दहिवडी |
| संपादकाचे नाव | ....... | डॉ.देवानंद सोनटक्के |
| राष्ट्रीयत्व | ....... | भारतीय |
| पत्ता | ....... | दहिवडी कॉलेज दहिवडी |
| मालकी | ....... | दहिवडी कॉलेज दहिवडी |
| मुद्रकाचे नाव | ....... | संदेश शहा |
| राष्ट्रीयत्व | ....... | भारतीय |
| पत्ता | ....... | 'प्रिंट ओम ऑफसेट', २६९ ब/२, सातारा. |
| अक्षररचना | ....... | प्रशांत गुजर |
| राष्ट्रीयत्व | ....... | भारतीय |
| पत्ता | ....... | 'टाईप इनोव्हेटर्स' १९५, सदाशिव पेठ, सातारा. |

*मी प्राचार्य डॉ.बी.टी.जाधव असे जाहीर करतो, की, वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरा आहे.*


Scanned with CamScanner

# महाविद्यालयाचे अंतरंग

एम.एस्सी. संशोधन केंद्र

योगा कोर्स

ग्रामीण पत्रकारिता प्रमाणपत्र

Incubation Center उभारणीकडे वाटचाल

पुराणवस्तू संग्रहालय

यु.जी.सी./B.Voc. अनुदानित कोर्स

टॅली कोर्स

टुरिझम कोर्स

अंशकालीन कोर्स

व्यक्तिमत्त्व विकास कोर्स

माती व पाणी परीक्षण कोर्स

बायो-टेक्नॉलॉजी

विज्ञान विभाग अद्ययावत प्रयोगशाळा

संशोधनपर कार्यशाळा - चर्चासत्रे

तज्ञ प्राध्यापक

१५ प्राध्यापक विद्या-वाचस्पती

एन.एस.एस. विभाग

सुसज्ज इमारती व सुंदर परिसर

एन. सी.सी. विभाग

वातानुकुलित सुसज्ज ग्रंथालय

सुसज्ज बास्केटबॉल मैदान

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणारा सांस्कृतिक विभाग

उद्योजकता विकास केंद्र

३१ अल्पकालीन कोर्सेस

अद्ययावत संगणक प्रशिक्षण केंद्र

विद्यार्थ्यांसाठी एन. आर. सी. सेंटर

संशोधन महोत्सवाचे आयोजन

१४ संशोधन पत्रके

एम.एस्सी. केमिस्ट्री

युवा महोत्सवात यश

कमवा व शिका योजना

राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेत सहभाग

संशोधन अविष्कार आतर-विद्यापीठ स्पर्धेत यश

प्लेसमेंट सेल

मायक्रो-बायोलॉजी विषय

इनडोअर स्पोर्ट कॉम्प्लेक्स

पोलीस भरतिपूर्व प्रशिक्षण केंद्र

पीएच.डी. संशोधक विद्यार्थी

जिल्हा स्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत यश

कर्मवीर क्रीडा प्रबोधिनी

विद्यार्थी पेटंट फाईल

इंटरझोनल खो-खो मध्ये सहभाभ

वातानुकुलित स्पर्धा परीक्षा केंद्र

निसर्गरम्य परिसर

कॉम्प्युटर सायन्स विषय

५२ शोधनिबंध प्रसिद्ध

कौशल्य विकासाचे १५ अभ्यासक्रम



Scanned with CamScanner

# पद्मभूषण
# डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील

संस्थापक, रयत शिक्षण संस्था, सातारा

निज देहाचे झिजवून चंदन
तुम्ही वेचिता येथे कण कण ।
आणि फुलविले हसरे नंदन
स्मृतीस तुमच्या शतशः वंदन ।।



Scanned with CamScanner

# अद्वैत

|| आमची स्फूर्तिस्थाने ||



**मा.ना.शरदरावजी पवार**
अध्यक्ष, रयत शिक्षण संस्था, सातारा



**मा.डॉ.अनिल पाटील**
चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा



**मा.डॉ.एन.डी.पाटील**
सदस्य, मॅनेजिंग कौन्सिल
रयत शिक्षण संस्था, सातारा

रयत शिक्षण संस्थेचे
# दहिवडी कॉलेज दहिवडी

अद्वैत




## महाविद्यालयाचे कृतिशील प्रशासक

## मा.प्राचार्य डॉ.बी.टी.जाधव

## ।। महाविद्यालयाचे आधारस्तंभ : महाविद्यालय विकास समिती ।।



**मा.डॉ.अनिल पाटील**
चेअरमन,रयत शिक्षण संस्था सातारा



**मा.प्रा.डॉ.एन.डी.पाटील**
सभासद,महाविद्यालय विकास समिती
(शिक्षण विभाग प्रतिनिधी)



**मा.डॉ.भाऊसाहेब कराळे**
सचिव,रयत शिक्षण संस्था सातारा



**प्राचार्य डॉ.बी.टी.जाधव**
अध्यक्ष,महाविद्यालय विकास समिती



**श्री.सुनिल जाधव**
सभासद,महाविद्यालय विकास समिती
(उद्योजक विभाग प्रतिनिधी)



**श्रीमती चेतना सिन्हा**
सभासद,महाविद्यालय विकास समिती
(संशोधक विभाग प्रतिनिधी)



**श्री.प्रभाकर देशमुख**
सभासद,महाविद्यालय विकास समिती
(समाजसेवा विभाग प्रतिनिधी)



**डॉ.बी.एस.बलवंत**
प्राचार्य नियुक्त प्रतिनिधी
महाविद्यालय विकास समिती



**प्रा.डॉ.एस.बी.वाघमोडे**
प्राध्यापक प्रतिनिधी
महाविद्यालय विकास समिती



**प्रा.के.एस.शिंदे**
प्राध्यापक प्रतिनिधी
महाविद्यालय विकास समिती



**डॉ.व्ही.पी.गायकवाड**
प्राध्यापक प्रतिनिधी
महाविद्यालय विकास समिती



**डॉ.अनिल दडस**
समन्वयक,आय.क्यू.ए.सी.विभाग व
सभासद महाविद्यालय विकास समिती



**श्री.एम.डी.कांबळे**
शिक्षकेतर सेवक प्रतिनिधी
महाविद्यालय विकास समिती

सभासद,महाविद्यालय विकास समिती
व सचिव,महाविद्यालय विद्यार्थी परिषद

Scanned with CamScanner

रयत शिक्षण संस्थेचे
# दहिवडी कॉलेज दहिवडी

## ।। महाविद्यालयीन उपक्रम ।।



महाविद्यालयाच्या DCD Times चे प्रकाशन करताना
जेष्ठ लेखक मा.श्री.राजन खान सोबत प्राचार्य, उपप्राचार्य, संपादक



वाङ्मय मंडळाद्वारा आयोजित कथाकथन व कथा लेखन
कार्यशाळेत मार्गदर्शन करताना प्रा.रवींद्र कोकरे



शिक्षक पालक संघाच्या बैठकीत मार्गदर्शन करताना
प्राचार्य डॉ.बी.टी.जाधव व उपप्राचार्य डॉ.बी.एस.बलवंत



कॉमर्स विभाग आयोजित ट्रेड फेअर २०१९ चे
उद्घाटन करताना मा. नंदकुमार खोत-अध्यक्ष माजी विद्यार्थी संघ



पाच दिवसीय रयत इन्स्पायर कॅम्प मध्ये
मार्गदर्शन करताना प्रमुख अतिथी



रयत शताब्दी महोत्सवनिमित्त जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा उद्घाटन
प्रसंगी बोलताना प्रमुख पाहुणे मा.प्राचार्य डॉ.अशोक भोईटे



सायन्स दिनानिमित्त रिसर्च पोस्टर उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयाचे
प्राचार्य डॉ.बी.टी.जाधव, उपप्राचार्य डॉ.बी.एस.बलवंत व इतर मान्यवर



रयत शताब्दी महोत्सव निमित्त 'संभाषण कला' या कार्यशाळेच्या
उद्घाटन प्रसंगी मा.डॉ.शिवलिंग मेनकुदळे व व्यासपीठावर इतर मान्यवर

Scanned with CamScanner

## प्राचार्यांचे मनोगत



### ध्यास कौशल्य विकासाचा, उत्कृष्टतेचा...:

नमस्कार ! महाविद्यालयाच्या वार्षिक कामगिरीचा आरसा असलेले 'अद्वैत' नियतकलिक आपल्या हाती देताना मला आनंद होत आहे. हे वर्ष दीनदलितांच्या झोपडीत ज्ञानाचा दिवा पोहोचवणाऱ्या कर्मवीर अण्णांच्या १३१ च्या जयंतीचे आणि 'रयत शिक्षण संस्थेच्या' शताब्दीचे वर्ष आहे. त्या निमित्ताने विद्यार्थी, पालक, शिक्षक, हितचिंतक, विविध संस्था आणि सेवक यांच्या सहकार्याने शताब्दी उपक्रम राबवण्यात आले. त्याचा प्रारंभ दि. ५ ऑक्टो. रोजी भव्य शताब्दी रॅलीने झाला. दुसऱ्या दिवशी माण-खटावचे आमदार मा. जयकुमार गोरे, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मा. प्रभाकर देशमुख व मा. वाघोजीराव पोळ, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष मा. नंदकुमार खोत व इतर सदस्य यांच्या प्रमुख उपस्थितीत माजी विद्यार्थी मेळावा घेण्यात आला.

या निमित्ताने वर्षभर व्याख्याने, विज्ञान प्रदर्शने, क्रीडा स्पर्धा, मॅरेथान दौड, आर्ट सर्कल, क्रीडा महोत्सव, विज्ञान पोस्टर प्रदर्शने, कौशल्य विकास, वक्तृत्व, कथालेखन, निबंध स्पर्धा; परिसरातील शेतकऱ्यांसाठी माती व पाणी परीक्षण, दुर्मिळ वनस्पती व बियांचे संकलन, विविध कार्यशाळा तसेच शेतकरी मार्गदर्शन मेळावा - असे उपक्रम आयोजित करण्यात आले. आंतरराष्ट्रीय कीर्तीचे उद्योजक मा. रामदास माने यांचे प्रेरक व्याख्यान, तसेच कर्मवीर अण्णांचा दहिवडी शाळेतील प्रवेश दिनही समारंभपूर्वक साजरा करण्यात आला. वेगवेगळ्या विषयावर राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय कार्यशाळा-परिषदा यांचे आयोजन करण्यात आले.

रयत शिक्षण संस्था, महाराष्ट्र स्कील डेव्हलपमेंट सोसायटी, पंतप्रधान कौशल्य विकास योजना, PMKVY, गांधी रिसर्च फौंडेशन, फली, बी.व्ही.जी. इंडिया, जैन इरिगेशन अशा विविध संस्था व योजनाच्या माध्यमातून या वर्षी २१ कौशल्य विकास कोर्सेस; तर युजीसीच्या एक कोटीच्या अनुदानातून 'बी. व्होक. ॲग्रीकल्चर' या पदवी अभ्यासक्रमाला प्रारंभ करण्यात आला. मिनिस्ट्री ऑफ मायक्रोस्मॉल, मीडियम इंटरप्रायझेस, भारत सरकार अंतर्गत ASPIRE-LBI च्या प्रस्तावातून महाविद्यालयाला ४८.६९ लाख मंजूर झाले. या वर्षी नव्या पायाभूत सुविधांची उभारणीही करण्यात येऊन बी. व्होक. साठी तीन शेड नेट, ग्रंथालयात भव्य रीडिंग रूम, प्रयोगशाळा, एन.एस.एस- एन.सी.सी साठी स्वतंत्र कक्ष, कॅन्टीन आदी बांधकाम करण्यात आले.

पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी उच्चशिक्षण, स्पर्धा परीक्षा, शॉर्ट टर्म कोर्सेस, कौशल्य विकास अभ्यासक्रम इत्यादी विषयांवर 'उद्‌बोधन वर्ग' घेण्यात आले. गेल्या वर्षापासून सुरु असलेल्या 'रिसर्च पोस्टर प्रेझेन्टेशन' या नावीन्यपूर्ण उपक्रमांतर्गत स्वातंत्र्य दिन, शिक्षक दिन, कर्मवीर जयंती, प्रजासत्ताक दिन आणि विज्ञान दिन अशा निमित्ताने सुमारे ५४५ विद्यार्थ्यांचे पोस्टर्स सादर झाले. त्यातील सर्वोत्कृष्ट पोस्टर्सना पारितोषिके देण्यात आली.

Scanned with CamScanner

गुणवत्ता सुधार कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी वादविवाद, सुंदर हस्ताक्षर कार्यशाळा, अंतर्गत परीक्षा मुलाखत कौशल्य, जीएसटी, उच्चशिक्षणाचाप्रवास, समाजमाध्यमे आणि आरोग्य अशा विषयांवर वर्षभर मार्गदर्शन करण्यात आले; तर प्लेसमेंट सेल तर्फे या वर्षी टीसीएसमध्ये २०, तर बॉश कंपनीत ११, वेट मॅनकाइंड कंपनीत १, इंडियन आर्मीत ११, आरती ड्रग्ज मध्ये ७, लुपिन फार्मात १ आणि महाराष्ट्र पोलीस मध्ये ५ विद्यार्थ्यांची; तसेच क्रीडा विभागाच्या ६ विद्यार्थ्यांची राष्ट्रीय स्तरावर निवड झाली. कनिष्ठ विभागानेही बॅडमिंटन, टेक्नीक्वाइट, वुशू, सेपक टकरा, थ्रोबॉल अशा विविध स्पर्धांत उल्लेखनीय यश मिळवले. कनिष्ठ विभागाने वार्षिक निकालात कलाशाखा (९१.०३%), वाणिज्य (१००%), विज्ञान (९९.७४%) आणि व्होकेशनल (७८.२६%) अशी कामगिरी बजावली.

शिवाजी विद्यापीठाच्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवात लोककला प्रकारात सांस्कृतिक विभागाच्या चमूला व्दितीय क्रमांक मिळाला आणि मध्यवर्ती युवा महोत्सवासाठी निवड झाली. जिल्हा युवा महोत्सव पुसेगाव येथे लोकनृत्य प्रकारात प्रथम, तर सुगम गायनमध्ये तृतीय क्रमांक मिळवला. माणदेशी तरंग वाहिनी सोबत असलेल्या सामंजस्य करारांतर्गत एकदिवसीय'कथाकथन कार्यशाळा' आयोजित करण्यात आली. मराठी राजभाषा दिन निमित्ताने निरक्षर रेडीओ जॉकी केराबाई सरगर यांचे भन्नाट व्याख्यान, वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाला अभिनेता संतोष पाटील यांची उपस्थिती, प्रसिद्ध मराठी लेखक राजन खान यांचे प्राध्यापक प्रबोधिनीतील व्याख्यान - अशी सांस्कृतिक व वैचारिक मेजवानीही सर्वांना मिळाली. पाच दिवसांच्या रयत इन्स्पायर कॅम्पचेही यशस्वी आयोजन करण्यात आले. मराठी विभागाच्या वतीने कन्सल्टसी अंतर्गत प. म. शिंदे कन्या विद्यालयात 'व्याकरण सल्लागर' हा उपक्रम राबवण्यात आला, त्याचा लाभ ८ ते १०वीच्या वर्गातील ६७५ विद्यार्थ्यांना झाला.

आमचा विद्यार्थी प्रशांत जाधव याने 'मेकॅनिकल लीड पेन्सिल' या विषयावर सादर केलेल्या पेटंटसाठी महाविद्यालयाच्या रिसर्च कॉर्पस फंडातून १०,००० रुपयांचा, तर प्राध्यापकांच्या लघु संशोधनाला ४०,००० रुपयांचा संशोधन निधी देण्यात आला. शिवाय अग्रणी महाविद्यालय अंतर्गत विविध विभागांच्या वतीने सुमारे २३ उपक्रम-कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या.

रयत शिक्षण संस्थेतर्फे राबवण्यात आलेल्या 'इनोव्हेटिव्ह महाविद्यालय' गुणांकनात महाविद्यालयाला प्रथम क्रमांक (८९% गुण) मिळाला. तसेच रयत इन्स्पायर प्रकल्पांतर्गत महाविद्यालयाच्या ९ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

महाविद्यालयात नव्याने सुरू झालेल्या बी.व्होक. (ॲग्रीकल्चर) या पदवी अभ्यासक्रमाच्या प्रात्यक्षिकासाठी रयत शिक्षण संस्थेच्या देवापूर येथील ६ एकर जमीन महाविद्यालयास दिली या बद्दल देवापूर विद्यालय आणि रयत शिक्षण संस्थेचे मनापासून आभार.

विशेष म्हणजे विटा येथील दानशूर दाम्पत्य सौ.आशालता आणि श्री.शिवाजी पाटील, रा.विटा यांनी महाविद्यालयास तीन गुंठे जमीन दान दिली व त्यातील पाण्याच्या सोयीमुळे महाविद्यालयाची तहान भागली, याबद्दल हे महाविद्यालय आजन्म ऋणी राहील !

या कामी सर्व विद्यार्थी, सहकारी, रयत प्रेमी व नागरिक यांचे सहकार्य लाभले त्यांचे मन:पूर्वक आभार.
जय कर्मवीर !

डॉ. बी. टी. जाधव
प्राचार्य

Scanned with CamScanner

संपादकीय



## #Me To : दाबलेल्या आवाजामागची बोलकी वेदना

हॉलीवूड अभिनेत्री अलिसा मिलानो हिने ट्विटर वर सुरू केलेल्या #Me To या मोहिमेने या वर्षी भारतातही खूप खळबळ माजवली. तनुश्री दत्ता या अभिनेत्रीने सप्टेंबर, २०१८ ला प्रसिद्ध अभिनेता नाना पाटेकर यांच्यावर लैंगिक छळाचा आरोप केला, पुढे अभिनेता आलोकनाथ आणि बॉलिवूडमधील इतरांवरील आरोपांमुळे सारा समाजच हादरला. या दुनियेचा हा चेहरा इतका विद्रूप होता की, चित्रपट निर्मात्या विनिता नंदाने अलोकनाथ यांच्यावर केलेला आरोप हा १९ वर्षापूर्वीचा होता; म्हणजे इतकी वर्षे माध्यमांसमोर ती खरे सांगू शकली नव्हती. इतकेच नव्हे तर भारताचे परराष्ट्र मंत्री व तत्कालीन पत्रकार एम. जे. अकबर यांच्यावरही तुशिता पटेल या पत्रकार महिलेने हाच आरोप केला आणि त्यातून त्यांना राजीनामा द्यावा लागला. हे वादळ पुढेही घोंघावत राहिले त्यातून आरोप प्रत्यारोप होत राहिले. हे आरोप पुढे सिद्ध होतील वा न होतील; मात्र आपल्यावरील लैंगिक छळाबद्दल महिला समोर येऊन बोलू लागल्या हे जास्त महत्त्वाचे आहे आणि तेही अशा सिनेजगातले सत्य की जेथे अब्जावधी रुपयांच्या व्यवसाय आहे.

दुसरे असे की, अमेरिका किंवा भारत-देश कुठलाही असला तरी पुरुषी मानसिकता आणि लैंगिक शोषण यांचे स्वरूप दोन्हीकडे सारखे आहे हे यातून समोर आले. धार्मिक, सांस्कृतिक वा आर्थिक-सत्ता आपल्याकडे असली की तिच्या आधारे स्त्रीला गुलाम करता येते ही पुरुषी मानसिकता या घटनामधून समोर येते. भारतात शेतमजूर, वेठबिगार महिला, बांधकाम क्षेत्रे यांत तर मालकाकडून स्त्रीचे शोषण होतच होते, मात्र याविरुद्ध स्त्रिया बोलू शकत नव्हत्या. कारण एकतर ज्याच्यावर आरोप होतो त्यापेक्षा जिने आरोप केला त्या स्त्रीलाच जास्त त्रास समाजाकडून होतो. अगदी बलात्कार आणि विनयभंग याच्यासारख्या घटनातही महिला तक्रार द्यायला पुढे धजावत नसतात; त्याचे कारण घरातील माणसे, शेजारी, अगदी पोलीस स्टेशनही तिची तक्रार नोंदवून घ्यायला फारसे उत्सुक नसत. 'स्त्री क्षणाची पत्नी आणि अनंतकाळाची दासीच' आहे, असेच जणू या पुरुषप्रधान व्यवस्थेने गृहीत धरलेले असते. महाभारतापासून ते आजवर आपल्या संस्कृतीत ते दिसत आले आहे. #Me To मुळे निदान ते समोर आले. स्त्री कोणत्याही जगातील असो तिला सारख्याच अनुभवाला सामोरे जावे लागते हे यातून दिसून आले आणि स्त्रीवादी चळवळीसमोरील आव्हाने पुन्हा अधोरेखित झाली. शाळा-महाविद्यालये, सार्वजनिक वाहतूक-बस-ट्रेन; अगदी नातेवाइकांच्या घरातही नको असलेल्या नजरा आणि नको असलेला स्पर्श टाळण्यातच बाईचे आयुष्य जाते. आज प्रत्येक क्षेत्रात स्त्रिया पुढे येत असताना आपल्या पुढारलेला समाजातील हा दोष दूर करणे हे मोठे आव्हान शिक्षणव्यवस्था आणि समाज व शासनापुढचे आहे, हे नक्की. मुखपृष्ठ संकल्पनेतून आम्ही या लोकजागृतीच्या चळवळीला स्पर्श केला आहे. इतकेच !

**डॉ. देवानंद सोनटक्के**

Scanned with CamScanner



'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद' - कर्मवीर

## रयतगीत

रयतेमधूनी नव्या युगाचा माणूस आता घडतो आहे
वटवृक्षाच्या विशालतेचा मोह नभाला पडतो आहे
कर्मवीरांचे ज्ञानतीर्थ हे शक्तीपीठही ठरले आहे
शाहू-फुल्यांचे समानतेचे तत्त्व माणसी मुरले आहे
धर्म जातीच्या पादक्रांतीचे मूल्य मानवी जपतो आहे.
रयतेमधूनी नव्या युगाचा माणूस आता घडतो आहे
वटवृक्षाच्या विशालतेचा मोह नभाला पडतो आहे ।।१।।

गरिबांसाठी लेणी मोडून लक्ष्मी वहिनी झाली आई
कमवा आणि शिका मंत्र हा तरुणाईला प्रेरक होई
स्वावलंबी वृत्ती ठेऊन ज्ञानसाधना करतो आहे
वटवृक्षाच्या विशालतेचा मोह नभाला पडतो आहे ।।२।।

दिनदलितांसाठी अण्णा तुमची जिझली चंदनकाया
अनाथ जीवा सदा लाभली मातृहृदयी तुमची माया
शून्यामधल्या नव सृष्टीचा निर्मिक तो ही ठरतो आहे
वटवृक्षाच्या विशालतेचा मोह नभाला पडतो आहे ।।३।।

जीवनातील तिमीर जावा प्रबोधनाची पहाट व्हावी
इथे लाभले पंख लेवून उंच भरारी नभात घ्यावी
प्रतिभाशाली बहुजनांचा वेलू गगनी जडतो आहे
वटवृक्षाच्या विशालतेचा मोह नभाला पडतो आहे
रयतेमधूनी नव्या युगाचा माणूस आता घडतो आहे
वटवृक्षाच्या विशालतेचा मोह नभाला पडतो आहे ।।४।।

## ।। ज्ञानवंत प्राध्यापक ।।


डॉ.वी.एस.बलवंत
आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात
निबंध वाचन


डॉ.अनिल दडस
इंग्रजी ग्रंथ प्रसिद्ध


डॉ.के.एम.पवार
चर्चासत्रात साधन व्यक्ती


प्रा.ए.एच.कोळेकर
आदर्श शिक्षक पुरस्कार
(वरिष्ठ)


प्रा.बी.एन.नरळे
आदर्श शिक्षक पुरस्कार
(कनिष्ठ)


श्री.उदय कदम
आदर्श सेवक पुरस्कार


डॉ.एन.डी.लोखंडे
पीएच.डी. पदवी प्राप्त


प्रा.एम.बी.शिकलगार
आंतरराष्ट्रीय चर्चासत्र
निबंध वाचन


प्रा.के.एस.शिंदे
महावकॅथॉन पुरस्कार


डॉ.देवानंद सोनटक्के
मनोरमा आणि मसाप पुरस्कार
ग्रंथ प्रसिद्ध


प्रा.डॉ.एम.जे.लुबाळ
बेस्ट रिसर्च पेपर अवॉर्ड


प्रा.व्ही.एस.पाटोळे
आंतरराष्ट्रीय चर्चासत्रामध्ये
निबंध वाचन


प्रा.श्रीमती ए.एम.बागडे
नेट परीक्षा उत्तीर्ण


प्रा.एन.डी.दबडे
बेस्ट रिसर्च पेपर अवॉर्ड


प्रा.एन.एस.म्हेत्रे
नेट परीक्षा उत्तीर्ण


प्रा.एस.पी.दिवटे
B.Voc. च्या BOS उपसमितीवर निवड


प्रा.सी.बी.देसाई
सेट परीक्षा उत्तीर्ण


प्रा.एच.जी.पोरे
सातारा भूषण पुरस्कार प्राप्त

## ।। गुणवंत विद्यार्थी ।।


विजयकुमार वीरकर
युवा गौरव पुरस्कार


कु.मोनाली माने
रा.से.यो.राज्यस्तरीय
कॅम्पमध्ये सहभाग


प्रशांत जाधव
मेकॅनिकल लीडसाठी
पेटंट दाखल


TCS मध्ये निवड झालेले विद्यार्थी
समवेत प्राचार्य डॉ.बी.टी.जाधव

Scanned with CamScanner

## रयत शिक्षण संस्थेचे
# दहिवडी कॉलेज दहिवडी

## ।। जिमखाना विभाग ।।

### आमचा अभिमान
### यशस्वी खेळाडू : अभिनंदन


वैष्णवी सावंत
क्रॉस कंट्रीसाठी अखिल
भारतीय स्पर्धेत सहभाग


स्नेहल जगदाळे
ऑल इंडिया व्हॉलीबॉल
मुली स्पर्धेत सहभाग


प्रेरणा भोसले
ऑल इंडिया व्हॉलीबॉल मुली स्पर्धेसाठी
शिवाजी विद्यापीठ संघातून निवड


दिगंबर बाबर
ऑल इंडिया खो-खो मुले
स्पर्धेत तृतीय क्रमांक


पवन माने
ऑल इंडिया बेसबॉल
स्पर्धेत सहभाग


राहुल गोरे
ऑल इंडिया बेसबॉल
स्पर्धेत सहभाग

### सातारा झोनल बेसबॉल स्पर्धेत प्रथम व इंटर झोनल स्पर्धेत तृतीय आणि क्रिकेट झोनल स्पर्धेत तृतीय क्रमांक


काकासाहेब खताळ


सागर जाधव


शुभम निलाखे


किरण लाडे


श्रेयस खाडे


लहू पवार


जीवन जगदाळे


सुरज खाडे


शेखर पवार


उमेश निकम


आकाश खाडे


तुषार काळुखे
ॲथलेटिक्स इंटर झोनल
४०० मीटर तृतीय

### सातारा झोनल व्हॉलीबॉल मुली स्पर्धेत प्रथम इंटर झोनल स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांक


शैला काटकर


ऋतुजा मोहिते


पूनम काटकर


धनश्री सजगने


पूनम सजगणे


चैताली कुलकर्णी


अंजली कुंभार


प्रणाली देवकर


कोमल कांबळे

### ज्युनिअर कॉलेज राज्यस्तरीय खेळाडू
वर्धा येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक (इ.११ वी विज्ञान)


मेघा घाडगे


रूपाली दुदे


विद्या चोरमले


तेजल पवार

### राष्ट्रीय खेळाडू


आदिती जगदाळे ११ वी विज्ञान
शालेय राष्ट्रीय सेवक
..... स्पर्धेत कास्य पदक


देहा वाघमोडे १२ वी कॉमर्स
शालेय राष्ट्रीय रूग्बी
स्पर्धेत कास्य पदक


श्रेयश फडतरे
शालेय राष्ट्रीय बेसबॉल
स्पर्धेत रौप्य पदक


प्रताप पवार
शालेय राष्ट्रीय बेसबॉल
स्पर्धेत रौप्य पदक

Scanned with CamScanner

## || महाविद्यालयीन उपक्रम ||



One Day Teacher's Workshop on revised syllabus (CBSC Pattern) on Zoology (B.Sc. I) उद्घाटक प्रा.व्ही.वाय.देशपांडे, चेअरमन बी.ओ.एस. शि.वि.कोल्हापूर



BCA विभाग आयोजित राज्यस्तरीय DCD Quest 2019, च्या समारंभाचे उद्घाटक प्राचार्य डॉ.आर.जी.पवार यांचे स्वागत करताना प्राचार्य डॉ.बी.टी.जाधव



हिंदी विभाग आयोजित 'हिंदी दिन' समारोह प्रसंगी व्याख्याते प्रा.शिवशंकर माळी यांचे स्वागत करताना उपप्राचार्य डॉ.बी.एस.बलवंत



वाणिज्य विभाग व उद्योजकता विकास केंद्र आयोजित उद्योजकता विकास कार्यशाळा उद्घाटन प्रसंगी मा.श्री.शशिकांत कुंभार, समन्वयक महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, सातारा



भूगोल विभाग आयोजित 'ॲप्लिकेशन ऑफ रिमोट सेन्सिंग ॲन्ड जी.आय.एस.' कार्यशाळेचे उद्घाटन करताना डॉ.एस.डी.शिंदे, प्राचार्य डॉ.बी.टी.जाधव व इतर मान्यवर



वाणिज्य विभाग व उद्योजक विकास केंद्र आयोजित 'असा घडतो उद्योजक' या विषयावर व्याख्यान देताना प्रसिद्ध उद्योजक मा.रामदास माने



प्लेसमेंट सेल व उद्योजकता विकास केंद्र द्वारा आयोजित रोजगार मेळाव्यात बोलताना प्राचार्य डॉ.बी.टी.जाधव सोबत मा सचिन जाधव, संचालक जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार, सातारा



राज्यशास्त्र विभाग आयोजित मतदार जागरूकता रॅलीला हिरवा झेंडा दाखवताना प्राचार्य डॉ.बी.टी.जाधव, प्रांताधिकारी मा.श्री.दादासाहेब कांबळे व तहसीलदार श्रीमती बाई माने

Scanned with CamScanner

रयत शिक्षण संस्थेचे
# दहिवडी कॉलेज दहिवडी

## ।। राष्ट्रीय छात्र सेना ।।


कॅप्टन टी.एस.माने


अमर इंगळे
सिनीअंडर ऑफिसर


ऋतुजा मोहिते
ज्यु.अंडर ऑफिसर


अभिजित काटकर
ज्यु.अंडर ऑफिसर


शैला काटकर
बेस्ट कॅडेट


दत्तात्रय ढोंबरे
एक भारत श्रेष्ठ भारत कॅम्प, औरंगाबाद


आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योगाभ्यास करताना एन.सी.सी. चे छात्र


महाविद्यालयात वृक्षारोपण करताना मा.प्राचार्य बी.टी.जाधव, कॅप्टन टी.एस.माने व एन.सी.सी. छात्र


स्वातंत्र्य दिनानिमित्त राष्ट्रीय छात्रसेनेचे विद्यार्थी


अमर इंगळे ड्रील व फायरिंग स्पर्धेत प्रथम क्रमांकाबद्दल सत्कार


प्रजासत्ताक दिनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना मा.प्राचार्य डॉ.बी.टी.जाधव समवेत कॅप्टन टी.एस.माने



आंतरराष्ट्रीय अमंली पदार्थ सेवन विरोधी दिनानिमित्त एन.सी.सी. छात्रांची रॅली


स्वच्छता अभियान अंतर्गत स्वच्छता रॅलीत सहभागी एन.सी.सी. चे छात्र


एन.सी.सी. छात्रांसमवेत मा.प्राचार्य बी.टी.जाधव व कॅप्टन टी.एस.माने

रयत शिक्षण संस्थेचे
**दहिवडी कॉलेज दहिवडी**

## ।। राष्ट्रीय सेवा योजना उपक्रम ।।



महाविद्यालय परिसरामध्ये वृक्षारोपण करताना
मा.प्राचार्य डॉ.बी.टी.जाधव, प्राध्यापक व स्वयंसेवक



'स्वच्छ वारी! निर्मल वारी' मध्ये सहभागी कार्यक्रम
अधिकारी प्रा.के.एस.शिंदे व स्वयंसेवक



दहिवडी शहरामध्ये स्वच्छता करताना रा.से.यो. स्वयंमसेवक



राष्ट्रीय सेवा योजना उद्घाटन व शिक्षक दिन या समारंभात विचार
व्यक्त करताना मा.प्राचार्य अशोक भोईटे (के.बी.पी.कॉलेज, पंढरपूर)




मतदान जनजागृतीसाठी दहिवडी शहरातून रॅलीतील सहभागी स्वयंसेवक



आपत्ती निवारण जनजागृती अभियान प्रसंगी मान्यवर



रा.से.यो. तर्फे दिव्यांग दिनानिमित्त खाऊ वाटप करताना
मा.प्रांताधिकारी, दादासाहेब कांबळे व इतर



रा.से.यो. झांजपथक

Scanned with CamScanner

## || महाविद्यालयीन उपक्रम ||



राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृतीदिनानिमित्त
अभिवादन करताना मान्यवर



वाणिज्य विभागाचे प्रा.विजयकुमार क्षीरसागर यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त
सपत्निक सत्कार करताना प्राचार्य डॉ.बी.टी.जाधव



आर्ट सर्कल उद्घाटन समारंभ प्रसंगी मार्गदर्शन
करताना मा.प्रा.संभाजी पाटील व उपस्थित मान्यवर



कर्मवीर अण्णा शाळा प्रवेश दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाप्रसंगी
अण्णांच्या वेशभूषेतील विद्यार्थी व इतर मान्यवर



जागतिक महिला दिनानिमित्त 'माझी आई, माझ्या कॉलेजात' या उपक्रमात
मार्गदर्शन करताना माणदेशी महिला बँकच्या संचालिका मा.सौ.वनिता पिसे



जिल्हास्तरीय युवा महोत्सव 'लोककला' प्रकारात
द्वितीय क्रमांक प्राप्त संघ सादरीकरण करताना



तृतीय वर्ष विद्यार्थी शुभचिंतन समारंभ प्रसंगी मार्गदर्शन करताना
प्राचार्या डॉ.एम.व्ही.बोबडे सोबत इतर मान्यवर



मराठी राजभाषा दिनानिमित्त लोकगीते सादर करताना
रेडिओ जॉकी श्रीमती केराबाई सरगर सोबत इतर मान्यवर

## ।। राष्ट्रीय सेवा योजना : विशेष श्रमसंस्कार शिबिर - मौजे भांडवली ।।



राष्ट्रीय सेवा योजना शिबिर मौजे भांडवली
उद्घाटन प्रसंगी मा.प्राचार्य डॉ.एल.जी.जाधव



एल.बी.एस.बंधारा बांधताना स्वयंसेवक व
कार्यक्रम अधिकारी के.एस.शिंदे



अंधश्रध्दा निर्मूलन प्रात्यक्षिक सादर करताना मा.प्रशांत पोतदार



हिमोग्लोबीन व रक्तगट तपासणी शिबिर



श्रमसंस्कार शिबिर मौजे भांडवली सहभागी स्वयंसेवक



माती व पाणी परिक्षण करताना प्रा.डॉ.एस.एम.खेत्रे व सहकारी



शिबिर काळात योगासने करताना स्वयंसेवक



समारोप प्रसंगी मनोगत व्यक्त करताना
मा.कपिल जगताप मुख्याधिकारी नगर पंचायत दहिवडी

Scanned with CamScanner

## ।। वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ ।।



वार्षिक पारितोषिक वितरण समारंभामध्ये मनोगत
व्यक्त करताना मा.प्राचार्य डॉ.बी.टी.जाधव



वार्षिक पारितोषिक वितरण प्रसंगी मार्गदर्शन करताना
प्राचार्य डॉ.चंद्रकांत खिलारे, सदस्य मॅनेजिंग कौन्सिल रयत शिक्षण संस्था



वार्षिक पारितोषिक वितरण प्रसंगी मार्गदर्शन करताना
प्रमुख पाहुणे क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे



वार्षिक पारितोषिक वितरण प्रसंगी मार्गदर्शन करताना
प्रमुख पाहुणे अभिनेते श्री.संतोष पाटील



वार्षिक पारितोषिक वितरण प्रसंगी मार्गदर्शन
करताना सौ.अनुराधा देशमुख



सातारा झोनल बेसबॉल मुले प्रथम क्रमांक व
इंटर झोन तृतीय बक्षीस स्वीकारताना संघ

## ।। इतर उपक्रम ।।



वाणिज्य विभाग आयोजित ट्रेड फेअर डे मध्ये बी.व्होक.
ॲग्रीकल्चर उत्पादन विक्री स्टॉल भेट प्रसंगी मान्यवर



माणदेशी तरंग वाहिनी व वाङ्मय मंडळ आयोजित 'युवतीसाठी रोजगार कौशल्ये'
कार्यशाळेत मार्गदर्शन करताना श्री.सचिन कुंभोजे सोबत श्रीमती अंजोरी कुंभोजे

# मराठी विभाग



## 'अ' आणि 'ब'

अ.
जाहिरातीसाठी
घायलः
हरवलेल्या माणसांचा
घरात नसतो
एकही नीटसा फोटो

ब.
ज्यांचा
घरात
एकही नीटसा फोटो नसतो
अशीच माणसं
नेहमी हरवतात

- कवी नागराज मंजुळे
('उन्हाच्या कटाविरुद्ध' कवितासंग्रहातून)

विभागीय संपादक

प्रा.डॉ.सौ.सुलोचना वाघमोडे

Scanned with CamScanner

# अनुक्रमणिका


**गद्य विभाग**

| | | | |
|---|---|---|---|
| १) अरुणा ढेरे : सन्मान स्त्री लेखिकेचा !/व्यक्तिचित्र | शंकर पवार | बी.ए.भाग-२ | ११ |
| २) न झालेले उद्घाटकीय भाषण - नयनतारा सहगल/वैचारिक | कु.मोनाली अशोक माने | बी.एस्सी.भाग-३ | १३ |
| ३) कलियुग/कथा | संतोष मारुती शेळके | बी.ए.भाग-३ | १५ |
| ४) प्रवास : एका निरक्षर रेडिओ जॉकीचा/मुलाखत | कु.स्वप्नाली बाळू खिलारे | बी.ए.भाग-१ | १७ |
| ५) असा घडला दुष्काळी भागातील उद्योजक : उद्योगपती रामदास माने/व्यक्तिचित्र | कु.पूजा भिवाजी पाटोळे | बी.कॉम.भाग-३ | १९ |
| ६) शिकवताना आणि खूप काही शिकताना.../ललित | कु.तनुजा विजय कदम | बी.ए.भाग-१ | २१ |
| ७) पोरीचं शिक्शान/एकांकिका | कु.ऋतुजा शशिकांत कुंभार | बी.एस्सी.भाग-२ | २२ |
| ८) विद्यार्थ्यांची भाषिक उपयोजन क्षमता : एक अध्ययन/संशोधन | कु.निकिता अतुल सूर्यवंशी | बी.ए.भाग-१ | २३ |
| ९) शिखरशिंगणापूर परिसरातील पर्यटन स्थळे/पर्यटनविषयक | दत्तात्रय श्रीराम मोहिते | बी.ए.भाग-१ | २५ |
| १०) मनी मानसी-भाषेच्या सिध्दांतावर मात करणाऱ्या आईच्या जिद्दीची कहाणी/ग्रंथसमीक्षा | कु.मोनिका दादासो जाधव | बी.ए.भाग-१ | २७ |
| ११) विद्यार्थी कॉपी का करतात ?/संशोधन | कु.कोमल हरिश्चंद्र कदम | बी.ए.भाग-१ | २९ |
| १२) आंतरराष्ट्रीय सेफक टकरा खेळाडू : कु.अपेक्षा अनिल दडस/मुलाखत | कु.काजल चंद्रकांत दडस, कु.तनुजा विजय कदम, एकनाथ हणमंत वाघमोडे, | बी.ए.भाग-१ | ३१ |
| १३) PUBG गेमच्या विळख्यात/तंत्रज्ञानपर | कु.स्वप्नाली शिवाजी जाधव | बी.एस्सी.भाग-२ | ३३ |
| १४) विषाणूंविरुध्दचा लढा/विज्ञानविषयक | कु.स्नेहल दत्तात्रय जगताप | बी.ए.भाग-२ | ३४ |
| १५) लोकपाल की जनलोकपाल/माहितीपर | कु.प्रेरणा सूर्यकांत भोसले | बी.ए.भाग-३ | ३६ |

**पद्य विभाग**

| | | | |
|---|---|---|---|
| १) जग हवं तसं.... | कु.सुमेदा कैलास पवार | बी.कॉम.-१ | १२ |
| २) तुझ्याविना... | कु.पल्लवी चंद्रकांत चव्हाण | बी.एस्.सी.-२ | १८ |
| ३) आई | कु.तनुजा सूर्यकांत चव्हाण | बी.कॉम.-१ | २६ |
| ४) झिंगझिंग झिंगाट | कु.भाग्यश्री सुखदेव राऊत | बी.कॉम.-१ | २६ |
| ५) निष्पर्ण झाडांनो.... | कु.स्नेहल दत्तात्रय जगताप | बी.ए.-२ | २८ |
| ६) सारे तुझ्याचसाठी.... | कु.ऐश्वर्या आनंदराव रणपिसे | बी.ए.-१ | ३२ |
| ७) मुलगी म्हणून जगण्याची आस.... | कु.रोहिणी दत्तात्रय भोगले | बी.ए.-१ | ३२ |
| ८) घर मातीचं | कु.निलम अशोक पवार | बी.एस्.सी.-३ | ३५ |


Scanned with CamScanner

# अरुणा ढेरे : सन्मान स्त्री लेखिकेचा !

व्यक्तिचित्र



शंकर पवार
बी.ए.भाग-२

**परिचय :**

ज्येष्ठ कवयित्री, संशोधक, समीक्षक आणि आदिबंधात्मक समीक्षेच्या अभ्यासक डॉ.अरुणा ढेरे यांची निवड यवतमाळ येथे होणाऱ्या ९२व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाध्यक्षपदी एकमताने झाली. अरुणा ढेरे यांना साहित्य संशोधनाचा वारसा वडिलांकडून, डॉ.रा.चिं.ढेरे यांच्याकडून लाभलेला असला तरी त्यांनी स्वत:ची वेगळी वाट तयार केली आहे. मराठी साहित्यातील कथा, कादंबरी, ललित लेख, अनुवाद, समीक्षा, लोकसाहित्यविषयक, सामाजिक इतिहासपर, किशोरांसाठी आणि कुमारांसाठी असं चतुरस्त्र लेखन त्यांनी केले आहे. त्यांचा 'विस्मृतिचित्रे' हा ग्रंथ त्यांच्या व्यासंगी प्रतिभेचे दर्शन घडवितो. 'स्त्री-लिखित मराठी कविता', 'स्त्री-लिखित मराठी कादंबरी' ही संपादने स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रियांच्या मराठी साहित्यातील योगदानाचा वाङ्मयइतिहास आहे. डॉ.अरुणा ढेरे वाचकांना परिचीत आहेत. 'प्रारंभ', 'यक्षरात्र', 'मंत्राक्षर', 'जावे जन्माकडे' या काव्यसंग्रहातून जीवन उत्कटपणे, समरसून जगताना मानवी भावभावना आणि त्याला साथ देणारा निसर्ग प्रत्ययाला येतो. 'काळोखाचे कवडसे' या पुस्तकातून त्यांनी केलेले आदिबंधात्मक समीक्षेविषयीचे सिध्दांत आणि उपाययोजना संशोधकांना आणि रसिक वाचकांना समीक्षापध्दतीविषयी मर्मदृष्टी देणारे आहे. डॉ.अरुणा ढेरे साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष झाल्याने त्यांच्या निरलस, निरपेक्ष आणि व्यासंगी साहित्यसेवेचा सन्मान झाला आहे.

**शिक्षणक्षेत्राची स्थितिगती :**

शिक्षणक्षेत्राचा विचारही या संदर्भापासून अलग राहू शकत नाही. ज्ञानाच्या उपासनापरंपरांची शुध्दता टिकवणं आणि त्यांचं वैविध्य टिकवणं हे पर्यावरणातच जैववैविध्य टिकवण्या इतकंच महत्वाचं कार्य आहे. याची जाणीव शिक्षणक्षेत्रातून हद्दपारच झाली आहे. जागतिकीकरणाच्या नव्या लाटेत माहिती-तंत्रज्ञानाच्या पृष्ठस्तरीय वापरामुळे व्यासंग आणि संशोधन हे शब्दही निरुपयोगी वाटू लागले आहेत. संशोधनासाठी व्यवहारिक, सोयीसुविधा आणि अनेक पातळ्यांवरचा अवकाश निर्माण झाला. पण विद्यापीठीय संशोधनाचा दर्जा असमाधानकारकच राहिला आहे.

मराठी भाषेची, तिच्या प्रतिष्ठेची, तिच्यावरच्या इंग्रजीच्या आक्रमणाची चिंता आपण सगळे वारंवार करत आहोत. अशी चिंता निर्माण होण्याची कारणं आणि वर्तमान मराठी रूपाबरोबरच त्या चिंतनाच्या निराकरणाचे उपाय यांवर साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून गेली चार वर्षे सातत्याने मांडणी झाली आहे म्हणून मी त्याविषयीच्या तपशीलात शिरत नाही. मात्र मातृभाषेविषयीची आस्था प्रत्येक माणसाला वाटली पाहिजे आणि तो केवळ मराठी शाळांमधल्या शिक्षणापुरता चिंतेचा विषय न राहता प्रत्येक माणसाच्या स्वत:च्या प्रेमाचा विषय झाला पाहिजे. रोजच्या व्यवहारात शक्य तितका आपल्या भाषेतून संवाद संपर्क करणं आणि ज्ञानभाषा म्हणूनही मराठीचा वापर यत्नपूर्वक करणं ही आपली गरज बनली पाहिजे.

भाषाशिक्षणाच्या बाबतीतही विद्यार्थ्यांचं भाषाप्रेम आणि भाषिक जाण वाढवण्यासाठी उपयुक्त ठरणारी संभवक्षेत्रं आपल्या शिक्षणपध्दतीत फार कमी आहेत. भाषेचा पैस विद्यार्थ्यांच्या परिचयाचा व्हावा. यासाठीचे पुरेसे आणि सक्षम आणि प्रयत्नही अभ्यासक्रमाच्या आखणीत केले जात नाहीत. माहितीच्या महाजालातून आवश्यक ती माहिती हाती लागते खरी पण तिची विश्वसनियता तपासून घेण्यासाठी कोशवाङ्मयाकडे वळणं आवश्यक असल्यची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करावी लागेल.

समीक्षेची वा संशोधनाची सशक्त साथ नसण्याच्या या काळात वाचकांवरची जबाबदारी मात्र आणखी वाढलेली आहे. केवळ आवड किंवा मनोरंजनाच्या पुढच्या पायरीवर आपलं वाचन नेण्याची गरज वर्तमानानं आपल्या बाबतीत निर्माण केली आहे.



Scanned with CamScanner

वाचन, पुनर्वाचन, वेगवेगळ्या दृष्टिकोनातून वाचन आणि मूल्यांकन, पुनर्मूल्यांकन ह्यातून आपली भाषिक जाण आणि वाङ्मयक्षेत्राचा व्यापक भान यामुळे आपली म्हणजे वाचकाची संवेदनशीलता समृध्द होते. तसेच ते साहित्य निर्मितीचा दर्जा उंचवण्यासाठीही अप्रत्यक्ष कारण होतं.

वाचक म्हणून आपण वाङ्मयक्षेत्रात कोणत्या गोष्टी उचलून धरतो याला आज अधिक महत्त्व देतो.

**वाङ्मयीन संशोधनाचं क्षेत्र :**

समीक्षेप्रमाणेच दर्जेदार वाङ्मयीन संशोधन सध्या क्षीण झालेलं दिसतं. मध्ययुगीन महाराष्ट्र आणि एकोणिसाव्या शतकाला प्रबोधन पर्वताला, महाराष्ट्र यांच्या वाङ्मयीन सांस्कृतिक आकलनाचा महाप्रपंच मांडताना अनेक विद्याशाखांचा समन्वित वापर करणारे, त्यातून नवनवे वाङ्मयीन दृष्टिकोन देणारे आणि अनेक अल्प ज्ञात-उपेक्षित अभ्याससाधनांना उजेडात आणून साधनक्षेत्राचा विस्तार करणारे राजवाडे, भावे-केतकरांपासून दुर्गा भागवत-इरावती कर्वे, रा.चिं. ढेरे, प्रभाकर मांडे यांच्यापर्यंत आणि 'गावगाडा'कार त्रिं.ना.आत्र्यांपासून नांदापूरकर, सातोस्कर, श्री.रं.कुलकर्णी आणि कोलते-मिराशी, प्रियोळकर, सेतुमाधवराव पगडी आणि न.र.फाटकांपर्यंत आणि इतिहास, पुरातत्व आणि साहित्य यांच्या आंतरसंबंधांची जाण ठेवून काम करणाऱ्या ग.ह.खरे, म.के.ढवळीकरांपर्यंत किंवा समाज आणि संस्कृतीकडे पाहण्याची भावगौरव किंवा तुच्छता यांच्या पलीकडची विश्लेषक दृष्टी देणाऱ्या दामोदर धर्मानंद कोसंबी, दि.के.बेडेकर यांच्यापर्यंतचे अभ्यासक आपापल्या अभ्यासक्षेत्रात जे काम करून गेले आहेत त्याच बरोबर वाङ्मयाभ्यासाच्या पध्दती आणि दृष्टिकोनही विकसित झाले आहेत.

मात्र वर्तमान वाङ्मयाच्या कालोचित संशोधनाचा दर्जा समाधानकारक नाही ही वस्तुस्थिती आहे. संशोधन पदव्यांशी आणि पदवी उपजिविकेशी बांधली गेल्याचा बऱ्याच अंशी अपरिहार्य असा तो परिणाम आहे.

※ ※ ※ ※

## जग हवं तसं....

कु.सुमेदा कैलास पवार
बी.कॉम.-१



आजी म्हणायची,
उपास-तापास कर, पुजा-पाठ कर....सासर चांगलं मिळेल
आजोबा म्हणायचे,
शांत राहा, समजुतीनं घे....सासरी निभाव लागेल.
आई म्हणायची,
घरची चार कामं शिक....सासरी सोपं होईल.
काकू म्हणायची,
धड-धड चालू नकोस, जोरात बोलु नकोस....सासरी नावं ठेवतील.
काक म्हणायचे,
जिन्स नको, टिकली लाव, बांगड्या घाल....सासरी चालत नसतं.
आत्या म्हणायची,
डान्स, कराटे कशाला ? शिवणकाम, कलाकुसर शिक....सासरी उपयोग होईल.
मावशी म्हणायची,
सारखं पुस्तक, अभ्यास करू नकोस, चार माणसात उठ-बस....सासरी हेच करावं लागतं.
फक्त बाबा म्हणायचे,
जग बाळा मनसोक्त, मनमुराद, तुला हवं तस भरभरून.....
तुला हवं ते घाल, हवं तेवढं शिक, ओरड, खेळ, नाच, फिर मोकळेपणाने
कारण.....तु तुझ्या हक्काच्या घरी आहेस, तु तुझ्या माहेरी आहेस.

# न झालेले उद्‌घाटकीय भाषण - नयनतारा सहगल

वैचारिक



कु.मोनाली अशोक माने
बी.एस्सी.भाग-३

*(यवतमाळच्या या वर्षीच्या साहित्य संमेलनात प्रख्यात लेखिका श्रीमती नयनतारा सहगल यांचे न झालेले उद्‌घाटनपर भाषण.)*

नयनतारा सहगल या एक भारतीय लेखिका असून त्यांचा जन्म १० मे १९२७ला झाला. त्या भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची बहिण विजया लक्ष्मी पंडित यांची मुलगी आहे. त्यांचं पदवी शिक्षण वुडस्टॉक स्कूल, हिमालय स्टेशन, लांडोर येथे १९४३ मध्ये झाले. त्या पहिल्या भारतीय लेखिका आहेत, की ज्यांनी इंग्रजी लेखनासाठी नवी ओळख मिळविली. नयनतारा ह्या एक दक्षिण भारतीय अभिनेत्री आहेत. त्यांना चित्रपटसृष्टीचा फिल्मफेअर पुरस्कार मिळाला. नयनतारा सहगल यांनी 'रीच लाईक अस्', 'द डे इन शॅडो', 'मिस्टेन आयडेंडीटी' इ. कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्यांना 'रीच लाईक अस्' या कादंबरीसाठी साहित्य अकादमीचा पुरस्कार १९८६ला मिळाला.

अशा या नयनतारा सहगल यांचे न झालेलं उद्‌घाटनपर भाषण गाजलं, ते त्यातील मुद्यांमुळे.

नयनतारा आपल्या भाषणात म्हणतात, माझ्यासाठी हा क्षण भावनिक असण्याचे कारण म्हणजे माझे वडील रणजित पंडित यांच्याकडून माझे स्वत:चे महाराष्ट्राशी असलेले नाते. ब्रिटीश अंमल असताना त्यांच्या वडिलांना दोन वेळा तुरुंगात जावे लागले होते.

सहगल यांच्या आई आणि वडिलांनी महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्याच्या राष्ट्रीय चळवळीमध्ये भाग घेतला होता. त्यांची आई विजया लक्ष्मी पंडित यांना ३ वेळा, वर वडिलांना ४वेळा तुरुंगवास घडला होता. त्यांचे वडील तुरुगात खूप आजारी पडले होते. अंतिमत: सरकारने त्यांची सुटका केली, पण ती जणू मरण्यासाठीच. कारण जेमतेम तीन आठवड्यांनीच त्यांचा मृत्यू झाला. नंतर अनेक वर्षांनी स्वातंत्र्य मिळाल्यावर त्यांची आई ब्रिटनमधील उच्चायुक्त असताना एकदा पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांच्यासोबत भोजन घेत असताना चर्चिल तिला म्हणाले, ''तुमच्या पतीचा जीव आम्हीच घेतला, नाही ?'' त्यांचे हे कबुलीजबाब सम उद्‌गार ऐकून तिला खूप आश्चर्य वाटत होते.

नयनतारा त्यांच्या भाषणात म्हणतात, 'आज आपल्यामध्ये स्वातंत्र्याची तीच आस आहे का ?' आपल्या आधी होऊन गेलेल्या भारताच्या भावी पिढ्या स्वातंत्र्यात जगाव्या म्हणून लढत मृत्यू पत्करलेल्या स्त्री-पुरुषांचे नाव सांगण्यास आपण पात्र आहोत का ?

सहगल यांच्या मते, आपली विविध प्रकारचे स्वातंत्र्य आज धोक्यात आहेत. या स्वातंत्र्यांना असलेल्या धोक्यांनी मनात एवढे वादळ उठवले आहे, की आज प्रेक्षकांसमोर काय बोलायचे याचा विचार करत असताना, सध्या भारतामध्ये जे काही चालले आहे त्याबद्दल बोलायला हवे असे त्यांना वाटते. याचे कारण म्हणजे, या गोष्टी आपल्या जीवनाच्या प्रत्येक बाबींवर वाईटरित्या परिणाम करत आहेत. आपण काय खातो, कुणाशी विवाह करतो, काय विचार करतो, काय लिहितो आणि अर्थातच आपण ईश्वराची प्रार्थना कशी करतो. आज अशी परिस्थिती आहे, जिच्यात वेगळेपण आणि सत्तारूढ विचारप्रणालीला विरोध या गोष्टींवर भयंकर हल्ले होत आहेत.

त्यांच्या मते भारतीयांच्या मनामध्ये भीती आणि दु:ख दाटण्याचा काळ आता आला आहे. त्या जशा राजकीय परिस्थितीबद्दल बोलत आहेत. तशा त्या साहित्याबद्दलही बोलतात. त्यापुढे म्हणतात, लेखक म्हणून आपण सर्व जाणतो की, आपण आपले विषय निवडत नाही. आपल्या सभोवताली असलेल्या विषय आणि वातावरणातून आपण कथांना जन्म देत असतो. त्या म्हणतात, माझा जन्म स्वातंत्र्यलढ्याच्या काळात झालेला असल्यामुळे त्या काळाची आणि त्याने जन्म दिलेल्या देशाची मूल्ये हीच माझ्या काल्पनिक आणि वास्तविक विषयांवरच्या लेखनाचा विषय होती.

माझ्या कादंबऱ्या आधुनिक भारताच्या घडण्यासंबंधी आहेत असे मला वाटत असे.

या भाषणात त्यांनी अभिव्यक्ती स्वातंत्र्याचाही मुद्दा उपस्थित केला आहे. त्यांच्या मते कल्पनाशक्ती आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य यांना सध्याच्या राजकीय वातावरणामध्ये काहीही स्थान नाही. जिथे विचारस्वातंत्र्य किंवा लोकशाही हक्कांप्रती आदर नसतो, तिथे लेखन ही एक धाडसी धोकादायक कृती बनते.

नरेंद्र दाभोलकर, गोविंद पानसरे आणि एम.एम.कलबुर्गी तसेच गौरी लंकेश यांच्या लेखनामुळे झालेल्या हत्येबद्दलची चिंता व्यक्त केली आहे. त्या म्हणतात, भावना दुखावणे वगैरे अर्थातच निव्वळ निरर्थक आहे. शंभर कोटी लोकांना एकाच पध्दतीने विचार करायला लावणे केवळ अशक्य आहे. म्हणजे वैचारिक विविधता हे चांगल्या समाजासाठी आवश्यकच आहे. साहित्याबरोबरही त्या इतिहासाबद्दलही बोलतात. पुनर्लिखित इतिहासाच्या पाठ्यपुस्तकांपैकी काही पुस्तकांमध्ये संपूर्ण मुघल साम्राज्यच पुसून टाकले आहे आणि निव्वळ इतिहास पुसून समाधान न झाल्यामुळे त्यांचे संपूर्ण नामोनिशाणही उध्वस्त करणे चालले आहे. एक क्रांती सुरू झाली, ते थोर मराठी विभूती डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेतून निर्माण झाला होता. आज तोच उच्च आदर्श बाजूला सारण्यात आला आहे. अल्पसंख्यांक आणि हिंदुराष्ट्राच्या उद्दिष्टाला पाठिंबा न देणारे लोक रस्त्यांवरून मोकाट फिरणाऱ्या दुराग्रही लोकांचे लक्ष्य ठरत आहेत.

नयनतारा यांचे भाषण न होऊ देण्याचे कारण त्यांच्या भाषणातील खालील परिच्छेद असावा असे वाटते.

नुकतीच, देशाविरुध्द कट करण्याचे खोटे आरोप करून, पाच नागरिकांना अटक झालेली आपण पाहिली आहे. आदिवासी आणि जंगलांच्या हक्कांकरता आणि उपेक्षितांना न्याय मिळवून देण्याकरता काम करण्यात आयुष्य वेचलेले हे स्त्री-पुरुष आहेत. ख्रिश्चन चर्चचा विध्वंस करण्यात आला. ख्रिश्चन लोकांना असुरक्षित वाटत आहे. कायदा हातात घेऊन जीवे मारणारे जमाव गोहत्या आणि गाईचे मांस खाण्यासंबंधीच्या कृत्रिम अफवांच्या आधारे उघडपणे मुस्लिमांवर हल्ले करत आहेत. त्यांना ठार मारत आहेत. आपण सगळे ही झुंडशाही टी.व्ही.वर पाहात आहोत. उत्तर प्रदेशात गोहत्येच्या नावाखाली या जमावांचे हल्ले सर्रास सुरू आहेत. सरकारी यंत्रणा बाजूला उभे राहून ते पाहात आहेत. या प्रकारचा दहशतवाद जेव्हा अधिकृत ठरतो, असे उत्तर प्रदेशात घडते, तेव्हा आपण न्यायाकरता कुणाच्या तोंडाकडे पाहायचे ? पुढे त्यांनी समाजमानस बदलून टाकण्याच्या प्रयत्नाबद्दलही लिहिले आहे. अनेक गोष्टी पुसून टाकण्याबरोबरच आपण स्वातंत्र्यापासून जोपासलेले वैज्ञानिक मनही मारले जात आहे. त्याची दंतकथा आणि पुराणकथा तसेच मध्ययुगीन मानसिकता घेत आहेत.

असे असले तरी सहगल यांच्या मते, विविधता मतभेद आणि वादविवाद यांच्या विरुध्द पुकारण्यात आलेल्या या युध्दामध्ये ज्यांना स्वातंत्र्याची चाड आहे असे लोक गप्प बसलेले नाहीत. आपल्या मूलभूत हक्कांच्या पायमल्लीच्या विरोधात पदयात्रा आणि मेळावे घेतले जात आहेत. त्या म्हणतात, आपण साहित्यिक अशा परिस्थितीमध्ये काय करू शकतो ? या प्रश्नाचे उत्तर आहे ही आपण लिहू शकतो. जगभरातील अनेक देशांमधील लेखकांनी लिहिलेले महान साहित्य हेच कार्य करत आलेले आहे आणि हेच साहित्य पिढ्यान्पिढ्या लोकांच्या हृदयाला स्पर्श करत आलेले आहे. तेच अजूनही जिवंत आहे. साहित्याबद्दल अशी अपेक्षा व्यक्त करून त्यांनी अखेरीस भाषणाचा समारोप केला, 'ज्यांच्या हत्या झाल्या आहेत. त्यांचे स्मरण करून, वेगळे मत मांडण्याच्या हक्काकरता उभे राहणाऱ्यांना पाठिंबा देऊन आणि भय व अनिश्चिततेच्या छायेत जगणाऱ्या पण तरीही आपले मत व्यक्त करणाऱ्या, विरोधी मत असलेल्या सर्वांकरता आपण स्वातंत्र्याचा मार्ग निवडू या.' अशाप्रकारे त्यांनी त्यांच्या भाषणाचा समारोप केला आहे.

❊ ❊ ❊ ❊

## विनोद

डॉक्टर : फक्त कमी कमी रोज ३-४ किलोमीटर चाललं पाहिजे.
रुग्ण : डॉक्टर मी रोज १०-१२ किलोमीटर चालतोच मुळी.
डॉक्टर : कसं काय ?
रुग्ण : मी पोस्टमन आहे.

टिंगू : काका, मला एक कॅलेंडर द्या ना.
दुकानदार : कोणतं कॅलेंडर हवंय तुला ?
टिंगू : ज्या कॅलेंडरमध्ये सगळ्यात जास्त सुट्ट्या असतील, असं कॅलेंडर द्या.

कु.वृषाली दादासो जाधव, बी.कॉम.-१



Scanned with CamScanner



# कलियुग

कथा

संतोष मारुती शेळके
बी.ए.भाग-३

घरचं वळण चांगलं, रीती-भाती कामधंदा आईकडून शिकली अन् फुलराणी लग्न होऊन सासरी आली. सासरच्या उंबऱ्यावरचं माप ओलांडून घरात आली. घराणं पाटलाचं, कुटुंब मोठं होतं. नवऱ्याला चार भाऊ, पाच नंदा घर कसं गोकुळासारखं होतं. ती घरात रमून गेली. दिवसामागून दिवस जात होते. वर्षामागून वर्षे जात होती. फुलराणीचा आणि गोईंदाचे वैवाहिक जीवन सुखात होते.

गोईंदा आणि फुलाईच्या संसारवेलीवर फुलं उमलली. दोन मुलं अन् दोन मुली झाल्या. गोईंदा सगळ्यात धाकटा. गोईंदाच्या बाकीच्या भावांना मुलं लेकरं झाल्याली. सासू महादाच्या जन्मावेळी देवाघरी गिली. सासरा म्हातारं पण बेरकी व्हता. त्यानं सगळ्यांना जमीनीचे वाटप करून दिले. एक दिवस सगळे वेगळे झाले.

गोईंदाची मुलं लहान होती. गोईंदा लिहण्या वाचण्यापुरता शिकला होता. तो कधी वर्तमानपत्र वाचायचा. त्याला बरीच माहिती असायची. त्याने मास्तरकीची नोकरी केली नाही. पण पोरांना चांगलं शिकवलं. जमीन बऱ्यापैकी, त्या मातीत गोईंदा अन् फुलाई रात्रंदिवस राबायची. घाम गाळायची. मुलांना शहरात मोठ्या शिक्षणासाठी लावली म्हणजे पैसा पाहिजे म्हणून दोघं शेतात राबायची. पोरांच्या शिक्षणापाई अंगाला आवडीचं कापड घातलं न्हाय. खाण्यापिण्यात काटकसर केली. कधी जत्रा न्हाय, पावण्या पैच्या गावाला गेली न्हाय. मुली परक्याचं धन म्हणून जास्त शिकवल्या नाहीत. डोक्यारवचं ओझं कमी करायचं म्हणून दोन्ही मुलींची लग्न करून दिली. त्यांचे संसार बऱ्यापैकी चालले होते.

सदा आणि महादा चांगले शिकले. चांगल्या पदावर गेली. एक तर परदेशात नोकरी करून पुन्हा देशी आला. चांगल्या पदावर व मोठा पगार घेत होता.

आकाशात काळे ढग यावेत आणि गायब व्हावेत तसं गोईंदाने म्हातारीला फसविलं. फुलाईचा म्हातारा तिला अर्ध्यात सोडून गेला. घरदार बांधलं. आता फक्त आनंदात रहायचं होतं. पन गेल्यासाली पुरळ आली आणि नायटा झाला म्हनत्यात तसं त्याला झालं. छातीत दुखाया लागलं. घाम आला. अन् फुलाईचा म्हातारा अर्ध्या पानावरनं उठून गेला. म्हातारी चितागती झाली. ल्याक-लेकींनी तिचं सांत्वन केलं. पण हे नव्याचे नव दिवस म्हनत्यात तसं.

लेकी आपल्या संसारात, मुला, नातवंडात गुंतलेल्या. कधी तरी म्हातारीला भेटायला यायच्या. पन आयबराबर हेवादावा करायच्या. 'आमाला शिकीवलं न्हाय. तुजी पोरं बेस शिकुन सावलीत शेरात हायती. आमाला कष्ट केल्याबिगार हाय का ? तुज्याजवळ बसून काय करायचं.'' म्हातारी गप व्हायची. सदा अन् महादा शहरात ऐशारामी जीवन जगत होते. ते कधी तरी घरी यायचे. पन आईच्या घरातील अवस्था पाहून त्यांना किळस यायची. ती आल्या पावली निघून जायची. म्हातारीला धड दिसत नव्हतं. पोटाला भाकरी करनं तिच्यानं होत नव्हतं. हातापायाच्या काड्या झाल्याल्या. शेजापाजारी कधी तरी भाकरी-कालवण द्यायची. ल्याकांच्या नावांनी शिव्या द्यायचे. म्हातारीला तोंड असून बोलता येत नव्हतं. हाताबोटावर सवसार केल्याला आता कायबाय बोलून ल्याकांचा सवसार कसा उधळायचा. ''आपुन काय आज हाय अन् उद्या न्हाय'' कधी उपाशी तर कधी पानी पिवून म्हातारी एक एक दिवस ढकलत होती. ती मनाला म्हणायची, ''म्हाताऱ्याबर गिली असती तर बरं झालं असतं.'' असं म्हणून आसवं गाळत बसायची.

तिचे हे दुःख शेजाऱ्या-पाजाऱ्यांना भाव-भावकीला बघवेना. गावातल्या तुका पाटलानं सदा-महादाला अन दोन्ही लेकींना बोलावून घेतले.

पोरं, पोरी, नातवंड आली. तिला आपलं घर गोकुळ वाटायला लागलं. सारं गाव जमलं. त्यांनी म्हातारीला सांभाळण्याचा विषय काढला. दोन्ही ल्याक तिला नेण्याला तयार झाले. म्हातारीच गाव शेत जमीन काळीज होतं. पन ल्याकांचा संसार उदळायला नगं म्हणून

म्हातारी ल्याकांबर जायला तयार झाली. गावकऱ्यांचा न्याय ऐकून लेकी खुश झाल्या, गालात हसल्या. त्यांना बरं वाटलं पण सुनांनी तोंड वाकडी केली. काय ते सदा महादाने ओळखलं, म्हातारी हे सगळं अधू नजरनं बघत होती.

सदा-महादाने पुढच्या आठवड्यात म्हातारीला नेण्याचे सांगितले. शेजा-पाजाऱ्यांना बरं वाटलं. मधल्या चार दिवसात दोन्ही पोरांनी विचार केला. एक युक्ती केली. म्हातारीला सोन्याच्या पुतळ्या करू या. दोघांनी चांगल्या इस तोळ्याच्या पुतळ्या केल्या. सातव्या दिवशी दोघं ल्याक गावाकडं आले. त्यांनी तुका पाटलाला बोलविले. म्हातारीला चांगलं लुगडं नेसवलं. सोन्याचा डाग, सोन्याच्या पुतळ्या घातल्या. तिन्ही सांजला फुलाईने गावाचा, देवाचा व मातीचा निरोप घेतला. अन् गाडी शहराच्या दिशेने धावू लागली. गावात सगळ्यांना आनंद झाला.

पन फुलाईच्या जीवनात काळे ढग आले. मध्यरात्रीच्या सुमारास पोरांनी तिला रस्त्यावर एका कॉटवर बसविले. पांघरूण घालून तिचे दागिने दिसतील अशी व्यवस्था करून निघून गेले. त्यांच्या मते सोन्यासाठी तिला चोर मारून टाकतील.

पण घडलं वेगळंच चोर आलेच नाहीत. पोलीस आले. पोलीसांनी चौकशी केली. म्हातारी काहीच बोलत नव्हती. फक्त म्हणायची ''म्हातारा गेला मला जायचं.'' एवढंच म्हणायची. पोलीसांनी तिची रवानगी अनाथ आश्रमात केली. तिथं म्हातारी रूळली. तिने ती पुतळ्याची माळ फेकून दिली. आश्रमातील बायका तिला पुतळ्याची माळ का फेकून दिली म्हणून विचारू लागल्या. ती एवढंच म्हणाली, ''मला त्यांनी पुतळी केली. काय त्या पुतळ्याच्या माळंला करायचं. त्याच्यापेक्षा इथं राहून गेल्याल नाही का बरं'' म्हातारी हुंदका देऊन रडू लागली.

❋ ❋ ❋ ❋

## खेळाडू : एक संघर्षमय जीवन

जगात अशी कोणतीही गोष्ट नाही जिला संघर्ष करावा लागत नाही दगडाच्या मूर्तीत रूपांतर होण्यासाठी दगडाला सुद्धा झिजावे लागते. त्याचप्रमाणे खेळाडूंना सुद्धा कठीण आणि अथक परिश्रम घ्यावे लागतील. प्रत्येक खेळाडू तयार होण्यासाठी त्याच्या मध्ये काहीतरी करण्याची प्रेरणा असायला हवी. तसेच एखाद्या खेळाडूने दिवस-रात्र कष्ट केल्यानंतर त्याच्यातून चांगला खेळाडू तयार होतो. जर त्याने कशाची पर्वा न करता फक्त आपल्या जीवनाकडे जर पाहिले तर तो चांगला खेळाडू तयार होतो. एखादा खेळाडू एका रात्रीत मोठा होत नाही तर त्या पाठीमागे त्याची जिद्द चिकाटी कष्ट मेहनत आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे संयम असतो. ''पसीने किसी से जलते है अपने रातो को उनके मुकद्दर के पन्ने कभी कोरे नही हुआ करते।''

मला वाटतं काही क्षेत्रात वशिला लावून किंवा ओळख दाखवून पुढे जाऊ शकतो. पण खेळाडूंच्या बाबतीत मला वाटत असं कधीच घडत नाही. तो स्वतःच्या हिमतीवर कष्टावर आणि आत्मविश्वासाने प्रत्येक संकटाला तोंड देत पुढे जात असतो. कारण ''संघर्ष हमारा चरित्र, चरित्र करता है की हम क्या बनेगी।''

खेळामुळे खेळाडूंच्या अंगी कृती संयमी वृत्ती आत्मविश्वास आणि मदतीची भावना इत्यादी गुण जोपासले जातात. सर्वात महत्त्वाचं म्हणजे कितीही कठीण परिस्थिती असली तरी त्याला सामोरे जाणे उदाहरणार्थ युवराज सिंग यांनी कॅन्सरसारख्या रोगावर मात करून आपले अस्तित्व नव्याने निर्माण केले. सैनिकांप्रमाणेच खेळाडूही भारत देशाला आपले आयुष्य अर्पण करत असतात. ''खुद को कर बुलंद इतना की हर तकदीर से पहले खुदा बंदे से खुद पूछे बता तेरी रझा क्या है.....''

**राहुल अर्जुन गोरे**
**बी.ए.-३**



## प्रवास : एका निरक्षर रेडिओ जॉकीचा

मुलाखत

कु.स्वप्नाली बाळू खिलारे
बी.ए.भाग-१

हे निवेदन रेडिओ जॉकीचे आहे. पण ती आहे अशी स्त्री की, आजपर्यंत तिने शाळेची पायरी देखील चढलेली नाही. पण 'कौन बनेगा करोडपती'च्या शोपर्यंत पोहोचली आहे. वय वर्षे ६०. गावाचे नाव दीडवाघवाडी, ता.माण, जि.सातारा या ठिकाणच्या केराबाई सरगर. यांच्या या प्रवासाविषयी जाणून घेऊ या मुलाखतीतून.

*केराबाई तुमच्या बालपणाविषयी व आयुष्याविषयी सांगा.*

➲ माझं लग्न हे लहानपणी झाले. मी अशिक्षित असून लग्न झाल्याचे देखील मला माहित नव्हते. माझ्या आयुष्यात मी माझ्या वडिलांसोबत नांगरणी, कोळपणी, नांगर धरणे ही सर्व कामे केली आहेत. सासरी देखील खूप कष्ट सोसले आहेत. सासूचा देखील मी खूप त्रास सहन केला होता. पण मला माणसाचा अपमान करायला आवडत नाही.

*तुमची गाणी आणि रेडिओ जॉकीचा प्रवास कसा सुरू झाला ?*

➲ मला गाण्याचे बाळकडू माझ्या आईकडूनच मिळाले. माझी आई जात्यावरील ओव्या म्हणत असे. ते ऐकून मी दळता दळता या ओव्या गायला मी सुरूवात केली. गाणे म्हणता म्हणता मला गाणे म्हणण्याची आवड निर्माण झाली. मी पुस्तकांतील गवळणी, अभंग लक्षात ठेवून त्यावर मी गाणी बनवली. हळूहळू मला गाण्याचा छंदच लागला. पण माझ्या आवडीला एके दिवशी अचानक कलाटणी मिळाली. एकदा मी म्हसवडला कांदा घेऊन बाजाराला विकायला गेले होते. तेव्हा रस्त्यात मी एक रेडिओ विकत घेतला मी रोज रेडिओवर लागणारे कार्यक्रम ऐकू लागले. मला कार्यक्रमातील लता मंगेशकर, दादा कोंडके यांची गाणी खूप आवडायची तेव्हा मला असे वाटले की माझा आवाज देखील चांगला आहे. मला देखील केंद्रावर जाऊन अशी गायनाची संधी मिळावी. मला एकदा केंद्रावर जाऊन भजन, ओव्या, पाळणा म्हणायचा आहे. ही माझी इच्छा मी माझ्या मुलांना बोलून दाखविली. पण माझ्या घरच्या सदस्यांनाही या केंद्रात जायचे कसे याबाबतही माहिती नव्हते. एक दिवस म्हसवडच्या बाजाराला गेल्यावर माझ्या मोठ्याम मुलाला माणदेशी तरंग वाहिनीचं पोस्टर दिसलं. तो मला मग थेट केंद्रावरच घेऊन गेला. अशाप्रकारे जात्यावर गाणारी मी त्या तरंग वाहिनीबरोबर माझा प्रवास सुरू झाला.

*केराबाई तुमचा पहिला कार्यक्रम हा कुठे व कसा झाला ?*

➲ माझ्या आयुष्यातला पहिला कार्यक्रम म्हसवड मध्ये माणदेशी तरंग वाहिनीमध्ये २००८ साली झाला.

*तुम्हाला रेडिओ जॉकीत प्रवेश करण्याच्या ठिकाणी सर्वात जास्त मदत कोणी केली ?*

➲ मला या क्षेत्रात जाण्यासाठी सर्वात जास्त मदत ही चेतना सिन्हा उर्फ चेतनाभाभी यांनी केली.

*'कौन बनेगा करोडपती' आणि अमिताभ बच्चन सोबतचा अनुभव सांगा.*

➲ मी जेंव्हा या कार्यक्रमात गेले होते. तेव्हा त्या ठिकाणी खूप अशा गाड्या उभ्या केल्या होत्या. ते बघून मला आश्चर्य वाटले की ह्या एवढ्या गाड्या असतील कोणाच्या ? तेव्हा मी चेतना भाभीला विचारलं की ह्या गाड्या कोणाच्या ? तर त्यांनी अमिताभ बच्चन यांच्या गाड्या आहेत असे त्यांनी मला सांगितले. त्यानंतर मी आत प्रवेश केला. त्याठिकाणी अमिताभ बच्चन यांनी माझी मुलाखत घेतली. त्यांनी मला २०१२च्या दुष्काळाविषयी सांगायला लावले. त्यावेळी मी २०१२च्या दुष्काळाचे वर्णन जेव्हा सांगितले. तेव्हा माझ्या सांगण्यावर सर्व त्या ठिकाणचे लोक खूप रडायला लागले होते. प्रत्यक्षात अमिताभ बच्चनदेखील हे दुष्काळाचे वर्णन ऐकून रडायला लागले होते. असा हा माझा अमिताभ बच्चन सोबतचा अनुभव किंवा क्षण कायम माझ्या लक्षात राहिला.



Scanned with CamScanner

*आतापर्यंतचे सन्मान आणि पुरस्कार मिळाले, त्याबद्दल काय सांगाल ?*

➲ आतापर्यंत माझे खूप ठिकाणी सन्मान झालेले आहेत. त्या ठिकाणी मला असा अनुभव कधीच आला नव्हता. आपला एवढा मोठा सन्मान होऊ शकतो. मला त्याचा खूप आनंद झाला. मला नागपूर याठिकाणी यशवंतराव चव्हाण पुरस्कार मिळाला आहे. अजून मला शारदा कृषी वाहिनी या ठिकाणी देखील माझा सत्कार करून मला पुरस्कार देण्यात आला होता. आदर्श माता पुरस्कार जेव्हा मला दिला गेला तेव्हा मला आनंदाश्रू आले. मला माझ्या आयुष्यात मी एवढी मोठी बनू शकेन आणि मला सर्वांची खूप मदत झाली.

*तुमचे कार्य प्रकाशझोतात कसे आले ?*

➲ मला जेव्हा चेतना भाभी आणि विजूभाऊ यांनी पहिल्यांदा तरंग वाहिनीवर नेले. तेव्हा मला त्या ठिकाणी आत्मविश्वास मिळाला. आणि त्याच वेळी माझे कार्य प्रकाशझोतात आले.

*केराबाई तुम्ही ओव्या, गाणी, गवळणी, अभंग म्हणता यांच्या तुम्हाला चाली कशा सुचतात ?*

➲ मला गाण्याच्या चाली ह्या ज्या क्षेत्रात मी जाते त्या ठिकाणी मला आपोआप चाली सुचतात. तसेच मी आतापर्यंत खूप गाणी तयार केलेली आहेत. बरीच आता ती गाणी मला आठवत नाहीत.

*केराबाई तुम्हांला शिक्षणाची आवड आहे का ?*

➲ मला शिक्षणाची आवड आहे. पण आमची घरची परिस्थिती चांगली नसल्याने आणि लहानपणी लग्न झाल्याने मला शिक्षण घेता आले नाही. म्हणून मला शिकता आले नाही. यामुळे मी माझ्या मुलामुलींना शिकवून मोठं केलं आहे. माझी एक मुलगी बालरुग्णालयात सिस्टर आहे, दुसरी मुलगी ही पोलीस आहे. माझा मुलगा शिक्षक आहे व दुसरा पोलीस पाटील आहे आणि तिसरा मुलगा तलाठी आहे. यामुळे मला खूप समाधान मिळते.

*तुम्ही जर सांगायचं म्हटलं तर आधुनिक पिढीला काय सांगाल, तुमच्या गाण्याच्या माध्यमातून ते आम्हाला सांगा.*

➲ आधुनिक पिढीला जर मला काही सांगायचं असेल तर मी सांगेन की, परंपरेनुसार चालत आलेल्या रुढी, परंपरा ह्या जोपासत चला म्हणजेच जात्यावरील ओव्या, पहिल्या काळातील गाणी, गवळणी, अभंग हे विसरू नका. कारण यामधूनच आपल्याला चांगले संदेश आणि प्रेरणा देखील मिळत असते. यामुळे प्रत्येक व्यक्तीने आपली परंपरा ही विसरता कामा नये.

❊ ❊ ❊ ❊

## तुझ्याविना...

"तुझ्याविना अभ्यासात
चित्त माझे लागेना...
कॉलेजात असताना तुझ्याविना गमेना"
"सुखात आणि दुःखात सदैव तू असतेस
बेसूर झालेल्या जीवनाला सूर लावून देतेस"
"झोपेत मला माझ्या येऊन,
आवाज मला देतेस,
जाग मला येताच चटकन निघून जातेस"
"जसजशी तू जवळ येतेस,
हृदयाची धडधड वाढवून जाते,
कधी तुला हसविले, कधी कुणा रडविले"
कारण, परीक्षा म्हणून तू ओळखली जातेस.

**कु.पल्लवी चंद्रकांत चव्हाण**
बी.एस्सी.-२

## विचार

१) "देश माझ्यासाठी काय करेल यापेक्षा मी देशासाठी काय करू शकतो, ते [illegible] आज आपल्याला ज्या पाश्चात्य देशाचे व अमेरिका यासारख्या देशाचे आ[illegible] भारताला तसा देश बनविण्यासाठी होता होईल एवढे तुमच्याकडून प्रयत्न करा !"
२) "स्वाभिमान शून्य व्यक्ती आणि स्वाभिमान शून्य राष्ट्र यांना जगाच्या पाठीवर कोठेही किंमत नाही."
३) "जे जाते आणि पुन्हा कधीच येत नाही ते तारुण्य"
४) "शब्द तोंडात असेपर्यंत त्यावर आपली सत्ता असते, पण तोंडातून बाहेर पडला की, त्यांची सत्ता आपल्यावर चालू होते, म्हणून शब्द नेहमी मोजून, मापून, तोलून वापरावेत."
५) "सुज्ञ माणसे चुका करतात पण प्रत्येक चुक एकदाच करतात."
६) "आयुष्य खूप सुंदर आहे अनुभव तुम्हाला देत राहिल, प्रयत्न करणं सोडू नका यश तुम्हाला मिळत राहील."
७) "ज्याला चांगल करता येत नाही त्याला वाईट करण्याचा अधिकार नाही."

**कु.वृषाली दादासो जाधव**
बी.कॉम.-१



Scanned with CamScanner

# असा घडला दुष्काळी भागातील उद्योजक : उद्योगपती रामदास माने

व्यक्तिचित्र

कु.पूजा भिवाजी पाटोळे
बी.कॉम.भाग-३



रामदास माने यांचे मूळ गाव लोधवडे, ता.माण, जिल्हा सातारा. दोनशे घरांची वस्ती. रानावनात डोंगराळ भागात राहणारी ही व्यक्ती कोणत्या प्रवाहातून गेली हे त्यांनी त्यांच्या काही शब्दांत सांगितलं आहे. रामदास माने यांनी कधी शाळा पाहिली नव्हती. एक दिवस आईबरोबर रानात ढेकळे फोडत असताना त्वचा सर्व जळून काळी पडली. तेव्हा त्यांना असं वाटलं की ढेकळे फोडण्यापेक्षा शाळा शिकलेली बरी. त्या वेळी त्यांनी आपल्या आईला आणि वडिलांना शाळा शिकायची आहे असं सांगितलं. रानावनात कष्ट करून पोट भरणारी लोकं शाळा काय माहित असणार ? शाळा शिकायची म्हटलं तरी पैसा हा लागतो. तरी देखील रामदास माने यांनी माघार न घेता शाळा शिकण्यासाठी शिक्षण पूर्ण करायचं ही जिद्द मनाशी ठेवून त्यांनी शिक्षणाची शिदोरी आपल्या मनाशी बांधली. रामदास माने यांची आई त्यांना म्हणाली तेव्हा मानेसाहेबांची शाळा ही त्यांच्या घरापासून ७ कि.मी. अंतरावर होती. आई म्हणाली, ''बाळा तुला शाळेत जायच्या रस्त्यावरती लांडगे खूप असतात' आणि पहिल्या काळात दुष्काळी भाग असल्याने पशुपक्षी जनावरे प्राणी यांना अन्नाची सोय नव्हती. तरी त्या काळी जर लांडग्यांना शिकार म्हणजे शेळ्या, मेंढ्या जर नाही मिळाल्या तर लांडगे लहान मुलांना खात म्हणून त्यांची आई त्यांना शाळेत जाऊ नको, तुझी शाळा महागात पडेल असं ती म्हणू लागली. तरी देखील रामदास माने यांनी मला शिक्षण घ्यायचंच आहे आणि मला शाळेत जायचं आहे असं सांगितलं.

रामदास माने यांच्या आईनी त्यांचं ऐकून घेतलं व त्या स्वत: त्यांना शाळेत सात कि.मी.सोडायला जावू लागल्या. 'मी शाळेत जावू लागलो. आई दररोज सोडायला यायची. जन्मतारीख देखील अशीच लावली. कड्या कपारीचा रस्ता होता. डांबीटिंबीचा माळ तुडवत शाळेत जायचो. अशीचएकदोन वर्षगेलं. माझ्या शिक्षणामुळे खायचे वांदे झाले. रामदास माने यांची आई त्यांना म्हणाली की मी इथून पुढे तुला सोडायला येणार नाही, असं त्यांनी रामदासांना सांगून टाकलं. नंतरच्या काळात रामदासांना आई तीन कि.मी.कड्या कपारीने डोंगराळ भागातून सोडत असत व दोन कि.मी. ते स्वत: जात होते. असं त्यांचं सातवी पर्यंत शिक्षण पूर्ण झालं.

त्यानंतर १९७२च्या काळात प्रचंड मोठा दुष्काळ पडला. खायला अन्न नव्हते, प्यायला पाणी देखील नव्हते, त्या वेळची गोष्ट. रामदास माने म्हणतात की, दुष्काळामुळे सरकारने 'दुष्काळ हमी रोजगार योजना' सुरू केली होती आणि मला माझं शिक्षण पूर्ण करण्यासाठी पैशांची गरज होती. त्यांचे वडील त्यांना शाळा सोडून दे असं सांगू लागले. परंतु त्यांनी वडिलांना सांगितले की मी काम करून शिकेन. तेव्हा त्यांचे वडील त्यांना म्हणाले, 'तुला काय करायचं आहे ते कर'. त्यावेळी रामदास माने यांचं वय होतं १३ वर्ष. ते दुष्काळ हमी रोजगार योजनेचे मुकादम होते. त्यांना जाऊन भेटले व त्यांना फक्त पुस्तक आणि वह्या घेण्यापुरते पैसे तुम्ही मला द्या, मी बाकी सर्व लोक जे काम करतायत ते मी करेन. पण मला तुम्ही पुस्तक आणि वह्यांसाठी पैसे द्या अशी मागणी केली. रामदास माने सांगतात की, त्यांनी मला काम दिलं पण मी ते नीट करू शकलो नाही तरी देखील मी त्यांना विनंती करू लागलो की मला वह्या पुस्तकांसाठी पैसे द्या. त्यावर मुकादमसाहेब म्हणाले, 'बाळा, तू माझ्या परीक्षेत पास झालास' त्यावेळी त्यांनी सर्वांना सांगितले की, जेव्हा जेव्हा मला सुट्टी असेल, उन्हाळासुट्टी, दिवाळी सुट्टी त्यावेळी मला कामावर घ्यायचं. कदाचित मुल्ला साहेब (ही इज नो मोअर) यांच्यामुळे माझं दहावीपर्यंत शिक्षण झालं आणि त्यावेळी नुकताच बालमजूर कायदा अंमलात आला होता म्हणून मला त्यांनी काम दिलं असावं असं रामदास माने यांनी सांगितलं आहे.

रामदास माने यांना शाळेतील शिपायाची नोकरी खूप आवडायची. रामदास माने यांनी शिपायाच्या नोकरीसाठी त्यांच्या गावातील एक गृहस्थ त्याचं नाव जनार्दन लोहार (गावातील पहिली बी.कॉम. झालेली व्यक्ती) यांच्याकडे रामदास माने गेले. व त्यांना म्हणाले की लोहार साहेब मला शिपायाची नोकरी करायची आहे



Scanned with CamScanner

तर मी काय करू ? त्यावर जनार्दन लोहार यांनी रामदास माने यांना साताऱ्यातील जिल्हा परिषदेत जाऊन फॉर्म भर असं सांगितलं. त्यावेळी सातारला लोधवड्यापासून दहा रुपये तिकीट होतं. जायचे दहा, यायचे दहा. तरी देखील ते सातारला जावून त्यांनी तो फॉर्म भरला. परंतु त्यांचं दुर्दैव असं की त्या लेटरचं उत्तर त्यांना मिळालं नाही.

नंतर त्यांनी आय.टी.आय. करायचं ठरवलं त्यासाठी त्यांनी अर्ज केला. त्यांची मुलाखत घेण्यात आली व नंतर त्यांची निवड झाली. तेव्हा त्यांना सातारला बोलावण्यात आलं. पहिल्या काळातील प्रेमळ, दयाळू माणसं त्यांची आई आपलं लेकरू दुसरीकडे जाणार म्हणून सर्व सोयीच्या आणि गरजेच्या वस्तू ती रामदासांना देऊ लागली. आताच्या काळात कापडी बॅग असतात. पूर्वी लग्नात नवरीला रुखवतावरती ठेवलेली पेटी ही त्यांच्या आईला देखील मिळाली होती. ती डोक्यावरती घेऊन रामदास यांनी सातारा गाठले. सातारला पोहोचले तेव्हा ते बसस्टँडवरती आता पुढं काय करायचं, याचा विचार करू लागले. तेव्हा त्यांनी सातारा आय.टी.आय. जॉईन करून साताऱ्यातील एस.टी.कँटीनमध्ये मला नोकरी द्या अशी विनंती केली. त्यांना वेटरची नोकरी मिळाली. रात्रीच्या ११ ते पहाटेच्या ५ वाजेपर्यंत ते वेटरचं काम करत व दिवसा झाडाखाली आराम करत. त्यांचं आय.टी.आय. ते म्हणतात, 'मला सांगायला आनंद होतोय की मी आय.टी.आय.ला पहिला आलो आणि मला ८८% मार्क पडले म्हणून त्यानंतर त्यांना वरून साहेबांची तीन पत्र आली. पहिलं होतं, महिंद्रा सेंटर (जिकेल सेंटर, पिंपळ), दुसरं होतं ते रिसर्च कुडांस आणि तिसरं होतं ते सातारा कूपर मधून.' त्यानंतर त्यांना पुण्याला जायचं होतं. पण तेवढे पैसे नव्हते. त्यासाठी त्यांनी पुसेगावच्या शेजारी रणशिंगवाडी येथे त्यांची आजी रहात होती. त्या ठिकाणी ते गेले आणि आजीजवळ वीस रुपयांची मागणी केली. आजीनेदेखील त्यांना कसेबसे उसने पैसे घेऊन आपल्या नातवाला दिले. त्यांना दोन भाकरी आणि त्यावरती चटणी दिली व रामदास हे पुण्याला आले. त्यांनी महिंद्रा सेंटरमध्ये मुलाखत दिली. येईल त्या भाषेमध्ये त्यांनी गाव, नाव, आईवडील व घरची परिस्थिती सांगितली. त्यावर ते म्हणतात की, ही माझ्या आयुष्यातील पहिली मुलाखत असेल असं त्यांना वाटू लागलं. त्यांनी तेथील सरांना लगेच विचारलं की माझं सिलेक्शन झालं की नाही ? त्यावर ते सर म्हणाले, 'असं सांगता येत नाही. अजून पंधराजणांच्या मुलाखती बाकी आहेत.' रामदास यांच्याजवळ फक्त आठ रुपये उरले होते. त्यांनी सरांना विचारलं की किती वेळ लागेल ? तेव्हा त्यांनी त्यांना सहावाजेपर्यंत थांबण्यास सांगितले. रामदासांनी सहा वाजेपर्यंत गेटवरती वाट पाहिली व सहावाजता त्यांच्या हातामध्ये त्यांचं सिलेक्शन झाल्याचं लेटर आलं व त्या मुलाखतीमध्ये त्यांना ८२% मार्क मिळाले होते.

ते लेटर घेऊन ते काही अंतरावरती चालत गेले व एक पाण्याची टाकी दिसू लागली. त्या ठिकाणी ते गेले, तिथे एक वॉचमन होता. त्यांना ते म्हणाले की, मला एक रात्र इथे राहण्याची परवानगी द्या. त्यावेळी तो वॉचमन त्यांच्या तोंडाकडे पाच मिनिटे पहात होता. रामदास म्हणाले, मला नोकरी मिळाली आहे आणि माझी राहण्याची सोय नाही. त्यावर रामदास हे पाण्याच्या टाकीजवळ गेले व डोक्यावरची पेटी खाली ठेवली आणि आजीने दिलेल्या दोन भाकरी सोडल्या, वॉचमनला म्हणाले की तुम्ही पण या थोडं खावू या. ते म्हणतात की कदाचित माझ्यातल्या माणुसकीमुळे त्याला माझी दया आली आणि त्याने मला रहायची परवानगी दिली. पण भाकरी खायची का तर नको म्हणाला. त्यावर मी एक भाकरी खाल्ली व एक भाकरी तशीच बांधून ठेवली. सकाळी उठून कामाला गेलो. असेच एक वर्ष पाण्याच्या टाकीखाली राहून त्यांनी दिवस काढले. त्यावेळी त्यांना पहिला पगार हा रु.५०० मिळाला. त्यातून त्यांनी आईसाठी आणि आजीला नऊवारी साडी घेतली, पेढे विकत घेतले आणि वाटले. ते त्यांच्या सरांकडे गेले व गावी जाण्यासाठी दोन दिवसांची सुट्टी मागीतली.

रामदास माने यांच्या पत्नीचे नाव शोभा होते. रामदासांनी मॅनेजरची नोकरी सोडून वायरमनचा कोर्स केला व ते काम करू लागले. त्यामुळे त्यांच्या पत्नीला खूप राग यायला लागला आणि रामदासांच्या अशा वागण्यामुळे त्या घर सोडून माहेरी गेल्या. नंतर काही दिवसांनी त्यांनी आपली दोन मुले व पत्नीला घरी आणलं व नंतर त्यांनी आपला स्वत:चा उद्योग सुरू करायचं ठरवलं.

नंतरच्या काळात रामदासांनी त्यांच्या आयुष्यात एवढी प्रगती केली की पाच वर्षातून त्यांना सौदी अरेबियातून पहिली थर्माकोलसाठी मागणी आली. ती मागणी होती सहा लाख डॉलरची म्हणजे ३७ रु. डॉलर म्हणजेच सत्तेचाळीस रुपये. रामदास यांच्या उद्योगात खूप नफा झाला. आता सध्या इराण, इराक, सौदी अरेबिया, अफगाणिस्तान असे बरेच देश हे त्यांच्याकडून मागणी करतात. त्यांनी त्यांच्या आयुष्याच्या प्रत्येक पायरीवरती कष्ट घेऊन उद्योगपती झाले. त्यांनी तीनशे प्रकल्प राबवले आहेत.

अशाच प्रकारे ढेकळे फोडणारा मुलगा रानात डोंगराळ भागात राहणारा आज उद्योगपती रामदास माने म्हणून ओळखला जातो.

* *



Scanned with CamScanner

# शिकवताना आणि खूप काही शिकताना...

ललित



कु.तनुजा विजय कदम
बी.ए.भाग-१

शाळेत शिकत असताना ५ सप्टेंबरच्या दिवशी मी शिक्षक होणार अशी जिद्द मनाशी बाळगून शिक्षकांकडे जायचे. मला पहिल्यापासूनच शिक्षक बनायला खूप आवडायचे. शिक्षकांचे अनुभव कसे असतात याचा प्रत्यय घेण्याची संधी मला प्राप्त व्हायची. त्यामुळे मला एक दिवसीय शिक्षक बनायला आवडायचे. शाळेतील मुलांना शिकवत असताना ते त्यांना खूप आवडायचे. शाळेतील गुरुजन वर्गाकडून मला शाबासकीची थाप मिळायची आणि मला कुठेतरी पंख फुटल्याचा भास व्हायचा अन् मीही प्रत्यक्षात शिक्षक व्हायचे असे ध्येय डोळ्यांसमोर उभे रहायचे.

आता मी बी.ए.भाग-१ मध्ये शिकत असून मला मराठी विषय आणि मराठीचे शिक्षक खूप आवडतात. शिक्षकांनी मला मराठी विभागामार्फत राबवण्यात येणाऱ्या काही उपक्रमांबद्दल मला माहिती दिली. त्यापैकीच एक असणाऱ्या 'Language Consuntancy' अंतर्गत कन्या विद्यालयात शिक्षक म्हणून शिकवायचे होते. मला खूप आनंद झाला. मनात खूप विचार उत्पन्न झाले. आतापर्यंत मनाशी बाळगलेले स्वप्न आज प्रत्यक्षात येणार होते म्हणून मला खूप आनंद झाला. आतापर्यंत फक्त आपल्या शाळेतील मुलांना शिकवले परंतु आता दुसऱ्या शाळेतील मुलांना शिकवायला मिळणार, यामुळे मन खूप उत्साहित झाले.

सरांनी मला विषय दिला व शिकवण्यासाठी वर्ग दिला. मी इयत्ता आठवीच्या वर्गात 'विभक्तीप्रत्यय' हा व्याकरणाचा भाग शिकवणार हे निश्ति झाले. सरांनी मला संदर्भ दिला व त्याविषयीची पुस्तके दिली व माहिती सांगितली. मी त्याचा अभ्यास केला व समजून घेतले.

.... आणि तो दिवस उजाडला, ते माझे स्वप्न प्रत्यक्षात उतरवण्याचे ठरवूनच ! कन्या विद्यालयात शनिवारी जायचे ठरले. जबरदस्त तयारी केली होती. आता तो शिकवण्याचा व शिक्षक होण्याचा क्षण पावलोपावली जवळ येत होता. आम्ही एकवीस जण होतो. प्रत्येक जण आपापल्या विषयानुसार उत्कृष्ट तयारी करून आले होते. कुणी समास, प्रयोग, काळ इ. व्याकरणाचे प्रकार शिकवणार होते. आम्ही सकाळी ९.३० वाजता कन्या विद्यालयात चालत गेलो. तेथील कार्यालयाबाहेर आम्हाला बसवून वर्गाविषयी माहिती प्राप्त करून देण्यात आली. मला आठवीचा वर्ग दाखवण्यात आला. वर्गात सर्व मुली असल्याने शिकवण्यात अडचण येणार नाही असे मला वाटले. मी वर्गात पाऊल टाकले, त्यावेळी मुलींचा गलका व गोंगाट चालू होता. पण मी वर्गात जाताच सर्व मुली शांत झाल्या. त्यांनाही दररोजच्यापेक्षा कुणीतरी वर्गावर नवीन शिकवायला आले याचा आनंद झालेला त्यांच्या चेहऱ्यावरून स्पष्ट दिसत होता. त्यांना मी माझा परिचय दिला. माझे येण्याचे कारण स्पष्ट केले. फळ्यावर विभक्तीचा तक्ता लिहिला व त्यांच्या उपस्थितीचा आढावा घेतला. मुली खूप हुशार होत्या. हजरजबाबी होत्या. विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पटापट देत होत्या.

प्रथमत: त्यांना विभक्तीविषयी काही माहिती आहे का, याचे आकलन केले. तास संपत आला होता, पण मला वर्गातून बाहेर येऊ नये असे वाटत होते. वाटायचे मी कायम इथेच शिकवत बसावे. तास संपला. मुली म्हणाल्या, ''पुढचाही तास तुम्हीच घ्या.'' पण आलेल्या प्रत्येकजणीला शिकवण्याची संधी मिळावी म्हणून मी दुसऱ्या वर्गात शिकवण्यास गेले. पण मला वर्गातनं बाहेर येऊ वाटत नव्हते.

माझा तास झाल्यानंतर शिक्षकांनी मला निरीक्षणाचे काम दिले. वर्गात मुले शांत आहेत का इ. कामे मी करत होते. एका वर्गात कोणतेही शिक्षक नव्हते. त्या वर्गात मी पाऊल टाकले. तो वर्ग होता १०वी अ चा. वर्गात धिंगाणा चालू होता. परंतु मी वर्गात पाऊल टाकताच सर्व मुली शांत झाल्या. मुली उभ्या राहून मला 'Good Morning' म्हणाल्या. आज मला खरोखरच शिक्षक झाल्याचा भास झाला.

खरंच शिक्षक बनण्याचा, शिकवण्याचा अन् शिकण्याचा अनुभव खूप वेगळाच असतो, याचा प्रत्यय मला त्या निमित्ताने



Scanned with CamScanner

आला आणि बोलता-बोलता घंटा वाजली. ते मला कळलेच नाही. त्यानंतर आम्हाला कार्यालयासमोर बसवून शिकवण्याचे अनुभव कथन करायला लावले.

खरंच त्यांची प्रगती प्रगतीपथावरची होती. सावित्रीच्या लेकी खूपच हुशार होत्या. मजप्रमाणेच सर्वांचे अनुभव ऐकून मी माझ्या बालपणात प्रवेशले. वर्गात कुठेतरी चुकल्याचा भास होत होता. कुठेतरी मी वर्गातील मुलींमध्ये स्वत:लाच शोधण्यात मग्न होते. अबोल, शांत, डोळे मोठे करून ऐकणारी अन् आज बोलक्या डोळ्यांनी वर्गावर जाणारी....

* * * *

## पोरीचं शिक्शान

एकांकिका

कु.ऋतुजा शशिकांत कुंभार
बी.एस्सी.भाग-२




सखूबाई : बाई ! आवं बाई येवू का म्हणलं ? आवं माझं धनी दिल्लीच्या पोस्टात हायतं कामाला. त्यास्नी लिव्हायचं हाय पतुर.

बाई : आग म्हणजे तुझ्या नवऱ्याला होय ? सांग काय लिहायचं ?

सखूबाई : बाई पयला माझा नमस्कार लिव्हा. हॉ... आता लिव्हा म्हशीला रेडा झालाय, अन् जोंधळा भांगलायचाय तवा खुरपी आणायची व्हती पैकं पाठवा म्हणावं.

बाई : किती गं ?

सखूबाई : पाठवा की म्हणावं दोन इसं. अन् बाई म्हणावं पुरीला पावणं आलं हुतं बघायला. त्यास्नी काय निरोप धाडायचा हाय ? पुरीच्या लग्नाची काळजी हाय का नाय त्यास्नी ?

बाई : अगं तुझी मुलगी अजून लहान आहे. तिला शिकू दे अजून !

सखूबाई : आवं बाई, पुरीचं येळेत लगीन झाललं चांगलच हाय की, आन् शिकायचं म्हणलं तर हाय की माझा पोरगा शिकतोय न्हवं.

बाई : आगं सखू, मुलाला शिकवतेस आणि मुलीला नाही ? हा कसला न्याय ? अँग या आपल्या देशात अनेक स्त्रिया होऊन गेल्या त्यांनी आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर संपूर्ण जगाला शिकवण दिली. आणि उदाहरण द्यायचं म्हणलं तर सावित्रीबाई फुले, इंदिरा गांधी, किरण बेदी, कल्पना चावला अशी अनेक उदाहरणे आहेत.

सखूबाई : आवं बाई, तुमी मला शिक्षणाचं महत्त्वं सांगितलं ती मला पटलंय बघा. आता मी बी माझ्या पुरीला लय शिकवणार अन् तिच्या पायावर उभी करणार बघा ! आता पावन्यास्नी निरोप धाडायचा बघा, पुरीचं यंदा म्या लगीन न्हाय करू द्यायची. बाई, तुमी माझं डोळं उघडलं बघा.

बाई : बरं तुझ्या नवऱ्याचं नाव सांग...!

सखूबाई : बरं लिव्हा परतापराव पांडुरंग पायतोडे गल्लीची दिल्ली अन् थेट रेल्वे रूलावरण जायचं आन तिथं एक बारक्या पोरांची साळा हाय तिथंच.

बाई : बरं, हे घे तुझं पत्र...! आणि मुलीला शिकू दे काय ?

* * * *

# विद्यार्थ्यांची भाषिक उपयोजन क्षमता : एक अध्ययन

संशोधनपर

कु.निकिता अतुल सूर्यवंशी
बी.ए.भाग-१



**प्रस्तावना :**

महाविद्यालयीन शिक्षणात हळूहळू मराठी भाषा व मराठी माध्यमाकडे पाहण्याचा विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन उदासीन बनत चाललेला आहे. मातृभाषेपेक्षा इंग्जीचे प्राबल्य वाढत चालले आहे. त्यामुळे दैनंदिन व्यवहार व प्रशासकीय व्यवहार मराठीत असूनही त्याबद्दलची जागरुकता, अचूकता व नेमकेपणा नाही. जीवनव्यवहारातला मराठीचा भाषिक व्यवहार दिवसेंदिवस कमी होत चालल्यामुळे मराठीचे उपयोजित ज्ञानही कमी होताना दिसते. म्हणून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे उपयोजित मराठीचे ज्ञान तपासणे व त्यावर उपाय सुचवणे हे ध्यानात घेऊन 'महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची उपयोजन क्षमता : एक अध्ययन' याविषयावर सर्वेक्षण घेण्यात आले.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

प्रमाण मराठी लेखन क्षमता, इंग्रजी शब्दांचे प्रतिशब्द ज्ञान तपासणे, इंग्रजी पदनामे व इंग्रजी संज्ञांना पर्यायी शब्द सुचवण्याची क्षमता तपासणे, संगणक, सिनेमा आदि भाषिक क्षेत्राशी संबंधित परिभाषा ज्ञान तपासणे, कवितेचा अर्थ जाणून घेणे, निबंधलेखन, आराखडा तयार करणे, मराठी म्हणी व वाक्प्रचार बनवणे या भाषिक क्षमतेचा शोध घेणे, मराठी भाषिक रचना व सांस्कृतिक क्षमता तपासणे, व्यवहारभाषा व भाषिक उपयोजन कौशल्याचा शोध घेणे ही संशोधनाची उद्दिष्टे ठरविण्यात आली.

'महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे उपयोजित मराठीचे भाषिक ज्ञान दिवसेंदिवस कमी होत आहे' हे या संशोधनाचे गृहितक ठेवून सदर संशोधनासाठी दहिवडी महाविद्यालयातील बी.ए.भाग १ च्या विद्यार्थ्यांकडून प्रश्नावली भरून घेण्यात आली. प्रश्नावलीत २० प्रश्नांना दिलेल्या १५० गुणांपैकी केवळ १० प्रश्नांचे १०० गुण विचारात घेऊन हे विश्लेषण केलेले असून त्यासाठी सरासरी व टक्केवारी पध्दत वापरून मराठीच्या उपयोजन कौशल्याचा व भाषिक क्षमतेचा अभ्यास करण्यात आला. शेवटी माहितीचे विश्लेषण करून निष्कर्ष काढून उपाय सुचविण्यात आले.

**संशोधनाचे स्वरूप :**

संदर संशोधनासाठी मराठी भाषेची उपयोजन क्षमता तपासण्यासाठी 'आध्यात्मिक', 'पारंपरिक' इ. प्रमाणलेखन करणे, कॉपी, चेक असे विविध क्षेत्रातील पदनाम व परिभाषिक शब्दांचे मराठी पर्याय सांगणे, शब्दांच्या मागचे नातेसंबंध उलगडून दाखवणे, पदनामांचे मराठी पर्याय सुचवणे, नवीन व्यवसाय क्षेत्रातील मराठी भाषिक भांडाराचा शोध घेणे, कवितेचा अर्थ समजून घेण्याची क्षमता तपासणे, निबंधलेखनासाठीचे मुद्दे व आराखडा तयार करता येणे, भाषणाच्या संहितेसाठी मुद्दे सुचवणे, मराठी वाक्प्रचारांचा अर्थ, त्यांचा वाक्यात उपयोग करणे अशा भाषिक क्षमतेचा शोध घेण्यात आला.

**संशोधनाचे निष्कर्ष :**

महाविद्यालयातील ७२% विद्यार्थ्यांना प्रमाण मराठी शब्दांचे लेखन करता येते; 'चेक', 'एक्झामिनर', 'चेअरपर्सन' इत्यादी शब्दांचे पर्याय केवळ २५% विद्यार्थ्यांना अवगत आहेत; आप्तसंबंधावरच्या म्हणी फक्त २४% विद्यार्थ्यांना तयार करता आल्या; शब्दांच्या माध्यमातून नातेसंबंधाची उकल करण्याची क्षमता ६४% विद्यार्थ्यांजवळ आढळली; इंग्रजी शब्दांना मराठी पर्याय फक्त ६% विद्यार्थ्यांना सुचवता आले; 'संगणक', 'सिनेमा', 'न्यायालये' अशा व्यवसाय क्षेत्रातील भाषिक भांडार माहित असलेले विद्यार्थी ९१% आहेत; मराठी कवितेचा अर्थ उलगडून दाखवणे केवळ ६% विद्यार्थ्यांना शक्य झाले; निबंधलेखनाचे मुद्दे सुचवण्यात केवळ ७% विद्यार्थ्यांना रस वाटला; एखाद्या विषयावरील भाषिक आराखडा तयार करण्याची क्षमता केवळ ८% विद्यार्थ्यांजवळ आहे; मराठी म्हणी व वाक्प्रचार यांचे भाषिक उपयोजन करण्याची क्षमता २०% विद्यार्थ्यांजवळ आहे.



Scanned with CamScanner

या संशोधनानंतर पुढील उपाययोजना सुचवण्यात आल्या - महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रमाण शब्दांचे लेखन करण्याचा सराव वाढवणे; मराठी पदनामकोश, व्यवहार कोश व परिभाषा कोश हाताळण्याची सवय शालेय स्तरावरच वाढवणे; समाज व संस्कृती, मानवी नातेसंबंधाची जाणीव विकसित करण्याची जबाबदारी कुटुंब, शाळा व समाजाने घेणे गरजेचे आहे; व्यवसाय क्षेत्रातील भाषिक भांडार वृध्दिंगत होण्यासाठी विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानापेक्षा प्रत्यक्ष जीवनाचा अनुभव देण्याची संधी पालक व शिक्षकांनी द्यावी; मराठी कवितेचा अर्थ पाठ करून लिहिण्याची पध्दत बंद करून कवितेचा अर्थ आस्वादापेक्षा अनुभवण्याची अध्यापन पध्दत रुजवणे गरजेचे आहे; निबंध लेखन हा केवळ परीक्षेतील उपचार्त नसून तो भाषिक विचारक्षमता विकसित करण्याचा प्रकार आहे, हे विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवण्याची गरज आहे; एखाद्या विषयावरील भाषिक आराखडा, म्हणी व वाक्प्रचार यांचे भाषिक उपयोजन करण्याचा सराव नियमितपणे अभ्यासक्रमात घेण्यात यावा. या उपाययोजना केल्यास विद्यार्थ्यांची भाषिक क्षमता विकसित होईल असे वाटते.

संदर्भग्रंथ :


- व्यावहारिक मराठी : ल.रा.नासिराबादकर, फडके प्रकाशन, कोल्हापूर
- सुगम मराठी व्याकरण : मो.रा.वाळिंबे, नवनीत प्रकाशन, पुणे
- मराठी विश्वकोश, म.रा.साहित्य संस्कृती मंडळ, वाई


⁂ ⁂ ⁂ ⁂

## गोगलगाय संगणकापेक्षा जलद

संगणक आणि गोगलगाय यांचा अर्थाअर्थी काही संबंध असू शकतो काय ? आपली कल्पनाशक्ती कितीही ताणली तरी याचं उत्तर आपण देऊ शकत नाही. गोगलगाईंना लसूण वा त्याचा वास याचं वावडं आहे. लसणीचा वास असला तर आवडते पदार्थही गोगलगाय खात नाही. बागेत सापडणाऱ्या बिनशंखांच्या गोगलगाईंना गाजर, टोमॅटो इ. आवडते; पण लसणीचा वास आला तर ती दुसरीकडे वळते.

आपल्या स्मरणातल्या आवडत्या पदार्थांचा वास आणि आपल्याला न आवडणारा वास यांची तुलना करून तिनं नवीन ज्ञान प्राप्त केलेलं असतं. या ज्ञानार्जनामुळे त्या गोगलगाईंच्या मध्यवर्ती चेतासंस्थेचा अभ्यास करून संगणकशास्त्रज्ञ संगणक निर्मितीत सुधारणा करतात. संगणकात नवी प्रणाली आणतात.

पण गोगलगाईचं का ? इतर सजीव आहेत की गोगलगाईपेक्षा बुध्दिमान ! गोगलगाईची चेतासंस्था तिचा मेंदू हे अभ्यास करायच्या दृष्टीने सोपे आहेत. दोन गोष्टींची तुलना करून नवीन गोष्टी शिकणे हे गोगलगाईस सहज जमते; पण ते कुठल्याही महासंगणकासही अजून तरी जमलेले नाही. गोगलगाईच्या मेंदूपुढे मानवी संगणक अगदीच क्षुल्लक आहे.

गोगलगाईच्या चेतासंस्थेस जेमतेम ५ लक्ष चेतापेशी असतात. त्यामानानं इतर प्राणी किंवा माणूस यांची चेतासंस्था जटिल असते. गोगलगाईच्या मेंदूचा अभ्यास करून तिच्या चेतासंस्थेस आराखडे सूक्ष्म चकत्यांवर निर्माण करायचा प्रयत्न हाती घेतला आहे.

संगणकात वापरण्यात येणाऱ्या एका सूक्ष्मसंग्राहक चकतीत ५४ चेतापेशींचे कृत्रिम जाळे करण्यात काही दशकात पूर्वी शास्त्रज्ञांना यश आले होते. गोगलगाईच्या चेतासंस्थेचा अभ्यास आणखी एका दृष्टीनं महत्त्वाचा आहे, तो म्हणजे समांतर विचार मालिकांची निर्मिती मानवी कृतीत अनेक ज्ञानेंद्रिये सहभागी असतात. ही किमया संगणकाला लाभली तर त्याची कामे जलदगतीने होतील.

आपल्याशी कोण बोलतंय ? हे जाणून संगणकाकडून आपल्या प्रश्नांची उत्तरे मिळतील असे संगणक निर्माण करणे गोगलगाईच्या अभ्यासाने शक्य होणार आहे.

कु.अक्षता सुनिल माने
बी.एस्सी.-१



Scanned with CamScanner

# शिखरशिंगणापूर परिसरातील पर्यटन स्थळे

पर्यटनविषयक

दत्तात्रय श्रीराम मोहिते
बी.ए.भाग-१



श्री महादेव हे देवस्थान खूप प्रसिध्द असून हे शिंगणापूर या गावात आहे. महादेव देवस्थानाचाच एक भाग म्हणून ओळखले जाणारे गुप्तलिंग हे सुध्दा खूप प्रसिध्द देवस्थान व पर्यटन स्थळ आहे. एक निसर्गरम्य ठिकाण आणि आपल्या मनाला खेचून घेणारे हे एक ऐतिहासिक व पर्यटन स्थळ शिंगणापूर या गावात असून अनेक पर्यटक या पर्यटन स्थळांना भेटी देतात. तेथील असणाऱ्या देवस्थानचे म्हणजेच महादेव मंदिरातील महादेवाचे दर्शन घेण्यासाठी एक रांग आहे. या रांगेत गर्दी श्रावण महिन्यातील प्रत्येक सोमवारी नक्कीच पाहायला मिळते. अनेक भाविक भक्त आपल्या काही शंका, अडचणी घेऊन या देवस्थानात प्रवेश करतात तर त्यांच्या शंकांचे निवारण करण्यासाठी ते महादेवाच्या मूर्तीसमोर नतमस्तक होतात. या ठिकाणी विधीसाठी काही ब्राह्मण मंडळी आपला प्रस्ताव प्रत्येक प्रेक्षकाला सांगताना दिसतात. ही सर्व स्थिती आपणाला महादेव मंदिरातील पाठीमागच्या दरवाजातून पुढे आल्यानंतर उजव्या बाजूस वळल्यानंतर एक तरी ब्राम्हण गृहस्थ आपणाला म्हणेल की तुमचा अभिषेक करायचा आहे का ? येणाऱ्या प्रेक्षकाला त्याविषयी काही माहिती नसते. परंतु देवाच्या नावाखाली, त्या विधीच्या नावाखाली तसेच अभिषेकाचा आधार घेऊन प्रेक्षकांची फसवणूक केली जाते. तरी प्रेक्षकांनी या अंधश्रध्देला बळी न पडता ते अयोग आहे याचा विचार करावा. एखाद्या प्रेक्षकाला खरंच वाटत असेल की हे अभिषेक, शांती केल्यामुळे आपलं चांगलं होतंय किंवा आपल्या घरचे वातावरण बदलते तर ते चुकीचे आहे. 'होणाऱ्या गोष्टी होतच असतात. परंतु काही गोष्टी आपणच घडवून आणतो.' उदा ब्राम्हण गृहस्थ सांगतो आहे की अभिषेक करा म्हणून अभिषेक करणे ही अंधश्रध्दा आहे.

या अंधश्रध्देला बळी पडणे चुकीचे आहे. अंधश्रधदेला बळी न पडणे हे आपण घडवून आणू शकतो. हे समजून घेतले पाहिजे. आपण या देवस्थानाची भेट घ्यायला जातो याचे कारण हे एक पर्यटन स्थळ आहे. त्यामुळे या स्थळाला आपण भेट देतो हे आपले कार्य असते. परंतु कोणत्याही अंधश्रध्देला बळी न पडणे हे सुध्दा आपले कार्य असते. आपण प्रेक्षक म्हणून पाहायला गेलो आहे, त्या पर्यावरणाचा आनंद घ्यावा. ते पर्यटन स्थळ आहे. परंतु हे पर्यटनस्थळ त्याच्या पर्यावरणामुळे आणि वैशिष्ट्यांमुळे हे पर्यटन स्थळ आहे.

प्रत्यक्षपणे आपण पाहिले तर आढळून येते की हे देवस्थान खूप प्राचीन आहे. तेथील प्राचीन मूर्त्यांवरून समजते की, हे देवस्थान खूप प्राचीन आहे. हे देवस्थान म्हणजेच महादेव देवस्थान उंच डोंगरावर स्थिर आहे. त्यामुळे किल्ल्यासारखी त्या मंदिराच्या कडेने २० फूट अंतर सोडून तटबंदी आहे. ही तटबंदी ७ ते १० फूट उंचीची आहे. त्या तटबंदीची जाडी आजच्या बांधकामाच्या स्वरूपाने खूप विस्ताराची आहे त्याची जाडी म्हणजेच तटबंदीची रूंदी २ ते ३ फूट आहे. त्या भिंतीवर २ ते ३ व्यक्ती आरामात बसू शकतात.

पर्यटकांना पाहण्यासाठी दुसऱ्या स्थानावरचे आणि महादेव देवस्थानाचाच एक भाग म्हणजे 'गुप्तलिंग' होय. हे एक निसर्गाच्या सहवासात आणि सर्वांच्या मनाचे लक्ष वेधणारे हे प्रसिध्द पर्यटन स्थळ आहे. या पर्यटनस्थळावर आगमन केल्यानंतर आपणाला आढळून येईल जरी या भागात पावसाचे प्रमाण कमी असले तरी हे पर्यावरण खूप विलक्षणीय व मनाला प्रसन्न करणारे आहे. आपणाला या ठिकाणी हिरव्यागर्द झाडीचा परिसर पाहायला मिळतो. आपण कधीही या पर्यटनस्थळाला भेट द्यायला गेलो तर एक गोष्ट कायम आढळून येते की, आपणास प्रवेशद्वाराजवळ माकडे पाहायला मिळतात. प्रवेशद्वारातून आतमध्ये आल्यानंतर गुप्तलिंग हे मंदिर दिसते. हे मंदिर खूप लक्षवेधी आहे. त्या मंदिरामध्ये पिंड आहे पण ती पिंड पाण्यात आहे. ती आपणास दिसत नाही कारण ती पाण्यात आहे. आपण दर्शन घ्यायला गेल्यानंतर त्या पाण्यामध्ये हात ठेवला की आढळून येते की तिथे पिंड आहे. त्याचे एक वैशिष्ट्ये आहे, या पिंडीवर आपणाला कायम पाणी पाहायला मिळते हे तेथील वैशिष्ट्ये आहे. कारण कितीही उन्हाळा असला तरीसुध्दा त्या पिंडीवरचे



Scanned with CamScanner

पाणी कमी होत नाही ते आहे तेवढेच असते. पिंडीचे दर्शन घेतल्यानंतर आपण बाहेर आलो की मंदिराच्या पाठीमागे उंच कडा आहे आणि त्या कड्याच्या पायथ्याशी झरा आहे. त्या झऱ्यातील पाणी कितीही उष्ण वातावरण असले तरी थंडच असते. महादेव देवस्थानाची सात लिंगे आहेत. त्यापैकी गुप्तलिंग हे एक महत्त्वाचे आणि निसर्गरम्य व पर्यटकांना आकर्षित करणारे पर्यटनस्थळ आहे.

वरील वर्णनामध्ये आपणाला महादेव देवस्थानाचे आणि गुप्तलिंग या देवस्थानाचे वर्णन दिसून आले. परंतु शिंगणापूर देवस्थानातील महादेव देवस्थानाला संलग्न व त्याचा अविभाज्य घटक म्हणजे 'मुंगीघाट'. मुंगीघाट हे पर्यटन स्थळ आहे. परंतु पावसाळ्यामध्ये या मुंगीघाटात हिरवळ पाहायला मिळते. ज्यावेळी महादेव या देवस्थानाची यात्रा असते. त्यावेळी मुंगीघाटात अनेक भाविकभक्त आपणास पहायला मिळतात. ही यात्रा सहा ते सात दिवस असते. त्यामध्ये पहिल्या दिवशी एकादशी असते. त्यानंतर दुसऱ्या दिवशी बारस आणि तिसऱ्या दिवशी तेरस अशी या यात्रेची मांडणी असते. बारस या दिवशी अनेक कावडी मुंगीघाटातून वरती आणल्या जातात. परंतु त्यामधील सर्वात महत्त्वाची आणि सर्वात जास्त मानाची कावड म्हणजे 'तेल्याभुत्याची कावड'. तेल्याभुत्याची कावड वरती येताना जे दृश्य असते. ते दृश्य पाहण्यासाठी ९०,००० ते १,००,००० पर्यंत भाविकभक्त समाविष्ट असतात. या कावडीची उंची २५ ते ३० फूट असते व ही कावड पडू नये म्हणून ९ त १० कासरे भक्तांच्या हातामध्ये असतात. ही कावड वरती येताना एक गर्जना केली जाते आणि ती म्हणजे 'हर हर महादेव, हर हर महादेव !' ही होय.

* * * *

## आई

कोणत्या शब्दात सांगू आई
तू माझ्यासाठी काय आहेस....?

भूकेल्या जिवाचा मायेचा घास तू
वेदनेनंतरची माझी पहिली हाक तू
अन् माझा प्रगाढ विश्वास तू
हृदयाच्या स्पंदनातील माझा
प्रत्येक श्वास तू....!

जीवनातील माझ्या सुखाची बाग तू
आधीमधी रागात सूर्याची आग तू
अंधारालाही दूर करणारा प्रकाश तू
माझी मायेची धरती अन्
छायेचं आकाश तू....!



मायेच्या पावसाचा ओलावा तू
जीवनी सुखाचा गारवा तू
आई, दुधरूपी अमृताचा गोडवा तू
अन् शेवटच्या
क्षणापर्यंतचा कुशीतील विसावा तू....!!

कु.तनुजा सूर्यकांत चव्हाण
बी.कॉम.-१



## झिंगझिंग झिं[illegible]

मनात होतय धडधड
रडू जवळ आलया
आन् अंगात भरलय वार
नोटा बदलयाची वेळ आलीया
आता पैसा घेतोया मग हाव सुटलीया
आन् करून दोन नंबरचा धंदा पुढे आलोया
फाडतोया हजार-पाचशे
मागतोया शंभर-दोनशे कर बसतोया
आता उतावळा झालो नोटा बदलाया आलो
पोतं भरून आलोया लय घाबरून गेलोया
गरीबांच्या ठेवून पोटावर पाय पैसे कमवत आलोया
सगळ्या लोकांत मी काळा पैसा आणलाया
समद्यांत आधी मला झालीया
नोटा बदलायची घाई
मोदी कहेते हैं ना
अच्छे दिन आने वाले है भाई ।

कु.भाग्यश्री सुखदेव राऊत
बी.कॉम.-१

# मनी मानसी-भाषेच्या सिध्दांतावर मात करणाऱ्या आईच्या जिद्दीची कहाणी

ग्रंथसमीक्षा

कु.मोनिका दादासो जाधव
बी.ए.भाग-१

जन्मत:च कर्णबधीर असलेल्या मुलीचे जीवन बदलायला निघालेल्या आईचे आणि त्याबरोबरच तिच्या मुलीचे घडणे ह्या समांतर गोष्टींचा अनुभव एकाचवेळी वाचक घेतो. आईची प्रतिज्ञा, तिचा अहर्निश संघर्ष पराभवाच्या अनेक शक्यतांतून तिने काढलेला मार्ग हे सगळे वाचताना आपण केवळ थक्कच होत नाही तर हा मार्ग इतरांना मार्गदर्शक ठरेल याची खात्री पटते. एकाचवेळी आई आणि मुलगी ह्या दुर्दैवी खेळात जिंकतात तेव्हा दोघींनाही मनापासून दाद द्यावीशी वाटते. भाषा, विज्ञान, ध्वनिसिध्दांत आणि विशेष मुलांचे भवितव्य समजून घेऊन उत्तम, आदर्श पालक व शिक्षक कसे व्हावे याचा वस्तुपाठ घालून देणारे हे पुस्तक आहे. आयुष्यभर आपल्या मनी फक्त मानसीला ठेवणाऱ्या आईचे हे कथन आपल्याही मनी कायम रेंगाळत राहील हे मात्र नक्की !

हा ग्रंथ वाचताना लेखिकेची शैलीही मोहविते, 'माझ्या चिमणीला चिवचिवताच येत नव्हतं. झाडं बोलतात, पानं बोलतात, झरे आणि पाखरेही बोलतात. मग माझ्या लेकराचा स्वर कुठे गेलाय ? या प्रश्नाने मी पुरती कोसळले. कारण माझ्या चिमणीचा फक्त सूरच हरवला नव्हता तर ज्या सुरांसाठी श्रवण हवं असतं ते श्रवण करण्याची क्षमताही हरवून आलेली माझी छकुली मानसी कधी चिवचिवणारच नाही कां ?' या प्रश्नांनी सुरू झालेली मानसीच्या अवघड जीवन प्रवासाची आणि तिची आई ऊर्मिला हिची ही कहाणी माणसाच्या अथक कष्टाला प्रेम, जिद्द आणि परिश्रम या मूल्यांना जिवंत ठेवणारी आहे.

श्रीमती ऊर्मिला आगरकर यांना आपली मुलगी कर्णबधीर आहे हे कळल्यावर त्यांनी तिला मूकबधीर व कर्णबधीर होऊ नये म्हणून प्रयत्न केले. २००३ साली मानवी ज्ञानप्रबोधिनीत शिकत असताना स्थानिक चॅनलवरील मुलाखत प्रसारित झाली. मानसी कर्णबधीर असतानाही मी तिला कसं शिकवलं या उत्सुकतेतून व्याख्यानांना निमंत्रणे आली.




कर्णबधीर मुलांना कसं घडवावं, ते घडवणं ही समस्या न मानता ते एक आव्हान समजून कसं स्वीकारावं हे त्यात सांगितलं आहे. त्यामुळे माझं जगणं जसं सुंदर झालं, इतरांनाही जगणं सुंदर करता येईल. पालक, शिक्षक, या क्षेत्रात काम करणारे समाजसेवक, शाळा, सार्वजनिक संस्था यांना नक्कीच मार्गदर्शनीय ठरेल. या प्रवासात ज्यांनी ज्या संवेदनशील माणसांनी मदत केली ते सगळे जीवाभावाचे झाले. त्या सर्वांचे आभार मानण्यापेक्षा मी त्यांची सदैव ऋणी राहीन.

मानसीच्या दोन्ही कानातून पाणी वाहू लागलं. हिरवागार पू दोन्ही कानांतून यायचा. तिचं डोकं बांधलेलं टोपडं भिजायचं. मी तिला घेऊन बालरोग तज्ज्ञांकडे गेले. सासूबाईंचा घरात वचक होता. खरंच आपल्या प्रथापरंपरा याला शास्त्र आहे म्हणून पूर्वजांनी चालवलेल्या आहेत काय ? असं वाटतंय. मानसी जन्मल्यापासून दिवसाही झोपायची नाही व रात्रीही सतत जागी असायची. तिला चौथा महिना लागला, मानसीला आवाज ऐकू येत नाही, तिच्या चेहऱ्यावर कसलेही भाव नसायचे. डॉक्टरांनी जो रिपोर्ट दिला त्यात त्यांनी सांगितलं, 'मानसीला ११० डेसिबल हा सर्वात शेवटचा मोठा धक्का बसला मला की, आयुष्यातील हा दुसरा मोठा धक्का होता. पहिल्या आईच्या अपघाताचा आणि आता हा मानसीच्या टेस्टच्या रिपोर्टचा. माझ्या पायाखालची जमीनच सरकली, मी पूर्ण कोसळून गेले. डोळ्यातून घळाघळा पाणी वाहू लागलं.

माझ्या पोटी आलेल्या मुलीची मी स्वप्न आणि चित्र रंगवत होते पण ज्या कागदावर आपण चित्र काढणार आहोत, एक सुंदर चित्र रेखाटणार आहोत त्या कागदावर तर काहीच उमटत नाही याची मला जेव्हा त्या टेस्टमधून माहिती झाली तेव्हा संपूर्ण आयुष्य कोऱ्या कागदासारखं भकास वाटू लागलं. ते इतकं पांढरंफटक दिसू लागलं की, त्यांनाही डोळ्यांसमोर अंधार दाटू लागला. ''ही नुसती



Scanned with CamScanner

कर्णबधीरच नाही तर मुकीही आहे. आता तुम्ही असं करा, तिला जिल्हाळा मतिमंद मुलांच्या शाळेत तिला धेऊन जा.'' तिच्या कानावर आवाजच पडत नाही, तर ती आवाज कशी काढणार ? म्हणजे मग ती बोलूही शकणार नाही. म्हणजेच ती मुकी राहणार. माणसाला दिसायला तर ती अगदी छान दिसायची. ज्यावेळी आपण एखादा शब्द बोलतो तेव्हा तो शब्द कानावर पडतो. तो शब्द कानातून पोहोचला जातो आणि मग मेंदू त्याचा अर्थ लावतो. आपण काय बोलतो किंवा समोरच्या व्यक्तीने काय शब्द उच्चारले.

लेखिका सांगते, 'एकीकडे तिचा एक तळहात माझ्या तिच्या गळ्याखाली पालथा ठेवायला आणि तिचा दुसरा तळहात माझ्या गळ्याखाली. ठेवलेल्या तिच्या हाताला मी आऽऽ स्वर उच्चारायची म्हणजे तिला माझ्या गळ्याखाली ठेवलेल्या तिच्या हाताखाली तिच्या गळ्यातून कंपनं निर्माण होतात हे जाणवून देण्याचा हा प्रयत्न. मानसीला हे सर्व वर्ण म्हणजेच अक्षरं स्वरांचा कसला ही आवाज न ऐकता उच्चारायचे होते. प्रत्येक वर्ण कोठून कसा उच्चारायचा त्याची कंपनं हवा दाखवून प्रत्येक वेळी उच्चार शिकवायचा होता. ही तशी महान गोष्ट. खरंच मानसीचं हे व्यंग असेल तर त्या व्यंगाला आपण आधार घेऊन तिचं ते व्यंग नाहीसं करत तिच्या जगण्याला चांगला आकार आणण्यासाठी आपलं टॅलेंट वापरू शकतो. तिच्या सुंदर जगण्याच्या निर्मितीसाठी आपण स्वत:ला पणाला लावू शकतो.

**दोन दशकांच्या संघर्षानंतर तिनं हरवलं नियतीला ! कर्णबधीरावर मात करीत मानसी बनली अभियंता !**

जन्मापासून नियतीने १०५% बहिरेपणा दिलेला. परंतु आपली मुलगी कर्णबधीर म्हणून न जगता सर्वसामान्यांप्रमाणेच जगली पाहिजे. हा आईचा दुर्दम्य आशावाद घेऊन तिनं संघर्ष सुरू केला. तब्बल वीस वर्ष नियतीसोबत केलेल्या संघर्षाअखेर तिचाच विजय झाला. मानसी राजेंद्र आगरकर या कर्णबधीर विद्यार्थिनीनं चक्क अभियांत्रिकी परीक्षेत ७०% गुण मिळवून 'हम भी कुछ कम नहीं' हे दाखवून दिले आहे. मानसी आगरकर ही कर्णबधीर चार महिन्यांची असताना तिची आई उर्मिला यांना आपल्या मुलीला कर्णबधीरत्व असल्याचं लक्षात आल्यानंतर त्यांच्या पायाखालची वाळू सरकली. परंतु 'असाध्य ते साध्य करिता सायास । कारण अभ्यास तुका म्हणे ।' या संत तुकारामांच्या उक्तीचा आधार घेत त्यांनी पुण्यातील के.ई.एम. हॉस्पिटल गाठले. तेथे अपंग पुनर्वसन केंद्रात मानसीला स्पीच थेरपी दिली. तसेच मुलांना शिकवण्याचं प्रशिक्षण स्वत: घेतलं. ऐकू येत नसल्यामुळे बोलूही न शकणाऱ्या मानसीला तिच्या आई उर्मिला यांनी अक्षरश: एक एक शब्द चित्रांसह शिकवून तिची आकलनशक्ती वृध्दिंगत केली. पुणे, मुंबईतील शाळा तसेच ज्ञानप्रबोधिनी शाळेतील शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे मानसीला हे यश मिळाल्याचा उर्मिला आगरकर यांनी आवर्जून उल्लेख केला.

* * *



## निर्ष्पण झाडांनो....

निर्ष्पण झाडांनो....
सुचते का तुम्हाला एखादी कविता
पानगळ झाल्यावर ?
किंवा कधी झोंबरा वारा
अंगाला बिलगल्यावर ?
निष्पर्ण झाडांनो....

आलचं आभाळ भरून तर
नाचता का तुम्ही आतल्या आत ?
नाहीच पाऊस पडला तर
उदासी भरून येते का तुमच्या मनात ?
निर्ष्पण झाडांनो....

येते का आठवण पाखरांची
ते आपलं घरटं सोडून गेल्यावर ?
वाटते का खंत कधी
उन्हातल्या वाटसरू तुम्हापाशी थांबल्यावर ?
निर्ष्पण झाडांनो....

कुणापाशी मांडता का तुम्ही
व्यथा तुमच्या अंतरातील खोल ?
उद्ध्वस्त माळरानी सुद्धा
लाभते का तुम्हाला जगण्यापुरती ओल ?

कु.स्नेहल दत्तात्रय जगताप
बी.ए.-२



Scanned with CamScanner

# विद्यार्थी कॉपी का करतात ?

संशोधनपर

कु.कोमल हरिश्चंद्र कदम
बी.ए.भाग-१



महाविद्यालयातील कु.कोमल कदम या शिक्षणशास्त्र विषयाच्या विद्यार्थीनीने प्रा.विजय पाटोळे यांच्या मार्गदर्शनाखाली 'विद्यार्थी कॉपी का करतात ?' या विषयावर लघुसंशोधन प्रकल्प केला, त्यातील हे निष्कर्ष.

भारत जगात दुसऱ्या क्रमांकाची महासत्ता बनण्याची वाटचाल करीत आहे. त्याच्या या प्रवासात शिक्षणाचे योगदान महत्त्वाचे आहे. भारताची २१व्या शतकाकडे यशस्वी वाटचाल होताना दिसत आहे. विद्यापीठ शिक्षण आयोग (१९४८-४९)च्या मते 'Universitites are the homes of intellectual adventures' विद्यापीठ हे बौध्दिक साहसाची वसतिस्थाने आहेत, असे राधाकृष्णन आयोगाने म्हटले तर कोठारी आयोगाने शिक्षणात १०+२+३ असा आकृतिबंध स्वीकारला. पंतप्रधान राजीव गांधी यांनी वैज्ञानिक व आर्थिक पायासाठी शैक्षणिक गुणवत्तेवर व त्यासाठी ग्रामीण भागात नवोदय विद्यालयाची स्थापना यावर भर दिला. सन २०११च्या जनगणनेनुसार भारतात १५२ केंद्रीय विद्यापीठ, ३१६ राज्य विद्यापीठे, १९१ खाजगी विद्यापीठे व १८०० महिला महाविद्यालये आहेत. अशाप्रकारे शिक्षणाचे स्वरूप व व्याप्ती मोठी असूनही आज शिक्षण क्षेत्रात कॉपी करण्याचे प्रमाण फार वाढले आहे. एक प्रकारची कीड लागली आहे.

**संशोधनाचे महत्त्व :**

आपल्या शिक्षण पध्दतीत विद्यार्थ्यांचे मूल्यांकन करण्यासाठी परीक्षा ही व्यवस्था वापरली जाते. मात्र विद्यार्थी अभ्यासापेक्षा परीक्षेत गैरमार्गाचा अवलंब करतात. विद्यार्थ्यांचे मूल्यमापन सर्व जरी परीक्षेद्वारे करता येत नसले तरी परीक्षेला पर्याय पण उपलब्ध नाही. काही विद्यार्थी हे कधीच अभ्यास करीत नाहीत व कसा तरी अभ्यास करून कॉपीवर निर्भर असतात. वेगवेगळे कॉपीचे मार्ग वापरले जातात. आजकालचे विद्यार्थी हे कानातील हेडफोन, शर्टचा वेगवेगळ्या पध्दतीने वापर, अंगावर, हातावर लिहून आणणे अशा कितीतरी गैरमार्गांचा अवलंब करतात. याद्वारे हुशार विद्यार्थ्यांचे अप्रत्यक्षरीत्या नुकसानच होते. कॉपी केल्यामुळे परीक्षा कक्षातील वातावरण बिघडते. शिक्षकांना धमकी देण्याचे प्रमाण, हाणामारीचे प्रकार सर्रास घडून येतात. नोटस्, गाईड, पुस्तके इ. चे सूक्ष्म स्वरूपातील आदान-प्रदान वर्गात होत असते. विशेषतः काही ठिकाणी कॉपी पुरविणारेही असतात. जर असेच घडत राहिले तर शिक्षणाद्वारे कधीही गुणवत्ता राखली जाणार नाही.

विद्यार्थ्यांना जर उत्तम अध्यापन केले तर निश्चित ते कधीही कॉपी करणार नाहीत. प्रभावी अध्यापन व अध्ययन सवयी विद्यार्थ्यात जर निर्माण केल्या तर त्यांनी अशा गैरमार्गाचा उपयोग होणार नाही. कॉपीमुक्त शाळा, महाविद्यालये झाली तर नक्कीच देशाची प्रतिमा व प्रगती झाल्याशिवाय राहणार नाही. प्रतिबंधात्मक उपाययोजना जर महाविद्यालयाने केली तर, वेळीच पोलिसात तक्रार केली तर हे सर्व प्रमाण कायमचे निघून जाईल. विद्यार्थ्यांची दैनंदिन उपस्थिती जर अनिवार्य केली तर नक्कीच ते फक्त स्वअभ्यासावर अवलंबून राहतील. विद्यार्थ्यांशी हितगुज, नवनवीन प्रयोग, प्रकल्प राबविले तर ते अभ्यासात रमतील, स्वतंत्रपणे विचार करतील आणि त्याचे शिक्षणातील सर्व अडथळे दूर होतील.

विद्यार्थ्यांच्या परीक्षेत कॉपी करण्याच्या सवयींचा शोध घेणे, विद्यार्थ्यांच्या परीक्षेत कॉपी करण्यामागील सवयींच्या कारणांचा शोध घेणे, परीक्षेत कॉपी करण्यापासून प्रतिबंधात्मक उपाययोजना सुचविणे आणि सर्व परीक्षार्थींना कॉपी करण्याचे विविध मार्ग माहिती आहेत. विद्यार्थ्यांना परीक्षेची भीती वाटत नाही, हे गृहितके ठेवून हे संशोधन करण्यात आले.

**संशोधनाची व्याप्ती :**

सदर संशोधन हे शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील दहिवडी कॉलेज, दहिवडी मधील वरिष्ठ महाविद्यालयाशी सर्व विद्याशाखांशी संबंधित आहे. सदर संशोधन हे दहिवडी कॉलेजमधील महाविद्यालयातील फक्त ३० विद्यार्थ्यांशी संबंधीत होते.



Scanned with CamScanner

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर कार्यक्षेत्रातील सर्व वरिष्ट महाविद्यालये व त्यात प्रवेश घेतलेले सर्व शाखांचे विद्यार्थ्यांपैकी दहिवडी कॉलेजमधील सर्व शाखांत शिकणाऱ्या तृतीय वर्षातील ३० विद्यार्थी हे सहज उपलब्ध होतील या पध्दतीने नमुना निवडला आहे. त्यासाठी प्रश्नावली या साधनाचा वापर संशोधकाने केला आहे. माहितीसाठी शेकडेवारी या सांखिकीय साधनांचा तसेच आलेख, वर्तुळालेख यांचा वापर करण्यात आला.

**प्रश्नावली :**

सदर लघुसंशोधनात या प्रश्नांचा समावेश करण्यात आला आहे. आपल्या जीवनातील ध्येय काय ? शिक्षणामुळे तुमचे चारित्र्य घडते असे तुम्हाला वाटते का ? शैक्षणिक जीवनात आपण कधी कॉपी (नक्कल) केली आहे का ? कॉपी (नक्कल) केल्यामुळे तुम्हाला काय फायदा होतो असे वाटते ? कॉपी (नक्कल) करण्याची का गरज वाटते ? परीक्षा दरम्यान पुस्तक, नोटस् व बाजारातील इतर अभ्यास पुस्तकांची सुक्ष्म स्वरूपातील प्रत (रिडक्शन) काढण्यासाठी प्रत्यक्ष किती खर्च येतो ? तुमच्या वर्गातील किती टक्के विद्यार्थी कॉपी करतात असे तुम्हाला वाटते ? वर्गातील विद्यार्थ्यांना सहजासहजी कॉपी करता येते कारण ? तुमची कॉपी पकडल्यावर तुम्हावर काय कारवाई करण्यात आली ? उत्तर येत नसेल तर दुसरे विद्यार्थ्यांना उत्तर विचाराने ही सुध्दा एक कॉपी आहे याशी सहमत आहात का ? शक्यतो तुम्ही कॉपी कशाच्या संदर्भात करतात ? तुम्ही कॉपी अभ्यासक्रमाच्या कोणत्या भागावर करतात ? कॉपीपेक्षा अभ्यास करून पेपर लिहिल्यावर चांगले गुण मिळतात असे तुम्हाला वाटते का ? शिक्षणाला कॉपीची कीड लागण्याने गुणवत्ता रसातळाला गेली असे तुम्हाला वाटते कां ? विद्यार्थी कॉपी कोठे कोठे करू शकतात व कोठे कोठे लपवू शकतात ? वर्गात कधीच कॉपी होऊ नये म्हणून काय काय उपाय योजना तुम्हाला सुचविता येतील ते लिहा. या प्रश्नांचा शोध या संशोधनात घेण्यात आला.

**निष्कर्ष :**

खालील प्रश्नांना विद्यार्थ्यांनी दिलेला प्रतिसाद सविस्तरपणे मांडलेला आहे. नोकरी करणे हे ध्येय मानणारे ६०% विद्यार्थी आहेत, शिक्षणामुळे चारित्र्य घडते असे १००% विद्यार्थी मानतात, शैक्षणिक जीवनात कॉपी केलेले ५०% व कॉपी न केलेले ५०% विद्यार्थी आहेत. कॉपी केल्यामुळे अभ्यासाची गरज नाही असे म्हणणारे केवळ ३०% विद्यार्थी आहेत, कॉपी केल्यामुळे अभ्यासाची गरज नाही असे ३०% विद्यार्थ्यांचे मत आहे, इतर विद्यार्थी कॉपी करतात म्हणून कॉपी केली जाते असे ६०% विद्यार्थ्यांचे मत आहे, सूक्ष्म स्वरूपातील कॉपीची छायांकित प्रतीसाठी सरासरी रु.१०० खर्च असे ६०% विद्यार्थी मानतात. विद्यार्थ्यांना सहजासहजी कॉपी करता येते. कारण ६०% विद्यार्थी असे मानतात की शिक्षक अशा बाबींकडे दुर्लक्ष करतात. तर ३०% विद्यार्थ्यांचे मते ढिले पर्यवेक्षणामुळे कॉपी केली जाते. परीक्षेदरम्यान दुसऱ्या विद्यार्थ्यांना विच[illegible] असते असे ७०% विद्यार्थी मानतात. अवघड [illegible] आधारीत कॉपी केली जाते असे ७०% विद्यार्थ्या[illegible] कॉपी करण्याचे प्रमाण वाढल्यामुळे गुणवत्ता [illegible] आहे असे १००% विद्यार्थ्यांचे मत आहे. कॉपी करण्याचे विविध मार्ग म्हणजे पँट, हातावर लिहिणे, पादत्राणे, पेनात, नोटपॅड, कॉलर, बेंच, चपला इ.चा वापर केला जातो.

**कॉपी करणे**




शिक्षण क्षेत्रात आतापर्यंत कॉपी या विषयावर संशोधन झालेले नाही. या संशोधनामुळे कॉपी मुक्त परीक्षांबाबत नाविन्यपूर्ण सूचना प्राप्त झाल्या. याच्या आधारे भविष्यात परीक्षांचे आयोजन करताना महाविद्यालयांना सोयीचे होऊन गुणवत्तायुक्त विद्यार्थी निर्माण करता येतील हेच या संशोधनाचे फलित आहे.

या संशोधनातून पुढील उपाययोजना सुचवाव्या वाटतात. परीक्षेदरम्यान प्रत्येक महाविद्यालयाने परीक्षा कक्षात सी.सी.टी.व्ही. छायाचित्रण यंत्र लावावेत; महाविद्यालात परीक्षा कक्षात भ्रमणध्वनी संदेश लहरी प्रतिरोध यंत्र लावावेत; परीक्षा वेगवेगळ्या संचात हव्यात; परीक्षा कक्षात दोन पर्यवेक्षकांनी पर्यवेक्षण करावे; कडक पर्यवेक्षण करावे; परीक्षा सुरू होण्यापूर्वी विद्यार्थ्यांची कसून झडती घ्यावी; शिक्षेची अंमलबजावणी व्हावी.

**संदर्भ सूची :**

१. धनवडे, नंदकुमार व धनवडे सुरेखा, भारतातील शिक्षणाचा विकास : फडके प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र. ५५, ८५, १०५.
२. Wikipedia-Indian Education, retrieved on 01.12.2018 at 9.29 am.

* * *



Scanned with CamScanner

# आंतरराष्ट्रीय सेफक टकरा खेळाडू : कु.अपेक्षा अनिल दडस

मुलाखत



मुलाखतकार : कु.काजल चंद्रकांत दडस, कु.तनुजा विजय कदम, एकनाथ हणमंत वाघमोडे, बी.ए.भाग-१

**बँकॉक, थायलंड येथे झालेल्या सेपक टकरा आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झालेल्या कु.अपेक्षा अनिल दडस या महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनीची मुलाखत.**

काजल : तुमचा थोडक्यात परिचय सांगा.

अपेक्षा : माझे नाव कु.अपेक्षा अनिल दडस असून मी पांगरी, ता.माण, जि.सातारा या गावची रहिवासी आहे. सध्या मी बी.एस्सी. अॅग्री-३ या वर्गात नेसरी या ठिकाणी शिकत आहे. मी २०११-१२ या वर्षी इ.१२वी दहिवडी कॉलेज, दहिवडी मधून पूर्ण केली.

तनुजा : सेपक टकरा या खेळाबद्दल माहिती सांगा.

अपेक्षा : सेपकटकरा हा खेळ पाय व डोक्याने खेळला जातो. या खेळामध्ये पाच खेळाडू असतात. यातील तीन खेळाडू मैदानात खेळतात. आणि दोन खेळाडू हे राखीव असतात. नेटची उंची १.५२ मी.असते. नेट हे ग्राऊंडमध्ये service circle groundच्या मधोमध असते. सेपकटकरा या खेळाचा बॉल हा synthetic fyber पासून बनवलेला असतो.

एकनाथ : या खेळाबद्दल तुम्हाला आवड कशी निर्माण झाली ?

अपेक्षा : आपला माण तालुका हा आधीच दुष्काळग्रस्त त्यामध्ये मग प्रश्न येतो पोटा-पाण्याचा. ही परिस्थिती लहानपणापासूनच अनुभवली असल्याने मनात एक भावना होती की आपण या दुष्काळाला टक्कर दिली पाहिजे. लहानपणापासून खेळाची आवड होती. पालकांचे पाठबळ तसेच दुष्काळाची जाण खेळाविषयी असणारी आवड यांमुळे मी या खेळाकडे आकर्षित झाले. यातूनच या खेळाविषयी आवड निर्माण झाली.

काजल : खेळाडू म्हणून कोणाकोणाचे मार्गदर्शन लाभले ?

अपेक्षा : आपलं व्यक्तिमत्व जर घडवायचं असेल तर आपल्याला बहुमोल मार्गदर्शन मिळणं आवश्यकच असते. त्याप्रमाणेच मला माझी जडण-घडण होण्यात मदत झाली. ती चंद्रकांत भोईटे व लता भोईटे यांची.

तनुजा : आपणास कुटुंबाची साथ कशा प्रकारे लाभली ?

अपेक्षा : घरच्यांच्या सपोर्टशिवाय आपण काही करू शकत नाही. माझ्या आई-वडिलांनी मला खेळासाठी खूप सपोर्ट केला. ते मला कोणत्याच गोष्टीसाठी नाही म्हणाले नाहीत. आईवडिलांचा विश्वास असेल तरच आपण काहीतरी करू शकतो. तो विश्वास त्यांनी माझ्यावरती दाखवला. त्यांनी मला योग्य दिशा दाखवली म्हणून मी ही त्यांच्या विश्वासाला तडा जाणार नाही याची काळजी घेत असते.

एकनाथ : या खेळामध्ये सहभागी झालेल्या खेळाडूंविषयी तुमचे मत काय ?

अपेक्षा : भारताप्रमाणेच जगाच्या कानाकोपऱ्यात, क्रीडाविश्वातून अनेक खेळाडू आले होते. प्रत्येकजण आपापल्या देशाचे प्रतिनिधीत्व करत होता. टीमवर्क करत असताना सर्व खेळाडू जात, धर्म न मानता योग्यपणे सर्वांशी मिळून मिसळून राहत होते.

काजल : या खेळाबद्दल आजच्या तरुण पिढीला काय संदेश द्याल ?

अपेक्षा : हा गेम खूपच इंटरेस्टींग आहे. अभ्यासात मन लागते. आरोग्य चांगले राहते. शरीरातील फिटनेस वाढतो. आपण मानसिक व शारीरिक दृष्ट्या स्थिर राहतो. प्रत्येक खेळाप्रमाणेच या खेळात येण्यासाठी संदेश न देता आवाहन करेन की, प्रत्येक गोष्टीसाठी



Scanned with CamScanner

सराव हा आवश्यक असतो. त्याप्रमाणे मी रोज सकाळी लवकर उठून ६.३० ते ८.३० आणि सायं. ५.१५ ते ६.४५ पर्यंत प्रॅक्टीस करते.

एकनाथ : तुमच्या जीवनात घडलेला अविस्मरणीय क्षण कोणता ?

अपेक्षा : महाराष्ट्राच्या टीमला अनेक वर्षांनंतर पंजाबमध्ये सिल्व्हर व ब्रांझ मेडल एकाचवेळी मिळाली. ज्याने पावलोपावली संघर्षाची झळ सोसलेली असते. त्यालाच विजयाचे महत्त्व कळत असते. त्यामुळे हा क्षण अविस्मरणीय सांगता येईल.

काजल : 'सेपक टकरा' या खेळाविषयीच्या सरकारच्या धोरणाबद्दल काय सांगाल ?

२. १ जुलै ते ७ जुलै वृक्षारोपण सप्ताहानिमित्त महाविद्यालयाच्या परिसरामध्ये मा.प्राचार्य डॉ.बी.टी.जाधव यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

३. २५ जुलै २०१८ रोजी मतदार नाव नोंदणी अभियान महाविद्यालयामध्ये राबविण्यात आले. या वेळी उपविभागीय अधिकारी (माण-खटाव) मा.कांबळे साहेब व नायब तहसिलदार (माण) भक्ती सरवदे उपस्थित होते.

४. १३ ते १६ जुलै २०१८ स्वच्छ भारत अभियान अंतर्गत दिंडी सोहळ्याचे आयोजन लोणंद ते पंढरपूर पर्यंत करण्यात आले होते. यावेळी प्लास्टिक मुक्ती मोहिम राबविण्यात आली. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू व कार्यक्रम अधिकारी हजर होते.

५. २७ ऑगस्ट २०१८ रोजी अस्थिव्यंग मुलांची शाळा, दहिवडी येथे भेट देवून मुलांना खाऊ वाटप करून रक्षाबंधन सण साजरा करण्यात आला.

६. ५ सप्टें. २०१८ शिक्षक दिन व रा.से.योजना उद्घाटन समारंभ कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी गुरुजनांचा सत्कार, पोस्टर प्रदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा.प्राचार्य डॉ.अशोक भोईटे (के.बी.पी. कॉलेज, पंढरूपर), मा.साधना गुंडगे, नगराध्यक्षा, दहिवडी महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.



Scanned with CamScanner

७. २२ सप्टें.२०१८ कर्मवीर भाऊराव पाटील जयंती निमित्त दहिवडी शहरातून रॅली काढण्यात आली. यावेळी शताब्दी महोत्सवानिमित्त झांज पथक बसविण्यात आले होते.

८. २४ सप्टें. ते २ ऑक्टो. २०१८ गांधी जयंती सप्ताहानिमित्त स्वच्छता, निबंध, वक्तृत्व, भित्तिपत्रके स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

९. २४ सप्टें. २०१८ रोजी नगरपंचायत दहिवडी व दहिवडी कॉलेज, दहिवडी यांच्या संयुक्त विद्यमाने दहिवडी शहरातून प्लास्टिकमुक्ती स्वच्छता मोहिम राबविण्यात आली.

१०. १२ डिसेंबर २०१८ रोजी महास्वच्छता अभियान राबविण्यात आले.

११. १८ जानेवारी २०१९ रोजी वाहतुक सुरक्षा सप्ताहानिमित्त वाहतुकीचे नियम या विषयावर मा.मधुकर शेंबडे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

१२. २५ जाने. रोजी रॅली व मतदान प्रात्यक्षिक घेण्यात आले.

या सर्व कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.टी.जाधव तसेच कार्यक्रम अधिकारी प्रा.शिंदे के.एस., प्रा.डॉ.लुबाळ एम.जे. व एन.एस.एस. समिती सदस्य यांचे सहकार्य लाभले. याबरोबरच महाविद्यालयात जनजागृती कार्यक्रम, संविधान दिन, व्यसनमुक्ती सप्ताह, गांधी जयंती, सामाजिक न्यायदिन, महापुरुषांचे जयंती, पुण्यतिथी, शहिद दिन, हुतात्मा दिन व स्मृतिदिनाचे अयोजन करण्यात आले होते. त्याचबरोबर स्वयंसेवकांनी विद्यापीठस्तरीय वेगवेगळ्या कार्यशाळेमध्ये सहभाग घेतला.

**विद्यापीठस्तरीय/राज्यस्तरीय विविध स्पर्धा व कार्यशाळा मधील सहभाग**

- विरकर विजयकुमार आनंदा आणि खताळ भरत दशरथ यांनी विद्यापीठ शिबिर (आपत्ती व्यवस्थापन) दि. २५ मे ३ जून २०१८, आयोजक - औरंगाबाद विद्यापीठ येथे सहभाग घेतला.
- कोळेकर आप्पा आबा, बुधावले सुरज राजेंद्र आणि शिंगाडे नितीन नारायण यांनी निर्मल वारी शिबीर दि. १० ते १६ जुलै २०१८, आयोजक - शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर लोणंद ते पंढरपूर यात सहभाग घेतला.
- प्रा.शिंदे के.एस., जाधव शंभूराज सुभाष, देशमाने अनिकेत काशिनाथ, हिंगळकर संग्राम नवनाथ, पवार रविंद्र अशोक, मुळीक आशिष प्रकाश, पवार सागर अशोक, गांधी वृषभ शितल यांनी प्लास्टिक कचरा मुक्ती मोहिम दि. १२ ते १७ जुलै २०१८, आयोजक - शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर लोणंद ते पंढरपूर यात सहभाग घेतला.
- माने मोनाली अशोक - प्रजासत्ताक दिन संचलन पूर्व निवड शिबीर दि.८ ते १० सप्टेंबर २०१८ आयोजक - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
- शिवाजी विद्यापीठाच्या दि.२६ सप्टेंबर ते २ ऑक्टो.२०१८ मध्ये झालेल्या शिबीरात खालील विद्यार्थी सहभागी झाले. शिंगाडे नितीन नारायण, बुधावले सुरज राजेंद्र, रुपनवर अक्षय विठ्ठल, भुजबळ वैभव अरुण, हिंगळकर संग्राम नारायण, पवार नितीन मोतीराम
- खताळ भरत दशरथ, वाघमोडे एकनाथ हनुमंत यांनी - जिल्हा युवा संसद निवड शिबीर दि.१८ जानेवारी २०१९, आयोजक - शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यात सहभाग घेतला.
- खताळ भरत दशरथ, विरकर रोहित भिवाजी, कुंभार विशाल प्रदीप, आटपाडकर रामदास शहाजी - नेतृत्व विकास शिबीर दि. मार्च २०१९, आयोजक - बहाई ॲकॅडमी, पाचगणी यात सहभाग घेतला.
- शिगाडे नितीन नारायण, बुधावले सुरज राजेंद्र, कु.[illegible] शितल विठ्ठल, कु.दडस स्नेहल विठ्ठल, कु.कुंभार ऋतुजा शशिकांत या विद्यार्थ्यांनी - आव्हान कॅम्प निवड शिबीर दि. २७ फेब्रु.२०१९, आयोजक - शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यात सहभाग घेतला.
- प्रा.शिंदे के.एस. - राज्यस्तरीय रा.से.यो.कार्यशाळा दि. २३ व २४ फेब्रु.२०१९, आयोजक - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे सहभाग

विशेष श्रमसंस्कार शिबीर शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व दहिवडी कॉलेज, दहिवडी यांच्या संयुक्त विद्यमाने दि.८.१.२०१९ ते १४.१.२०१९ या कालावधीत मौजे भांडवली येथे घेण्यात आले. उद्घाटन मा.प्राचार्य डॉ.एल.जी.जाधव (कला, वाणिज्य महाविद्यालय, वडूज) यांच्या हस्ते व मा.प्राचार्य डॉ.बी.टी.जाधव यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले. या उद्घाटन समारंभासाठी मा.सरपंच सौ.बालिका सूर्यवंशी, उपसरपंच श्री.सुनील सुर्यवंशी, युवराज सुर्यवंशी, काशिनाथ सुर्यवंशी व ग्रामपंचायत सदस्य, रा.से.चे सदस्य व स्वयंसेवक उपस्थित होते.



Scanned with CamScanner

या शिबीर कालावधीमध्ये विविध उपक्रम घेण्यात आले. हिमोग्लोबिन व बॉडी मांस इंडेक्स तपासणी शिबीर, अंधश्रध्दा निर्मूलन कार्यक्रम, स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, माती व पाणी परीक्षण, आरोग्यविषयक जागृती, पशुचिकित्सा शिबिर, सेंद्रीय शेती, सर्वंकष आरोग्य, एच.आई.व्ही.टेस्ट इ. विषयावरती व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. तसेच सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला. त्याचबरोबर स्वयंसेवकांनी माळावरील दगडगोटे गोळा करून ७३ एल.बी.एस.बंधारे व २ आरदन बंधारे बांधले. शिबीराचा समारोप मा.कपिल जगताप (मुख्याधिकारी नगरपंचायत दहिवडी) यांच्या उपस्थितीत व मा.प्राचार्य डॉ.बी.टी.जाधव यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. या प्रसंगी रा.से.यो.चे कार्यक्रम अधिकारी प्रा.शिंदे के.एस., प्रा.डॉ.लुबाळ एम.जे. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक समिती सदस्य व स्वयंसेवक उपस्थित होते.

**प्रा.के.एस.शिंदे**
**कार्यक्रम अधिकारी**

## राष्ट्रीय छात्र सेना

महाविद्यालयीन युवकांमध्ये लष्करी शिक्षणाची आवड निर्माण होण्यासाठी तसेच शिस्तप्रिय नागरिक बनविण्यासाठी स्थापन झालेल्या राष्ट्रीय छात्रसेना दलात चालू वर्षी १०५ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. (प्रथम वर्षात १४ मुली व ३७ मुले, द्वितीय वर्षात ६ मुली व १७ मुले व तृतीय वर्षात ५ मुली व २६ मुले.)

- अमर इंगळे यांची सिनिअर अंडर ऑफिसर ऋतुजा मोहिते आणि अभिजित काटकर यांची ज्युनिअर ऑफिसर म्हणून निवड करण्यात आली.
- कोल्हापूर येथे झालेल्या जून २०१८ मधील कँपसाठी २ विद्यार्थ्यांची निवड झाली होती त्यातून अमरावती येथील इंटरग्रुप कॉम्पिटिशनसाठी अमर इंगळेंची निवड झाली होती.
- कोल्हापूर येथील पी.आर.डी.सी. कँपसाठी अमर इंगळे याची निवड झाली होती. वार्षिक प्रशिक्षण शिबीरे २२ महा. बटालियन एन.सी.सी. सातारा यांचेमार्फत महागाव (सातारा) व पांढरपाणी येथे संपन्न झाली. मे २०१८ मध्ये महागाव येथील कँपमध्ये १४ कॅडेटस् सहभागी झाले होते. सदर कँपमध्ये अमर इंगळे याने ड्रील व फायरिंग स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला होता. तसेच आकाश इंगळे यास बेस्ट इन कॉटर गार्ड चा बहुमान मिळाला होता. तसेच फायरिंग स्पर्धेत प्रथम आला होता.
- ऑगस्ट २०१८ मध्ये झालेल्या कँपमध्ये १७ कॅडेटस् सहभागी झाले होते. सदर कँप मध्ये अभिजित इंगळे यास फायरिंग स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळाला होता. सप्टेंबर २०१८ मध्ये झालेल्या कँप मध्ये ६ कॅडेटस् सहभागी झाले होते. कोल्हापूर येथील सी.ए.टी.सी. ३२७ साठी महाविद्यालयातील ११ मुली सहभागी झाल्या होत्या.
- औरंगाबाद येथील कँपसाठी कु.ऋतुजा मोहिते आणि दत्तात्रय ठोंबरे यांची निवड झाली होती. सदर कँपमध्ये ड्रील स्पर्धेत तसेच ८०० मीटर रनिंग आणि ४ x ४०० मीटर रिले स्पर्धेत दत्तात्रय ठोंबरे याने प्रथम क्रमांक पटकाविला होता.
- एडस् जनजागृती अभियानांतर्गत १ डिसेंबर रोजी दहिवडी शहरातून राष्ट्रीय छात्रसेनेच्या विद्यार्थ्यांनी घोषणा देत हातात एडस् बाबतचे बॅनर घेऊन रॅली काढण्यात आली.
- २१ जून राष्ट्रीय योगदिनानिमित्त महाविद्यालयात राष्ट्रीय छात्रसेनेच्या विद्यार्थ्यांनी योगा केला. योगप्रशिक्षक म्हणून मा.जयप्रकाश जाधव होते.
- स्वच्छता अभियानांतर्गत कॅडेटस्नी दहिवडी शहरात व महाविद्यालयात स्वच्छता केली. दि.१५-१२-२०१८ रोजी महास्वच्छता अभियानात एन.सी.सी.कॅडेटस् सहभागी झाले होते.
- दि.६ ऑक्टोबर, २०१८ रोजी देश संरक्षणात सैनिकांचे कार्य याबाबत लेप्ट.कमोडर भानुदास जाधव यांनी व्याख्यान दिले. दि.१४ जानेवारी, २०१९ रोजी मा.कर्नल देवदत्त जाधव यांनी सैन्यातील अधिकारी होणेबाबत मार्गदर्शन केले.
- जागतिक पर्यावरण दिनानिमित्त दि.५ जून, २०१८ रोजी महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.
- १५ ऑगस्ट, २०१८ स्वातंत्र्य दिन निमित्त मा.प्राचार्य बी.टी.जाधव यांच्या उपस्थितीत छात्रांनी राष्ट्रध्वजास मानवंदना देऊन साजरा केला.
- २६ जानेवारी, २०१८ प्रजासत्ताक दिनाचा कार्यक्रम मा.प्राचार्य डॉ.बी.टी.जाधव यांच्या उपस्थितीत छात्रांनी राष्ट्रध्वजास मानवंदना देऊन छात्रांनी शानदार संचलन करुन साजरा केला. संचलनाचे नेतृत्व सिनिअर अंडर ऑफिसर अमर इंगळे याने केले.
- सन २०१८-१९ मध्ये 'बी' प्रमाणपत्र परीक्षेस २३ व 'सी' प्रमाणपत्र परीक्षेस ३१ कॅडेटस् बसले आहेत.
- २२ महाराष्ट्र बटालियनचे प्रमुख कर्नल सुनील मान, ॲडम ऑफिसर कर्नल राजेश कुमार, सुभेदार मेजर वाल्मिक वारगडे



Scanned with CamScanner

सेक्टरचे हवालदार निलेश काटकर, हवालदार राजेश पवार व त्यांचे सर्व सहकारी यांच्याकडून आम्हांस भरपूर मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. त्यांच्या सहकार्याबद्दल मी त्या सर्वांचा सदैव ऋणी आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.टी.जाधव साहेब यांचे मार्गदर्शन व सहकार्य तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवकांच्या सहकार्याबद्दल मी आभार मानतो.

**कॅप्टन टी.एस्.माने**
**कंपनी कमांडर**

## संशोधन समिती

प्रशांत दिलीप जाधव या विद्यार्थ्याने Mechanical Lead Pencil give the previous information about the end and lead by using of colour pigmen या विषयावर सादर केलेल्या पेटंटसाठी महाविद्यालयाच्या रिसर्च कॉर्पस् फंडातून ८,९००/- रुपयांची मदत केली. लघुशोध प्रकल्पासाठी महाविद्यालयातील तीन प्राध्यापकांच्या अर्ज व विषयाची निश्चिती करुन प्रत्येकी १०,०००/- रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. श्री.व्ही.पी.गायकवाड व श्री.शिकलगार एम.एस. यांच्या लघुशोधप्रकल्पास एक वर्षाची मुदतवाढ व प्रत्येकी १०,०००/- चे वाढीव अर्थसहाय्य देण्यात आले. प्राचार्य बॅरी.पी.जी.पाटील व प्राचार्य सुमतीबाई पाटील शैक्षणिक शिष्यवृत्तीसाठी अर्ज पाठवण्यात आले. दि.२७ फेब्रुवारी रोजी संशोधन पद्धती विषयक 'रिसर्च मेथॉडॉलॉजीज इन सोशल सायन्स, ह्युमॅनिटीज, कॉमर्स अँड मॅनेजमेंट, सायन्स अँड टेक्नॉलॉजी' या विषयावर राज्यस्तरीय एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यात साधन व्यक्ती म्हणून आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या प्राचार्या डॉ.वंदना जाधव, यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सचे डॉ.संतोष कांबळे व के.बी.पी.आय.एम.एस.आर. चे डॉ.सारंग भोला यांनी मार्गदर्शन केले. विविध संशोधन पत्रिका व चर्चासत्रां-मधून प्राध्यापकांचे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय ५२ लेख प्रकाशित झाले. महाविद्यालयाच्या प्राध्यापकांकडून एक पाठ्यपुस्तक लेखन, पाठ्यपुस्तकात लेख प्रकाशित झाला. विद्यार्थ्यांचे ५४५ रिसर्च पेपर्स सादर झाले.

रयत इन्स्पायर प्रोग्रॅममध्ये सिनिअरच्या ४४ तर ज्युनिअरच्या ३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. रयत इन्स्पायर कॅंप हायस्कूलच्या ३७ विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक उपकरणे व प्रकल्प तयार केले. संस्था अंतर्गत आविष्कार स्पर्धेत ८४ प्रकल्प १ कार्यशाळा, ६ विद्यार्थी, ६ शिक्षक सहभागी झाले. आविष्कार पदव्युत्तर, पदवी व शिक्षक स्पर्धेत ६ विद्यार्थी, ६ शिक्षकांनी १२ प्रकल्प सादर केले.

सायन्स वर्किंग मॉडेल्स स्पर्धेत १४० विद्यार्थ्यांनी ७० मॉडेल सादर केले. संस्था अंतर्गत स्पर्धेत २० विद्यार्थी सहभागी झाले. रयत विज्ञान परिषदेत ५३ विद्यार्थी व शिक्षकांनी सहभाग घेऊन विविध गटात ७ बक्षिसे मिळविली. प्रोजेक्ट बेस्ड लर्निंगमध्ये ८० विद्यार्थ्यांनी ४० प्रोजेक्ट केले. पी.डी.-३, पी.-४ मध्ये ६० विद्यार्थ्यांनी ३० प्रोजेक्ट केले. ४ विद्यार्थ्यांनी इंटरनॅशनल रिसर्च पेपर सादर केले. एक विद्यार्थी बेस्ट आयडिया ठरली. रसायनशास्त्र आंतरराष्ट्रीय परिषद, प्राणीशास्त्र राज्यस्तरीय परिषद, वनस्पतीशास्त्र राज्यस्तरीय कार्यशाळा, संशोधन पध्दती कार्यशाळा, करिअर अपॉरच्युनिटी इन ओव्हरसीज एकदिवसीय कार्यशाळा, एन.आय.आर.एफ. राज्यस्तरीय कार्यशाळा, आय.डी.आर. राज्यस्तरीय कार्यशाळा, ई-कंटेंटराज्यस्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या.

**डॉ.के.एम.पवार**
**चेअरमन**

## *Lead College Activity*

Various activities conducted under lead college Scheme

- Marathi, Student Oriented, One day workshop on Kathakathan & Katha Lekhan, 1.Laximan Mohite, 2.Kanta Bhosale, 3. Ravindra Kokare, 4.Vijay Babar was Resource Person : 29.01.2019
- English, Student Oriented, 1.One day workshopon sexual harassment prevention, Human Values, 1.Shri.Navanath,Bombale, 2.Shri Sangram Sapakal was Resource Person : 16.01.2019
- Hindi, Student Oriented, Hindi Day, Dr.Shivashankar Mali was Resource Person : 14.09.2018
- Geography, Student Oriented Activity, Ozone Day, Dr. S.V. Karande was Resource Person : 24.09.2018, Geography Day, Dr.P.R. Talekar was Chief Guest, 16.01.2019
- Economics, Student Oriented Activity, Recreation in Economics & Commerce, 06.03.2019



Scanned with CamScanner

- Political Sci., department organised Student Oriented, Mock Poll, Hon.Dadasaheb Kamble, Hon. Bai Mane was guest : 25.01.2019
- History, Student Oriented, One Day Workshop on Paryatan, Mr.V.S.Patil, Mr.R. Deshmukh was guest : 09.02.2019
- Commerce, Student Oriented, One Day Seminar on Carrier in Banking Opportunities, Dr.Vijay Kumbhar was chief guest : 06.01.2019
- Botany, Student Oriented, One Day University Workshop on Recent Trends in Biotechnology, Prof.G.B.Pawar, Prof.P.S.Phalake, Prof.R.K. Sakhare was Resource Person : 18.01.2019
- Chemistry, Research Oriented, One Day Workshop on Research Opportunities at Overseas, Dr.U.P. Mulik : 21.08.2018. Extension, Water Analysis, Dr.S.M. Khetre, Dr.A.U. Chopade, : 07.01.2019. Research Oriented, Research Methodology, Dr.S.B. Kamble, 27.02.2019. Research Oriented, Intellectual Properly Right, Miss.Ankita Nagarkar, Mr.G.M.Taware : 21.02.2019
- Zoology, Extension, One Day Workshop on Vermiculture & Sericulture, Mr.Sharad Bhoite, Mr.Nikhil Choudhari, Mr.Bapurao Kulkarni was Resource Person, 29.01.2019
- Physics, Student Oriented, Career opportunities after B.Sc., Dr.Torane A.P. 05.02.2019
- BCA, Research Activity, One Day Workshop on Data Mining & Data Warehosing,, Dr.P.P. Patil, Prof.S.S.Lamkane 21.01.2019
- Computer Science, Research Activity, Software Development, Prof. S.S. Ghadage : 21.01.2019. Maths, Student Oriented, Importance of Mathematics, Dr. S.B. Patil. 07.02.2019
- Stat, Student Oriented, Scope of Statistics, Dr. H.P. Umap. 28.10.2018
- Education, Student Oriented, One Day Workshop on Handwritings Skill, Mr. S.S. Shaikh 03.01.2019
- NSS, Extension Activity, Divyan Dip, Hon.Dadasaheb Kamble, 03.12.2018
- Common Activity, Avishakar 'Yuvkanche Vaktimahatva', lecture by Dr.Bharati Pol, Prof.Anand Margam : 07.01.2019
- Common Activity, Family, College,Society & Human Values, Dr.Savita Giri, Hon.Dadasaheb Narale : 25.02.2019
- Sport, Student Oriented, Five Day Camp on Sport Couching Camp, Mr.C.Kanere, Mr.D.Avaghade, Mr. A. Jadhav : 21.01.2019 to 25.01.2019
- Physics, Research Activity, Advances in Research, Mr.Pagare P.K. : 05.02.2019

**Dr.S.M.Khetre**
Co-ordinatore

## बी.व्होक-ॲग्रिकल्चर

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून महाविद्यालयामध्ये यु.जी.सी.मान्यताप्राप्त बी.व्होक (ॲग्री) हा नवीन पदवी कोर्स सुरु झाला आहे. या कोर्सला प्रथम वर्षासाठी २२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. विभागामार्फत रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३१वी जयंती आणि रयत शिक्षण संस्थेच्या शताब्दी वर्षानिमित्त दि.१०-१०-२०१८ रोजी 'कृषी क्षेत्रातील कौशल्य विकसन व नोकरीच्या संधी' तसेच दि.२९-०१-२०१९ रोजी Vermiculture, Vermicompost and Sericulture या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. विभागाच्या वतीने महाविद्यालय परिसरातील पॉलिहाऊसमध्ये लावलेल्या काकडी, मेथी व कोथिंबीर यांच्या पहिल्या उत्पादनाची दि.३१-०१-१९ रोजी महाविद्यालय परिसरात स्टॉल लावून विक्री केली. सध्या दर आठवड्याला काकडीची विक्री केली जाते.

**प्रा.एस.पी.दिवटे**
नोडल ऑफिसर

## लैंगिक छळ प्रतिबंधक समिती

महाविद्यालयामध्ये लैंगिक छळ प्रतिबंधक समिती कार्यरत



Scanned with CamScanner

असून या समितीमार्फत विविध कार्यक्रम घेण्यात आले. निर्भया पथकामार्फत दि.२६ डिसेंबर, २०१८ रोजी 'कायदा साक्षरता व कायद्यामधील विविध तरतुदी विषयीची माहिती' पोलीस कॉन्स्टेबल श्री.चंदनशिवे, श्री.बर्गे, श्रीमती रासकर यांनी दिली. तसेच 'निर्भया पथका' मार्फत महाविद्यालयामध्ये भेट दिली जाते.

या समितीमार्फत अग्रणी कॉलेज व बहाई अॅकॅडमी पाचगणी यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेमध्ये मा.श्री.संग्राम सपकाळ व श्री.नवनाथ बोंबले यांनी लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा, छळ प्रतिबंधक उपाय व कायदा या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या समितीमार्फत महाविद्यालयीन युवतींच्या सुरक्षिततेसाठी महाविद्यालय विविध माध्यमातून सतत प्रयत्न करत असते. यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य आदरणीय मा.बी.टी.जाधव सातत्याने मार्गदर्शन करतात.

प्रा.यु.एस.मदने
चेअरमन

## शैक्षणिक सहल विभाग

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून विविध शैक्षणिक, औद्योगिक, भौगोलिक व ऐतिहासिक स्थळे पाहून अभ्यासक्रमामध्ये त्या माहितीचा समावेश करण्याच्या दृष्टीने शै.सहलीचे आयोजन केले जाते. यावर्षी इतिहास, भूगोल, वनस्पतिशास्त्र, हिंदी; वाणिज्य, बी.व्होक. अॅग्री या विभागामार्फत सहलीचे अयोजन करण्यात आले होते. भूगोल विभागाची सहल गगनबावडा-कुणकेश्वर-सिंधुदुर्ग-आंबोली-कोल्हापूर-गोवा येथे, तर हिंदी विभागाची सहल भिलार (पुस्तकांचे गाव)-सातारा-वाई-महाबळेश्वर या ठिकाणी गेली होती. तेथील मराठी विश्वकोष मंडळ, शासकीय मुद्रणालय, सातारा, दैनिक सकाळ कार्यालय इ. ठिकाणी भेटी दिल्या. इतिहास विभागाने सहलीमध्ये सातारा येथील वस्तु संग्रहालयास भेट दिली. तसेच महाबळेश्वर-प्रतापगड येथील किल्ल्यांचे इतिहासाच्या दृष्टीकोनातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

वाणिज्य विभागामार्फत किर्लोस्करवाडी येथील कारखान्यास भेट देण्यात आली. प्राणिशास्त्र (बी.एस्सी.भाग-३) विभागामार्फत सडे वाघापूर कोयनानगर-महाबळेश्वर-दापोली या ठिकाणी भेटी दिल्या. बी.एस्सी.भाग-२ प्राणिशास्त्र विभागामार्फत पिंगळी तलाव-महाबळेश्वर-रायगड या ठिकाणी भेटी दिल्या. बी.व्होक. अॅग्री विभागाची सहल बारामती याठिकाणी आयोजित करण्यात आली.

प्रा.के.एस.शिंदे, विभाग प्रमुख

## खरेदी-विक्री समिती

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व रयत शिक्षण संस्था, सातारा यांच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे महाविद्यालयामध्ये दरवर्षीप्रमाणे विविध विभागासाठी लागणाऱ्या विभागप्रमुखामार्फत वस्तूंची मागणी केली जाते. वस्तूंची खरेदी करण्यापूर्वी कोटेशनची मागणी करून त्याला (वर्क ऑर्डर) दिली जाते. वस्तूंची किंमत व गरज लक्षात घेऊन त्या वस्तंची खरेदी केली जाते. चालू शैक्षणिक वर्षामध्ये संगणक खरेदी, कपाट, खुर्ची, टेबल, फर्निचर साहित्य, कंपाउंडसाठी लागणारे साहित्य व बांधकामासाठी लागणाऱ्या साहित्याची खरेदी करण्यात आली. यासाठी मा.प्राचार्य डॉ.बी.टी.जाधव व समिती सदस्य यांचे मोलाचे सहकार्य मिळाले.

प्रा.के.एस.शिंदे
चेअरमन

## गांधी विचार संस्कार परीक्षा, जळगाव

महाविद्यालयामध्ये गांधी विचार रिसर्च फौंडेशन, जळगाव द्वारा दरवर्षी प्रमाणे याही वर्षी २०१८-१९मध्ये महाविद्यालयामध्ये २७ डिसेंबर २०१८ रोजी गांधी विचार संस्कार परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेकरीता महाविद्यालयातील ज्युनिअर/सिनीअर/बी.सी.ए. व व्होकेशनल विभागातील १७९ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. ही परीक्षा महात्मा गांधी यांचे जीवन व तत्वज्ञान या विषयावर आधारीत असते. या परीक्षेत बी.ए.भाग-१ मधील कु.ढेंबरे भाग्यश्री मारुती हिने प्रथम क्रमांक पटकावला तर कु.माने मोनाली अशोक बी.एस्सी. भाग-३ हिने द्वितीय क्रमांक व बुधावले सुरज राजेंद्र या विद्यार्थ्याने तृतीय क्रमांक पटकावला. विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला व इतर विद्यार्थ्यांना सहभागी प्रमाणपत्र देण्यात आले.

अशा रीतीने महाविद्यालयात दरवर्षी या परीक्षेचे आयोजन करण्यात येत असून महात्मा गांधींचे तत्त्वज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्यात यावे हा खरा या परीक्षेचा उद्देश आहे. या परीक्षेचे यशस्वी आयोजन इतिहास विभागामार्फत करण्यात येते. यासाठी इतिहास विभागातील प्रा.शिंदे के.एस. व प्रा.मोरे बी.व्ही. यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले.

प्रा.बी.व्ही.मोरे, समन्वयक



Scanned with CamScanner

## वरिष्ठ जिमखाना विभाग

महाविद्यालयाचे मा.प्राचार्य व जिमखाना कमिटी यांचे मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाच्या सिनियर व ज्युनियर जिमखाना विभागाने यशस्वी वाटचाल चालू ठेवली आहे. सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षामध्ये जिमखाना विभागाने सातारा झोनल चे खालील स्पर्धांमधून सहभाग घेतला.

- १) व्हॉलीबॉल मुली २) व्हॉलिबॉल मुले ३)खो-खो मुले ४) कबड्डी मुले ५) कबड्डी मुली ६) हॅन्डबॉल मुले ७) कुस्ती मुले ८) क्रिकेट मुले ९) बॅडमिंटन मुले/मुली १०) क्रिकेट मुली ११) हँडबॉल मुले
- सातारा झोनल सॉफ्टबॉल मुले स्पर्धांचे दि.२-१-२०१९ रोजी यशस्वी आयोजन केले. सदर स्पर्धेत जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील ५ संघांनी सहभाग घेतला होता.
- सातारा झोनल व्हॉलिबॉल मुली स्पर्धेत महाविद्यालयाच्या मुलींच्या संघाने प्रथम क्रमांक घेत स्पर्धेचे सलग तिसऱ्या वर्षी विजेतेपद संपादन केले. तसेच इंटर झोनल स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांक मिळवित यश मिळविले.
- सातारा झोनल बेसबॉल मुले स्पर्धेत महाविद्यालयाच्या मुलांच्या संघाने प्रथम क्रमांक घेत स्पर्धेचे सलग तिसऱ्या वर्षी विजेतेपद संपादन केले. तसेच इंटर झोनल स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांक मिळवित यश मिळविले.
- सातारा झोनल खो-खो मुले स्पर्धेत महाविद्यालयाच्या संघाने द्वितीय क्रमांक घेत विजेतेपद संपादन केले.
- सातारा झोनल क्रिकेट मुले स्पर्धेत महाविद्यालयाच्या संघाने तृतीय क्रमांक मिळवित विजेतेपद संपादन केले.
- स्नेहल जगदाळे व प्रेरणा भोसले हिची वेस्ट झोन इंटर युनिव्हर्सिटी, ऑल इंडिया व्हॉलीबॉल मुली स्पर्धा व महाराष्ट्र स्टेट इंटर युनी. स्पोर्टस् स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ यातून निवड व तीनही स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवून यश संपादन केले.
- वैष्णवी सावंत हिने क्रॉसकंट्री इंटर झोनल स्पर्धेमध्ये ६वा क्रमांक मिळून यश संपादन केले व तिची ऑल इंडिया स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघातून निवड व महाराष्ट्र स्टेट इंटर युनी. स्पोर्टस स्पर्धेत १० हजार मी. स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवून यश संपादन केले.
- पवन माने व राहुल गोरे यांची शिवाजी विद्यापीठ बेसबॉल संघानं निवड होऊन कुरुक्षेत्र येथे होणाऱ्या स्पर्धेत सहभाग.
- दिगंबर शिवाजी बाबर याची वेस्ट झोन इंटर युनिव्हर्सिटी, ऑल इंडिया खो-खो मुले स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठातून निवड व दोन्ही स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवून यश संपादन केले.
- रोहित रोमन याने इंटरझोनल स्पर्धेत लांबउडी या प्रकारामध्ये प्रथम क्रमांक मिळवून यश संपादन केले. कोलोखे तुषार याने ४०० मी. मध्ये ३रा क्रमांक, वैष्णवी सावंत १० मी. मध्ये ३ रा. व १५०० मी. मध्ये २रा क्रमांक संपादन केला.
- तसेच महाविद्यालयातील तायक्वांदो दोन खेळाडूंनी झोनल स्पर्धेत यश संपादन केले.
- महाविद्यालयातील एकूण सहा विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठ संघातून वेस्ट झोन इंटर युनिव्हर्सिटी व ऑल इंडिया व महाराष्ट्र स्टेट इंटर युनिव्हर्सिटी युनी. स्पोर्टस् स्पर्धेसाठी सहभाग घेतला.

१) सावंत वैष्णवी विलासराव-क्रॉस कंट्री २) जगदाळे स्नेहल दिलीप-व्हॉलीबॉल ३) भोसले प्रेरणा सूर्यकांत-व्हॉलीबॉल ४) बाबर दिगंबर शिवाजी-खो-खो ५) माने पवन सूरज-बेसबॉल ६) गोरे राहुल अर्जुन-बेसबॉल

**महाविद्यालयाच्या जिमखाना विभागाने सन २०१८-१९ मध्ये विविध क्रीडा स्पर्धांचे व क्रीडा मोहोत्सवाचे आयोजन खालीलप्रमाणे करण्यात आले.**

१) १५ ऑगस्ट, २०१८ रोजी व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धेत ३६ मुली सहभागी झाल्या.

२) **कॉलेज अंतर्गत क्रीडा महोत्सवाचे आयोजन :**

- दि.५-०९-२०१८ रोजी मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये मुले, मुली, शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर सेवक मिळून ९५१ जण सहभागी झाले.
- दि.६-०९-२०१८ रोजी झालेल्या फनी गेम-लगोर स्पर्धेत मुले, मुली, शिक्षिका मिळून १२९ जण सहभागी झाले.
- दि.६-०९-२०१८ रोजी झालेल्या फनी गेम-संगीत खुर्ची यामध्ये २५ शिक्षिका सहभागी झाल्या.
- दि.६-०९-२०१८ रोजी झालेल्या हँडबॉल स्पर्धेत २४ मुले सहभागी झाली.
- दि.७-०९-२०१८ रोजी झालेल्या क्रिकेट स्पर्धेत मुले, मुली, शिक्षक, शिक्षकेतर सेवक मिळून ३६० जण सहभागी झाले.



Scanned with CamScanner

- दि.०८-०९-२०१८ रोजी झालेल्या खो-खो स्पर्धेत ६९ मुले, मुली सहभागी झाली; व्हॉलीबॉल स्पर्धेत एकूण ७७ मुले, मुली सहभागी झाली; कबड्डी स्पर्धेत एकूण १०५ मुले, मुली सहभागी झाल्या; बॅडमिंटन स्पर्धेत ४६ मुले, मुली सहभागी झाल्या.

३) रयत शिक्षण संस्था शताब्दी महोत्सवानिमित्त दि.०९-१०-२०१८ रोजी झालेल्या व्हॉलीबॉल स्पर्धेत ४१ मुली सहभागी झाल्या.

४) दि.०२-०१-२०१९ रोजी सातारा झोनल बेसबॉल (मुले) स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेमध्ये जिल्ह्यातील पाच संघांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेमध्ये महाविद्यालयाच्या संघास प्रथम क्रमांक घेऊन विजयी झाला.

५) दि.२१-०१-२०१९ ते २५-०१-२०१९ या कालावधीत कर्मवीर विद्या प्रबोधिनी, जिमखाना विभाग व अग्रणी कॉलेज अंतर्गत पाच दिवसांचे क्रिकेट, हँडबॉल, बॅडमिंटन व टेबलटेनिस या खेळांसाठी मुले व मुली यांचे शिबीर आयोजित करण्यात आले. सदर शिबीरास दहिवडी मधील सर्व शाखांमधील ११० खेळाडू सहभागी झाले होते.

**प्रा.यु.ई.शिंदे**
**जिमखाना प्रमुख**

## कनिष्ठ जिमखाना विभाग

सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षामध्ये ज्युनिअर महाविद्यालयातील विद्यार्थी/विद्यार्थिनींनी विविध वैयक्तिक व सांघिक खेळ प्रकारांमध्ये सहभाग घेऊन तालुका, जिल्हा, विभाग, राज्य आणि राष्ट्रीय स्पर्धेत यश प्राप्त केले.

वैयक्तिक खेळ प्रकारामध्ये बुध्दिबळ, तायक्वांदो, कुस्ती, कराटे, वुशू, शीकाई मार्शल आर्ट, ॲथलेटिक्स व बॉक्सिंग तसेच सांघिक खेळ प्रकारांमध्ये फुटबॉल, बॅडमिंटन, कबड्डी, व्हॉलिबॉल, क्रिकेट, बॉल बॅडमिंटन, टेबल टेनिस, बास्केटबॉल, सेपक टकरो, थ्रो बॉल, टेनिक्काईट व रग्बी अशा एकण अनुक्रमे वैयक्तिक ८ व सांघिक १४ खेळप्रकारांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. जिल्हास्तरीय स्पर्धेत ११६ मुले व ८३ मुली अशा एकूण १९९ विद्यार्थ्यांनी सहभाग घतला. विभागस्तरीय स्पर्धेत ३६ मुले व १९ मुली अशा एकूण ५५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. राज्यस्तरीय स्पर्धेत १६ मुले व ८ मुली अशा एकूण २४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला व राष्ट्रीय स्पर्धेत २ मुले व २ मुली अशा एकूण ४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

**विशेष कामगिरी :**

१) अलिबाग येथे झालेल्या राज्यस्तरीय शालेय बॉल बॅडमिंटन स्पर्धेत कु.ऋतुजा राजेंद्र जगदाळे या विद्यार्थिनीची निवड झाली.

२) कोल्हापूर येथे झालेल्या विभागीय शालेय टेनिक्काईट स्पर्धेत मुलांच्या संघाने द्वितीय व मुलींच्या संघाने तृतीय क्रमांक प्राप्त केला.

३) शिरवळ येथे झालेल्या जिल्हास्तरीय शालेय वुशू स्पर्धेत श्री.गणेश मोहन डोईफोडे या विद्यार्थ्याने ५५ किलो वजन गटात प्रथम क्रमांक मिळवून सांगली येथे झालेल्या विभागीय स्पर्धेत सहभाग नोंदवला.

४) गांधी मैदान, कोल्हापूर येथे झालेल्या विभागीय शालेय सेपक टकरो स्पर्धेत मुलींच्या संघाने प्रथम क्रमांक मिळवून वर्धा येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत देखील प्रथम क्रमांक प्राप्त केला. कु.आदिती जगदाळे या विद्यार्थिनीची केरळ येथे होणाऱ्या राष्ट्रीय शालेय सेपक टकरो स्पर्धेत निवड झाली.

५) न्यू इंग्लिश स्कूल पाली, रत्नागिरी येथे झालेल्या विभागीय थ्रो-बॉल स्पर्धेत मुलांच्या संघाने द्वितीय क्रमांक मिळविला.

६) आष्टा, सांगली येथे झालेल्या विभागीय शालेय व्हॉलिबॉल स्पर्धेत कु.प्रतीक्षा जगदाळे व कु.धरित्री नरळे या दोन विद्यार्थिनींची निवड झाली व प्रतीक्षा जगदाळेची राज्यस्तरीय स्पर्धेत निवड झाली.

७) जिल्हा क्रीडा संकुल, सांगली येथे झालेल्या विभागीय शालेय मैदानी स्पर्धेत श्री.तुषार देवकर या विद्यार्थ्याने हातोडा फेक या खेळ प्रकारात द्वितीय क्रमांक प्राप्त केला.

८) सांगली येथे झालेल्या विभागीय रग्बी स्पर्धेच्या निवड चाचणीस कु.देह वाघमोडे, कु.प्रियांक कुटे व शितल कोकरे या तीन विद्यार्थिनींची निवड झाली.

९) महात्मा गांधी विद्या. व ज्युनिअर कॉलेज, दहिवडी येथे झालेल्या राज्यस्तरीय शालेय बेसबॉल स्पर्धेत दहिवडी कॉलेज, दहिवडी मुलांच्या संघाने तृतीय क्रमांक पटकाविला व श्री.श्रेयश फडतरे व श्री.प्रताप पवार या दोन खेळाडूंची राष्ट्रीय शालेय बेसबॉल संघात निवड झाली.

१०) उल्हासनगर शहाड, ठाणे येथे झालेल्या राज्यस्तरीय शालेय रग्बी स्पर्धेत कु.देवी अशोक वाघमोडे या विद्यार्थिनीची निवड होऊन भुवनेश्वर, उडीसा येथे होणाऱ्या राष्ट्रीय शालेय रग्बी संघात तिची निवड झाली.

**प्रा.अमर जाधव, विभाग प्रमुख**



Scanned with CamScanner

## युवा महोत्सव (कनिष्ठ विभाग)

ज्युनिअर कॉलेज व एच.एस.सी. व्होकेशनल विभागाच्या वतीने दि. १५ जानेवारी ते १७ जानेवारी २०१९ या कालावधीमध्ये युवा महोत्सवात ज्युनिअर विभागातील कला, वाणिज्य, विज्ञान आणि एच.एस.सी. व्होकेशनल विभागातील विविध शाखांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यात गीत गायन, साहसी खेळ व युद्ध कौशल्य, वाद्यवृंद-वैयक्तिक व सांघिक, पथनाट्य, लघुनाटिका, विणकाम, भरतकाम, वारली पेंटींग, कोलाज, प्रश्नमंजूषा, समूहगीत, मूकनाट्य आणि लोकनृत्य अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या. विविध स्पर्धांचे उद्घाटन दि. १५ जानेवारी रोजी मा.प्रा.संभाजी पाटील, रयत शिक्षण संस्था, सातारा यांनी केले. या प्रसंगी मा. उपप्राचार्य डॉ.बळवंतबी.एस., दहिवडी कॉलेज दहिवडी, मा.प्राचार्य डॉ.जाधव.बी.टी, दहिवडी कॉलेज दहिवडी उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देऊन मोलाचे मार्गदर्शन केले.

स्पर्धांमध्ये यश मिळविलेल्या स्पर्धकांना दि. १७ जानेवारी रोजी बक्षीस वितरण समारंभात मा.श्री.आबासाहेब देशमुख, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, रयत शिक्षण संस्था, सातारा. मा.श्री.प्रभाकर देशमुख, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, रयत शिक्षण संस्था, सातारा. मा.उपप्राचार्य डॉ.बळवंत.बी.एस., दहिवडी कॉलेज दहिवडी, मा.प्राचार्य डॉ.जाधव.बी.टी, दहिवडी कॉलेज दहिवडी यांच्या हस्ते ट्रॉफी, मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. या प्रसंगी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना भावी जीवनाबद्दल शुभेच्छा देऊन बहुमोल मार्गदर्शन केले.

युवा महोत्सव यशस्वी होण्यासाठी मा.प्राचार्य डॉ.जाधव.बी.टी. यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. पर्यवेक्षक श्री.खाडे.बी.एस., व्होकेशनल विभागप्रमुख श्री.नरळे.बी.एन., युवा महोत्सवाचे चेअरमन, श्री.कुमठेकर.एम.बी. सचिव, श्रीमती.पाटील.एस.एम आणि ज्युनिअर विभाग व एच.एस.सी. व्होकेशनल विभागातील सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले. अशा रीतीने हा युवा महोत्सव संपन्न झाला.

**प्रा.एम.बी.कुमठेकर**
चेअरमन

## कनिष्ठ विभाग

ज्युनिअर विभागाकडे कला, वाणिज्य, विज्ञान या तीन शाखा असून यामध्ये एकूण १५४६ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे त्यापैकी ७२५ मुले व ८२१ मुली आहेत. एच.एस.सी. व्होकेशनल विभागाकडे १२४ मुले व २५ मुली अशा एकूण १४९ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. गतवर्षी एच.एस.सी. चा निकाल बोर्ड निकालापेक्षा जास्त आहे. सन २०१८ चा एच.एस.सी. बोर्ड निकालात कला शाखेच्या एकूण २१२ विद्यार्थ्यांपैकी १९३ विद्यार्थी पास झाले. हा निकाल बोर्ड निकालाच्या ७९.७० टक्के आहे, तर शाखेच्या निकालाच्या ९१.०३ टक्के आहे. वाणिज्य शाखेच्या एकूण १३० विद्यार्थ्यांपैकी १३० विद्यार्थी पास झाले. हा निकाल बोर्ड निकालाच्या ९४.५३ टक्के आहे, तर शाखेच्या निकालाच्या १०० टक्के आहे. विज्ञान शाखेच्या एकूण ३८३ विद्यार्थ्यांपैकी ३८२ विद्यार्थी पास झाले. हा निकाल बोर्ड निकालाच्या ९७.[illegible] टक्के आहे, तर शाखेच्या निकालाच्या ९९.७४ टक्के आहे. एच.एस.सी. व्होकेशनल शाखेच्या एकूण ४६ विद्यार्थ्यांपैकी ३६ विद्यार्थी पास झाले. हा निकाल बोर्ड निकालाच्या ८८ टक्के आहे, तर शाखेच्या निकालाच्या ७८.२६ टक्के आहे.

या वर्षी डी.सी. पॅटर्न मध्ये इयत्ता ११वी मध्ये ११७ विद्यार्थी प्रवेशित झाले असून इयत्ता १२वी साठी १३१ विद्यार्थी प्रवेशित आहेत. या पॅटर्न मधून मेडिकल, इंजिनिअरिंग, फार्मसी, ॲग्रिकल्चर साठी नामवंत कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला आहे. या वर्गासाठी ५ जनरल व १५ विषयांसाठी तज्ञ मार्गदर्शन व्याख्यानांचे आयोजन केले होते. या पॅटर्न अंतर्गत साप्ताहिक चाचण्या, जेईई, सीईटी, नीट परीक्षा यांचे मार्गदर्शन केले जाते. बोर्ड पॅटर्न नुसार ५ सराव परीक्षा घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांची प्रगती एस.एम.एस. द्वारे पालकांना कळविली जाते. पालक मेळावा, सेमिस्टर प्रोग्रेस कार्ड, ऑलिम्पियाड परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा इ. चे नियोजन केले जाते. या वर्षी दि. २८ जानेवारी ते ३० जानेवारी २०१९ या कालावधीत ही कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेत ११३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता व त्यांना १२ तज्ञ मार्गदर्शकांनी मार्गदर्शन केले.

रयत शताब्दी महोत्सवानिमित्त दि. ८ ऑगस्ट २०१८ रोजी विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये ५५ विज्ञान उपकरणे व १२५ विज्ञान खेळणी प्रदर्शित करण्यात आली होती. तसेच रयत विज्ञान परिषद वाशी येथे व तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शनामध्ये विद्यार्थी व शिक्षकांचा सहभाग होता. या परिषदेसाठी ज्युनिअर विभागातून ३ शिक्षक व ११ विद्यार्थी सहभागी होते.

दि. २६ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर या कालावधीत रयत इन्स्पायर कॅम्प चे आयोजन करण्यात आले होते. या कॅम्प मध्ये ज्युनिअर



Scanned with CamScanner

विभागातील २० विद्यार्थी सहभागी होते. त्यातून एस.जी.एम. कॉलेज कराड येथे निवासी कॅम्पसाठी ५ विद्यार्थी पाठविण्यात आले होते. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी मा.प्राचार्य डॉ.बी.टी.जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली गुणवत्ता वाढ प्रकल्प चालु असून त्यामध्ये दररोज १ जादा तासिका, दिवाळी सुट्टीत ५ दिवस व उन्हाळी सुट्टी १५ दिवस जादा मार्गदर्शन केले आहे.

कला शाखेतील विविध उपक्रम पुढीलप्रमाणे : काव्यवाचन व कथाकथन, लेखक आपल्या भेटीला, वाचन प्रेरणा दिन, विविध विषयांचे तज्ञांचे मार्गदर्शनपर व्याख्याने, वाणिज्य शाखेतील विविध कोर्सेस व उपक्रम पुढीलप्रमाणे : सीपीटी कोर्स, बँकिंग सेल रिप्रेझेंटेटिव्ह कोर्स, टॅली कोर्स, सहकारी संस्था भेट, व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा, विविध विषयांचे तज्ञांचे मार्गदर्शनपर व्याख्याने; तसेच एच.एस.सी. व्होकेशनल कोर्स पुढीलप्रमाणे : शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील ऑन द जॉब ट्रेनिंग, औद्योगिक भेटी, टॅली, नर्सरी मॅनेजमेंट व इलेक्ट्रोनिक सर्टिफिकेट कोर्सचे आयोजन, कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत विविध विषयावर व्याख्याने, व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा, उत्पादनाभिमुख प्रशिक्षण अंतर्गत तिळगुळ विक्रीचे आयोजन करण्यात आले.

दि. १५ जानेवारी ते १७ जानेवारी २०१९ या कालावधीत युवा महोत्सवामध्ये वीणकाम, भरतकाम, वारली पेंटिंग, कोलाज, प्रश्नमंजूषा, समूहगीत, मूकनाट्य, लोककला व लोकनृत्य इ.स्पर्धा घेण्यात आल्या. विजेत्यांना ट्रॉफी व प्रशस्तीपत्रक देण्यात आले.

यावर्षी ५ जानेवारी २०१९ रोजी इयत्ता ११वी साठी सामान्य ज्ञान प्रमाणपत्र परीक्षा १ कर्मवीर विद्याप्रबोधिनी मार्फत घेण्यात आली. या परीक्षेसाठी ८२४ विद्यार्थी बसले होते. तसेच दि. ३ फेब्रुवारी २०१९ रोजी इयत्ता ७वी व इयत्ता ८वी साठी आर.टी.एस्. व रयत ऑलिम्पियाड परीक्षा आयोजित केली होती. ज्युनिअर विभागामार्फत संस्थेच्या मार्गदर्शनानुसार या परीक्षेचे आयोजन करण्यात आले.

यावर्षी ज्युनिअर विभागातील वैयक्तिक व सांघिक खेळामध्ये एकूण २७३ विद्यार्थ्यांचा सहभाग होता. यामध्ये १६६ मुले व १०७ मुली यांनी वैयक्तिक ८ व सांघिक १४ क्रीडा प्रकारामध्ये सहभाग घेतला. यापैकी १९९ जिल्ह्यास्तरीय, ५५ विभागीय, २४ राज्ये व ४ राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली.

२२ सप्टेंबर रोजी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंती निमित्त २३ सप्टेंबर ते २८ सप्टेंबर ''विद्यार्थी कौशल्य विकास कार्यक्रम'' अंतर्गत निबंध, वक्तृत्व स्पर्धा, सुंदर मराठी सही, सुंदर हस्ताक्षर, केशरचना, मेहंदी, फ्लॉवर अरेंजमेंट, सलाड अरेंजमेंट स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. २२ सप्टेंबर कर्मवीर जयंती निमित्त अण्णांच्या जीवनावर भित्तीपत्रक स्पर्धा आयोजित करण्यात आल्या.

प्रा.बी.एस.खाडे
पर्यवेक्षक, ज्युनिअर विभाग

## मराठी विभाग

मराठी विभागातर्फे या वर्षात विविध उपक्रम घेण्यात आले. 'युवतींसाठी कौशल्य विकास' मार्गदर्शन कार्यशाळा दि. ०७/०८/२०१८ या दिवशी संपन्न झाली. यामध्ये विविध विभागांमधील ६० पेक्षा जास्त विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. यामध्ये सचिन कुंभोदे आणि श्रीमती अंजोर कुंभोदे, कोल्हापूर यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

दि. १८, २५ व २९ ऑगस्ट रोजी विद्यार्थ्यांना ग्रंथालयाची संपूर्ण माहिती व्हावी या उद्देशाने 'ग्रंथालय भेट' या उपक्रमाचे नियोजन करण्यात आले होते. ग्रंथपाल प्रा.व्ही.एस.वाघेरे यांनी विद्यार्थ्यांना ग्रंथालय व्यवस्थापन, सॉफ्टवेअर, विद्यार्थी सुविधा यांच्याबद्दल मार्गदर्शन केले. यामध्ये ११६ विद्यार्थी सहभागी झाले.

बी.ए. भाग एक मधील विद्यार्थ्यांसाठी दि. २३/०८/२०१८ रोजी 'साहित्य संमेलन आणि राजकारण' या विषयावर गटचर्चा घेण्यात आली. यामध्ये एकूण पाच गटांमधून ६१ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

दि. २५/०८/२०१८ रोजी या उपक्रमांतर्गत बी.ए. भाग दोन मधील विद्यार्थ्यांच्या 'श्यामची आई' या पुस्तकावर आधारित पुस्तक परीक्षण स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये २४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

स्वातंत्र्य दिनानिमित्ताने विविध विषयांवर भित्तीपत्रकांचे प्रदर्शन केले. यामध्ये मराठी भाषेची ओळख, साहित्यकृतींचे माध्यमांतर, अण्णाभाऊ साठे व्यक्ती आणि वाङ्मय, मराठी भाषा आणि कौशल्य विकास, स्वातंत्र्य चळवळीतील साहित्यकांचे योगदान या विषयांवर प्रदर्शन व सादरीकरण करण्यात आले. शिक्षक दिनाचे औचित्य साधून मराठी विभागातील बी.ए.भाग दोन मधील विद्यार्थ्यांनी श्यामची आई : पुस्तक परीक्षण, कणा कवितेमधील शिक्षकांचे योगदान, ब.बळीचा कादंबरीमधील शिक्षणव्यवस्था या विषयांवर सादरीकरण करण्यात आले.



Scanned with CamScanner

कर्मवीर जयंती व रयत शताब्दी महोत्सव यानिमित्ताने मराठी विभागातील विद्यार्थ्यांनी भित्तीपत्रके तयार केली. प्रजासत्ताक दिन, २८ फेब्रु विज्ञान दिनानिमित्ताने पोस्टर सादरीकरणात कु.श्रद्धा पोरे (प्रकाशवाटाः सामाजिक कार्य) संग्राम हिंगळकर (गावगाडाः समाजव्यवस्था) तर कु.निकीता सूर्यवंशी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा मराठीचा भाषिक उपयोजनाची क्षमता एक अध्ययन संशोधन पेपरचे सादरीकरण केले. याबद्दल निकिता सूर्यवंशीला द्वितीय क्रमांक मिळाला.

दि. १०/०९/२०१८ रोजी महाविद्यालयाच्या गुणवत्ता वाढ कार्यक्रमांतर्गत मराठी विभागाने वादविवाद स्पर्धा दि. १०/०९/२०१८ रोजी घेतल्या. यामध्ये १० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने दि. १५/१०/२०१८ रोजी 'पुस्तकांचे गाव भिलार' या विषयावर डॉ.एन.व्ही.शिंदे यांचे व्याख्यान झाले. सदर व्याख्यानासाठी एकूण ११३ विद्यार्थी उपस्थित होते. या उपक्रमात वाढदिवसानिमित्त : कु.अंजली अशोक शिंदे, (बी.ए.भाग-१), कु.प्रियांका अवघडे (बी.ए.भाग-१) यांना ग्रंथ भेट देऊन शुभेच्छा दिल्या. 'शब्दसंहिता' या पुस्तकावर आधारित प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये १०२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

**वाचनसंस्कृती सर्व्हे :**

दि. १७/१०/२०१८ रोजी वाचनसंस्कृती सर्व्हे घेण्यात आला. यामध्ये ३४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. आविष्कार संशोधन स्पर्धेत 'नकोशीतील स्त्री चित्रण' याविषयावर कु.सोनाली माने व प्रतीक्षा शीलवंत यांनी शोधनिबंध सादर केला. 'मोबाईल आणि आजची तरूणाई' या विषयावर संतोष शेळके व ओंकार जगदाळे यांनी पोस्टर सादरीकरण केले. यातील सोनाली माने हिला उत्कृष्ट शोधनिबंधाचे बक्षीस मिळाले.

**वक्तृत्व स्पर्धा :**

१) सिद्धनाथ संस्था व महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दहिवडी यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दि. १३/१२/२०१८ रोजी घेण्यात आलेल्या शिवाजीराव भोसले जिल्ह्यास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत पाच विद्यार्थी सहभागी झाले. कु.सोनाली माने, कु.मोनाली माने, संतोष शेळके, शुभम देशमुख या स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक कु.मोनाली माने हिने मिळविले.

२) दहिवडी कॉलेज आणि दहिवडी नगरपंचायत दहिवडी यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १७/१२/२०१८ रोजी स्वच्छता सर्वेक्षण २०१९ अंतर्गत घेण्यात आलेल्या वक्तृत्व निबंध स्पर्धा वक्तृत्व स्पर्धेत ९ विद्यार्थी सहभागी झाले. या स्पर्धेत प्रथम क्रमांक कु.मोनाली माने, द्वितीय क्रमांक नीलम पवार, तृतीय क्रमांक प्रतीक्षा माने यांनी प्राप्त केला. निबंध स्पर्धेत २२ विद्यार्थी सहभागी झाले. प्रथम क्रमांक एकनाथ वाघमोडे, द्वितीय क्रमांक कु.प्रतीक्षा माने, तृतीय क्रमांक संतोष शेळके यांनी यश मिळविले.

महाविद्यालयात दि. २७ डिसेंबर रोजी वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेत १८ विद्यार्थी सहभागी झाले. या स्पर्धेसाठी उद्घाटक डॉ. शिवलिंग मेनकुदळे व मार्गदर्शक म्हणून सौ.पवार, सौ.देवकर, श्री.शेख हे अतिथी लाभले. तसेच 'संभाषण : एक कला' या कार्यशाळेचे उद्घाटन व मार्गदर्शन डॉ.शिवलिंग मेनकुदळे यांनी केले.

रयत शताब्दी महोत्सवानिमित्त सातारा जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा दि. ०४/०१/२०१९ रोजी घेण्यात आल्या. या स्पर्धेत [illegible] विद्यार्थी सहभागी झाले. या स्पर्धेचे उद्घाटन मा.प्राचार्य डॉ. अशोक भोईटे यांनी केले.

महाविद्यालयात दि. २७/१२/२०१८ रोजी मराठी, हिंदी व इंग्रजी विभाग व माणदेशी तरंग वाहिनी यांच्या सामंजस्य करारांतर्गत दि. २९ जानेवारी २०१९ रोजी 'कथालेखन व कथाकथन' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. यामध्ये विजया बाबर, कांता भोसले, रवींद्र कोकरे, लक्ष्मण मोहिते यांनी कथालेखनावर मार्गदर्शन करुन कथा सादरीकरण केले. यामध्ये ४३ विद्यार्थी व शिक्षक सहभागी झाले.

परशुराम म. शिंदे कन्या विद्यालय, दहिवडी येथे मराठी विभागातर्फे 'मराठी व्याकारण सल्लागार उपक्रमाचे' आयोजन शनिवार दि. १९ जानेवारी २०१९ रोजी करण्यात आले. यामध्ये १९ विद्यार्थ्यांनी पाचवी ते दहावी च्या विद्यार्थ्यांना व्याकरणाचे अध्यापन केले. दि. २० फेब्रुवारी २०१९ रोजी प्राचार्य डॉ.बी.टी.जाधव यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी बहुसंख्य पालक उपस्थित होते. शिक्षक व पालक संघाची बैठक संपन्न झाली. मराठी विभागातर्फे ग्रामीण पत्रकारिता कोर्स कार्यरत असून मराठी बी.ए.भाग-३ चे २१ विद्यार्थी सहभागी आहेत.

संशोधन मराठी विभागातील डॉ.देवानंद सोनटक्के यांचा 'बोलावे ते आम्ही', 'अंतपर्वः सामाजिक वेदनेची कविता' व 'स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीतील बदल' या विषयांवर शोध निबंध



Scanned with CamScanner

प्रसिद्ध झाले आहेत. डॉ.एस.बी.वाघमोडे यांचा 'मराठी भाषेतील व साहित्यातील आधुनिक प्रवाह या विषयावर शोध निबंध प्रसिद्ध झाला.

**डॉ.देवानंद सोनटक्के**
विभागप्रमुख

## हिंदी विभाग

बी.ए. भाग-१ हिंदी ऐच्छिक-१७७, हिंदी (अनिवार्य) ११५, बी.ए.भाग-०२-७५, बी.ए.भाग-०३ १८ या विषयासाठी विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून संपूर्ण वर्षभरामध्ये विभागामार्फत खालील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी पोस्टर प्रेंझेटेंशनमध्ये सहभाग घेतला होता.

दि. १५ ऑगस्ट २०१८ बी.ए.भाग-३ एकूण ०६ पोस्टर प्रेंझेटेशमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. शिक्षक दिन पोस्टर स्पर्धेत बी.ए.भाग-२ मधील एकूण ०५ पोस्टर प्रेंझेटेशमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. हिंदी दिन पोस्टर स्पर्धेत दि. १४ सप्टेंबर २०१८ बी.ए.भाग-१,२,३ एकूण ०२ पोस्टर प्रेंझेटेशमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कर्मवीर जयंती पोस्टर स्पर्धेत दि. २२ सप्टेंबर २०१८ बी.ए.भाग-३ एकूण ०६ पोस्टर प्रेंझेटेशमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्रजासत्ताक दिन पोस्टर स्पर्धेत दि. २६ जानेवारी २०१९ बी.ए.भाग-२ एकूण ०३ पोस्टर प्रेंझेटेशमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विज्ञान दिन पोस्टर स्पर्धेत दि. २८ फेब्रुवारी २०१९ बी.ए.भाग-०१ एकूण ०५ पोस्टर प्रेंझेटेशमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. एकूण पोस्टसंख्या २७ होती.

हिंदी विभागाच्या 'समाचार लेखन एवं साक्षात्कार कला' या शॉर्ट टर्म कोर्सतर्फे अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात येऊन वाई येथील शासकीय मुद्राणालय मराठी विश्वकोष कार्यालय, पुस्तकांचे गाव भिलार, लोकमंथन दैनिक कार्यालय सातारा यास भेट दिली.

हिंदी दिन समारंभासाठी कला वाणिज्य महाविद्यालय मायणी येथील प्रा. शिवशंकर माळी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याबरोबरच विद्यार्थ्यांनी भाषा सर्वेक्षण प्रकल्प पूर्ण केला. दहिवडी येथील अंध अपंग शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांना खाऊ वाटप केले व त्यांचे मनोरंजन केले. विभागातील विद्यार्थ्यांच्यासाठी टॅलेंट व प्रोगेसिव्ह विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे मार्गदर्शन करण्यात आले. यासाठी प्राचार्य डॉ.बी.टी.जाधव यांनी मार्गदर्शन केले व प्रा.डॉ.के.एम पवार यांनी सहकार्य केले.

**प्रा.डॉ.बी.एस.बलवंत,** विभागप्रमुख

## इंग्रजी विभाग

सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात इंग्रजी विभागामध्ये एकूण विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. English Language व Literary Association (ELLA) मार्फत B.A.-I साठी English Opt. निवडलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत गुलाबुपुष्प देऊन करण्यात आले. दि. ७ डिसेंबर २०१८ रोजी श्री. शिवशाहू महाविद्यालय [illegible] येथील इंग्रजी विभागप्रमुख डॉ.पी.बी.पाटील यांचे Structure and Function of Modern English' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. दुसऱ्या सत्रामध्ये विभागातील विद्यार्थ्यांनी दहिवडी व वडूज परिसरातील एकूण ५ माध्यमिक विद्यालयांना भेट देवून English Grammar शी संबंधित घटकांचे अध्यापन केले. Grammar Consultancy ही विभागाची Extension Activity असून त्याअंतर्गत परिसरातील माध्यमिक विद्यालयांना भेट दिली जाते व Communication Skills तसेच Grammar शिकविले जाते.

DCD News Bulletin हा महाविद्यालयाचा [illegible] उपक्रम असून इंग्रजी विभागाच्या वतीने हा उपक्रम राबविला जातो. पहिल्या सत्रामध्ये विभागातील विद्यार्थ्यांनी DCD News [illegible] हे बुलेटिन सादर केले. त्यामध्ये सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

दि. १२ जानेवारी २०१९ रोजी विभागाच्या वतीने Poetry Exhibition चे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन प्राचार्य डॉ.बी.टी.जाधव व डॉ.संभाजी शिंदे (Bos सदस्य) यांच्या शुभहस्ते झाले. दि.११ एप्रिल रोजी रयत शिक्षण संस्थेच्या AAA समीतीने मूल्यांकन केले.

**प्रा.डॉ.ए.एन.दडस**
विभागप्रमुख

## राज्यशास्त्र विभाग

शैक्षणिक वर्ष सन २०१८-१९ मध्ये राज्यशास्त्र विभागाच्या वतीने वेगवेगळे विद्यार्थी केंद्रित उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये दि. ३१ ऑगस्ट २०१८ रोजी विधिसेवा समिती व राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन युवतीच्या सुरक्षतेसाठी पोक्सो ॲक्ट २०१२ या विषयावर विषय चर्चासत्र आयोजित करण्यात आले. त्यामध्ये दहिवडी न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश अमितसिंह मोहणे, दहिवडीचे स.पो.नि.प्रविण पाटील व गटविकास अधिकारी गोरख शेलार यांनी मार्गदर्शन केले.

महाविद्यालयातील नवमतदारांची नावनोंदणी विभागाच्या माध्यमातून करण्यात आली. यामध्ये हिविद्यालयातील ४००



Scanned with CamScanner

विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यात आली. २६ नोव्हेंबर २०१८ रोजी संविधान दिन मा.प्राचार्यासमवेत साजरा करण्यात आला. महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, प्राध्यापक, सेवकांनी राज्यघटनेच्या सरनाम्याचे सामूहिक वाचन केले. २५ जानेवारी २०१९ रोजी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त महाविद्यालयात दहिवडी महसूल प्रशासनाच्या सहकार्याने अभिरूप मतदान प्रक्रियेचे आयोजन करून महाविद्यालयातील नवीन मतदारांना मतदान प्रक्रियेची, ई.व्ही.एम. व व्ही.व्ही.पॅट मशीन्स ची माहिती देण्यात आली. यामध्ये महाविद्यालयातील सुमारे ६०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. तसेच संविधानाविषयी जनमानसामध्ये जागृती निर्माण व्हावी या उदात्त हेतूने महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाच्या वतीने संविधान साक्षरता अभियानांतर्गत संविधान दूतांची निवड करून मा.प्राचार्यांच्या हस्ते त्यांना निवडीचे पत्र देण्यात आले.

**प्रा.पी.एस.प्रक्षाळे**
विभागप्रमुख

## इतिहास विभाग

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये इतिहास विभागामार्फत जून-जुलै दरम्यान टी.वाय.बी.ए. च्या विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया पूर्ण करून ९ ऑगस्ट २०१८ रोजी सातारा इतिहास संशोधन मंडळ व दहिवडी कॉलेज दहिवडी इतिहास विभागाच्या वतीने ९ ऑगस्ट रोजी क्रांतिदिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख वक्ते मा.माजी प्राचार्य डॉ.विजय नलावडे यांनी 'भारतीय स्वांतत्र लढा व भूमिगत चळवळीचा इतिहास' सांगितला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे मा.प्राचार्य डॉ.बी.टी.जाधव उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या वेळी इतिहास विभागप्रमुख प्रा.शिंदे के.एस., व प्रा.रसाळ डी.के., प्रा.मोरे बी.व्ही. व महाविद्यालयाचे इतर सहकारी उपस्थित होते. महाविद्यालयातील बी.ए.भाग-३ मधील इतिहास विभागाच्या विद्यार्थ्यांनी १५ ऑगस्ट २०१८ स्वातंत्र्यदिनानिमित्त पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर ५ सप्टेंबर २०१८ रोजी शिक्षक दिनानिमित्त बी.ए.भाग-२ च्या विद्यार्थ्यांनी भित्तिपत्रकाचे आयोजन केले व २२ सप्टेंबर २०१८ रोजी कर्मवीर जयंतीनिमित्त दहिवडी शहरातून सर्व विद्यार्थ्यांनी रॅलीमध्ये सहभाग घेतला.

- बुधवार दि. २४/१०/२०१८ रोजी बी.ए.भाग-३ च्या विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय शैक्षणिक सहल सातारा-महाबळेश्वर-प्रतापगड येथे गेली होती.
- दि. ७/१२/२०१८ रोजी इतिहास विभाग, डेक्कन पुरातत्त्वीय सांस्कृतिक संशोधन संस्था हैद्राबाद व गांधी रिसर्च फाऊंडेशन जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने वस्तुसंग्रहालय उद्घाटन घेण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा.बी.आर.बोबडे हे होते यावेळी मा. रावसाहेब देशमुख व मा.प्राचार्य डॉ.बी.टी.जाधव, विद्यार्थी, प्राध्यापक हजर होते.
- दि. ९/२/२०१९ रोजी इतिहास विभाग, अग्रणी कॉलेज व डेक्कन पुरातत्त्वीय सांस्कृतिक संशोधन संस्था हैद्राबाद यांच्या संयुक्त विद्यमाने 'पर्यटनाच्या दृष्टीने वस्तुसंग्रहालयाचे महत्त्व' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेचे उद्घाटक मा. विक्रमसिंह पाटील (विहे-पाटण) हे होते यांनी युद्ध साहित्याविषयी माहिती दिली. मा.रावसाहेब देशमुख बिदाल यांनी 'पर्यटन व स्थानिक इतिहास' या विषयी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेसाठी मा.प्राचार्य डॉ.बी.टी.जाधव व सर्व सहकारी प्राध्यापक यांचे सहकार्य लाभले.

**प्रा.के.एस.शिंदे**
विभागप्रमुख

## भूगोल विभाग

११ जुलै (लोकसंख्या दिन) शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल अभ्यासमंडळाचे सदस्य प्रा.डॉ.एन.व्ही.तेलोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा करण्यात आला. १६ सप्टेंबर (ओझोन दिन) रोजी छ.शिवाजी कॉलेज सातारा येथील प्रा.डॉ.सुभाष विठ्ठल कारंडे यांनी 'ओझोनचे मानवी जीवनातील महत्त्व व त्यांच्या संरक्षणासंदर्भात आपली भूमिका' याविषयी व्याख्यान दिले. १४ जानेवारी या भूगोल दिनानिमित्त प्रा.डॉ.पी.आर तळेकर, संत गाडगे महाराज कॉलेज, कराड यांनी भूगोलाचे बदलते स्वरूप याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच पर्यटन या शॉर्ट टर्म कोर्ससाठी प्रा.डॉ.पी.आर.तळेकर यांनी 'भारतातील पर्यटन व्यावसायातील संधी' या विषयावर व्याख्यान दिले.

भूगोल विभाग व शिवाजी विद्यापीठातील भूगोल विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने १२ जानेवारी रोजी Application of Remote Sensing and GIS in Disaster Management या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले. या कार्यशाळेस एकूण २२० विद्यार्थी व २१ प्राध्यापकांनी सहभाग घेतला. कार्यशाळेसाठी प्रा.डॉ.एस.एस.पन्हाळकर, प्रा.डॉ.एस.डी.शिंदे, सदस्य प्रा.डॉ.टी.पी.शिंदे, प्रा.अभिजीत पाटील यांनी विषयतज्ज्ञ म्हणून



Scanned with CamScanner

काम केले. विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांतर्गत 'मौजे येळेवाडी गावाचा भौगोलिक अभ्यास' आणि कोकणात शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आली. पार्वतीबाई चौगुले कॉलेज, मडगाव येथील भूगोल विभागाशी असलेल्या MOU अंतर्गत Student Exchange Activity राबविण्यात आली आणि व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

मोगराळे येथील सौरऊर्जा प्रकल्पाची पाहणी केली. प्रा.संजय दिवटे यांची शिवाजी विद्यापीठाच्या B.Voc. Agriculture विषयाच्या अभ्यासमंडळाच्या सदस्यपदी निवड झाली आहे. तसेच त्यांनी शिवाजी विद्यापीठाला Ph.D. चा प्रबंध सादर केला आहे. विभागातील प्राध्यापकांचे एकूण ८ आंतरराष्ट्रीय व ३ राष्ट्रीय स्तरावरील विविध जर्नल मध्ये शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत.

डॉ.ए.जे.बरकडे
विभागप्रमुख

## ग्रंथालय विभाग

महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील एकूण ग्रंथसंख्या ८०,६१३ इतकी आहे. चालू अर्थिक वर्षात एकूण १,७६,५०४ रूपये किंमतीची २,००५ ग्रंथाची भर पडली आहे. अजूनही ग्रंथांची खरेदी चालू आहे. ग्रंथालयात एकूण ३८ नियतकालिके व ११ वर्तमानपत्रे उपलब्ध होत असल्याने प्राध्यापक व विद्यार्थी यांना आपले ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी उपयोग होत आहे. बुक-बँक योजनेचा लाभ गरीब व होतकरू ५९५ विद्यार्थ्यांनी घेतला.

ग्रंथालयाने संगणकीकृत सेवा प्राध्यापक व विद्यार्थ्यांना करून देण्यात आली आहे. तसेच ग्रंथालयाचे पाच महाविद्यालयाच्या ग्रंथालयाबरोबर अंतर्गत देवाण-घेवाण योजनेचे सभासदत्व घेऊन सुविधा सभासदांना करून देण्यात आली आहे. वाचन संस्कृती जपण्यासाठी महाविद्यालयाच्या ग्रथांलयाने जवळपास असलेल्या विद्यालयातील प्राध्यापकांना ग्रंथालय सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जन्म दिनानिमित्त १५ ऑक्टोबर हा 'वाचन प्रेरणा दिवस' महाविद्यालयात साजरा करण्यात आला. प्रा.डॉ.एन.डी.लोखंडे व कु.शिरसट ऋषिकेश यांच्या उत्कृष्ट वाचक म्हणून सत्कार करण्यात आला. चालू वर्षात ग्रंथालय विभागाने e-Content Development या विषयावर एक दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे नियोजन केले होते. यामध्ये एकूण ८० प्राध्यापकांनी सहभाग नोंदविला.

प्रा.व्ही.एस.वाघेरे
विभागप्रमुख

डॉ.बी.एस.बलवंत
चेअरमन

## प्राणिशास्त्र विभाग

प्राणिशास्त्र विभागाने यावर्षी दि.७-८-२०१८ रोजी विद्यापीठस्तरीय एकदिवसीय Revised Syllabus of B.Sc.I या कार्यशाळेचे आयोजन केले होते. प्राणिशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयामध्ये विविध दिनांचे औचित्य साधून ३० रिसर्च पोस्टर्स सादर केली. तसेच ५ विद्यार्थ्यांनी Project Based Learning स्पर्धेत सहभाग घेऊन यामध्ये कु.अमृता मालती खाडे (बी.एस्सी.-२) या विद्यार्थीनीचा प्रथम क्रमांक आला.

तसेच दि.२९-१-२०१९ रोजी Vermiculture व Sericulture या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. दि.१६-२-२०१९ रोजी ॲस्ट्रॉनॉमर डॉ.विशाल कुंभारे यांचे स्कोप ऑफ सायन्स इन ॲस्ट्रोलॉजी या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते.

बी.एस्सी.१, २ व ३ च्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल पिंगळी धरण व अहिल्यादेवी शेळी मेढीपालन प्रक्षेत्र दहिवडी येथे आयोजित करण्यात आली होती.

यावर्षी विभागामार्फत ४ आंतरराष्ट्रीय संशोधन प्रकल्प प्रसिध्द झाले.

दि.२९ मार्च २०१९ रोजी विभागामार्फत राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व कार्यक्रमासाठी आदरणीय प्राचार्य डॉ.बी.टी.जाधव यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

डॉ.एम.जे.लुबाळ
विभागप्रमुख

## *Department of Botany*

The department of Botany runs " P.G. Diploma in green Chemistry and Crop protection under "Innovative programme of U.G.C since 2010. The college has organized "Rayat INSPIRE" camp of 5 days duration for higher secondary students of various high schools. 40 students participated in this camp. The departmental faculty guided these students about research projects and opportunities.

Wall paper presentations were organized on 15th August 2018, 5th September 2017, 22nd September 2018, 26th January 2019. Students of B.Sc. I, II and III has participated in Avishkar



Scanned with CamScanner

competition and Science Exhibition organized by our college. Students of B.Sc.I has actively participated in Rayat Avishkar Competition in S.G.M college Karad and presented an equipment of Azolla cultivation & their uses, Medicinal plants, Stomatal & eutieular Transpiration.

B.Sc.III students has celebrated Teachers day on the occasion of birth anniversary of Dr. Sarvapalli Radhakrishnan, dated 5th September 2018. Plant Protection students of B.Sc.II has visited Botanical garden for getting information about plants on 15th October 2018 in presence of Prof. Kamble V,.V. and Prof. Miss. Yele R.B.

One Day Excursion was arranged on 17th October 2018 at Sade-Waghapur and Koyananagar all B.Sc.III Botany students have enjoyed the study tour & Two Day Excursion was arranged on 23th & 24th January 2019 at Sericulture centre Wai, Wheat research centre Mahabaleshwar, Konkan Krishi vidyapeeth Dapoli, Harane port, Ratgad. All B.Sc.II & B.Sc.III Botany students have enjoyed the study

B.Sc.III, Botany students has enthusiastically participated in Research paper presentation entitled 'FLORISTIC DIVERSITY OF THE MAN TAHESIL, STUDY OF PHYSICO-CHEMICAL CHARACTERISTICS OF PINGALI LAKE, and Enumeration of Medicinal plants from Phaltan region of Satara district in our college' on 7th December 2018.

Students of B.Sc.I, II and III has participated in Avishkar competition and Science Exhibition organized by our college. Students of B.Sc. I has actively participated in Rayat Avishkar Competition in S.G.M College Karad & Karmveer Bhaurao Patil College Washi and presented an equipment of Azolla cultivation & their uses, Medicainal Plants, Stomatal, culticular Transpiration & Enumeration of medicinal plants from Dahiwadi region of Satara District.

One Day University level workshop on 'Recent Trends in Biotechnology' Prof. R.K. Sakhare, S.R.College Khatav has inaugurated Recent Trends in Biotechnology Programme on 18th January 2019. Prof.G.B. Pawar & Prof.P.S.Phalake. Dept.of Botany, Balwant College, Vita has worked resource persons in presence of Hon. Prin.Dr.B.T.Jadhav.

One Day University level workshop on Green Audit. Dr.B.L.Chavan, BAMU, Aurangabad was the chief guest on the occasion of inauguration function and Dr. B.T. Jadhav was the president of the function. Dr. Ganesh Kadam, Thane (Mumbai), Dr. Mahendra Ahire has worked resource persons on 9th February 2019.

B.Sc.I, Botany students has enthusiastically participated in Exhibition of Floral arrangement 'on 15th February 2019.

B.Sc.II, Botany (Plant Protection) students has enthusiastically participated in Exhibition of Importance of Weeds & Insects on 20th February 2019 in presence of Principal Dr.B.T. Jadhav, Vice Principal B.S.Balwant, Prof.Kamble V.V.

Botany students has enthusiastically participated in Research Paper presentation entitled 'SCREENING OF Excoecaria agallocha L. FOR CHEMICAL POTENTIAL, STUDY OF PHYSICOCHEMCAL CHARACTERISTICS OF ANDHALI LAKE, OF MAN TAHSIL, A comparative study of the different parts of Acaciaon 28th February 2019.

The department runs UGC approved Career Oriented Course, Biotechnology; Skill based courses Viz. Herbal Cosmetics (Symbiosis, Pune) and Drip irrigation and Sprinkler (Jain Irrigation, Jatgaon) for B.Sc.II students and Short term course; Conservation of Local seed varieties for B.Sc. III students.



Scanned with CamScanner

Maintenance of plants in campus and shade nets was under the supervision of our departmental staff.

Prof Kambte V.V. he has received grants of Rs.10,000/- from research corpus fund of Dahiwadi his research project proposal entitled 'Floristic study of Monocotyledon from Dahiwadi area.'

**V.V.Kambale**
**HOD**

## बी.सी.ए. विभाग

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये बी.सी.ए. विभागात, भाग-१ मध्ये ७६, भाग-२ मध्ये ६०, भाग-३ मध्ये ३६ असे एकूण १७२ विद्यार्थी शिकत आहेत. महाविद्यालयाने दि. ०४/०८/२०१८ रोजी आयोजित केलेल्या Orientation Programme मध्ये बी.सी.ए. भाग-१ मधील विद्यार्थी सहभागी झाले. मराठी विभागाने आयोजित केलेल्या वादविवाद स्पर्ध्येमध्ये बी.सी.ए. भाग-३ मधील कु. सूर्यवंशी रूपाली हिने प्रथम क्रमांक मिळवला. अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत दि. २३/०१/२०१९ रोजी डेटा मायनींग व डेटा वेअरहाऊसिंग या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित केली. यासाठी प्रा.डॉ.पी.पी.पाटील, कराड व प्रा.एस.एस.लामकाने, फलटण हे तज्ञ मार्गदर्शक उपस्थित होते. दि. २५/०१/२०१९ रोजी मुधोजी कॉलेज फलटण या ठिकाणी आयोजित केलेल्या राज्यस्तरीय टेक++ या स्पर्धेत पोस्टर प्रेझेंटेशन मध्ये सूर्यवंशी रुपाली व थोरात मयुरी यांनी तृतीय क्रमांक मिळविला. विभागाने दि. १५/०२/२०१९ रोजी आयोजित केलेल्या राज्यस्तरीय सेमिनार 'न्यू ट्रेंड्स इन कॉम्प्युटर सायन्स अ‍ॅण्ड आय टी व डीसीडी क्येस्ट २०१९' च्या उद्‌घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ.आर.जी.पवार, माळेगाव बु।। व अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.टी.जाधव उपस्थित होते. 'डीसीडी क्येस्ट २०१९' मध्ये विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये पेपर प्रेझेन्टेशनमध्ये ०५, पोस्टर प्रेझेंटेशनमध्ये २२, प्रश्नमंजुषामध्ये २८ व प्रोग्रामिंग स्कीलमध्ये १८ संघ सहभागी झाले. या स्पर्धेमध्ये सातारा, सांगली व पुणे जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी झाले.

**प्रा.ए.एच.कोळेकर**
**विभागप्रमुख**

## अर्थशास्त्र विभाग व नियोजन मंडळ

महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागामार्फत खालील उपक्रमामध्ये सहभाग नोंदविला होता.

- दि. १५ ऑगस्ट २०१८ रोजी आयोजित केलेल्या भित्तीपत्रक स्पर्धेमध्ये विभागातील १० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यांनी 'महात्मा जोतीराव फुले यांचे अर्थिक विचार', 'डॉ.धनंजय गाडगीळ यांचे अर्थिक विचार', 'डॉ अमर्त्य सेन यांचे अर्थिक विचार', 'राजर्षि शाहू महाराजांचे अर्थिक विचार', 'यशवंतराव चव्हाण यांचे अर्थिक विचार' या विषयांवर भित्तिपत्रके सादर केली.
- दि. ०५/०९/२०१८ रोजी शिक्षकदिनानिमित्त आयोजित भित्तीपत्रक स्पर्धेमध्ये बी.ए.भाग-२ मधील १० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला त्यांनी 'दादाभाई नौरोजींचे अर्थिक विचार', 'कौटिल्याचे अर्थिक विचार', 'महात्मा गांधी यांचे अर्थिक विचार', 'महादेव गोविंद रानडे यांचे अर्थिक विचार', 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अर्थिक विचार' या विषयावर भित्तिपत्रके सादर केली.
- दि. २२/०९/२०१८ रोजी कर्मवीर जयंती निमित्त आयोजित करण्यात आलेल्या भित्तिपत्रक स्पर्धेत बी.ए. भाग-१ मधील १० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. यामध्ये 'कर्मवीरांचे जीवन कार्य', 'कर्मवीरांचे अर्थिक कार्य', 'रयत शिक्षण संस्थेचा आर्थिक इतिहास', 'कर्मवीरांचे सामाजिक कार्य', 'कर्मवीरांची फोटो गॅलरी' या विषयावर भित्तीपत्रकाचे सादरीकरण करण्यात आले.

'अविष्कार' संशोधन स्पर्धेमध्ये विभागातील बी.ए.भाग-३ मधील १० विद्यार्थ्यांनी ५ संशोधन पेपर सादर केले. यामध्ये सातारा जिल्ह्यातील बचत गटांचा अभ्यास, जलव्यवस्थापन, शेततळी सातारा जिल्ह्यातील आरोग्यविषयक सुविधा या विषयावर निबंध सादर केले.

प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या संशोधन भित्तीपत्रक स्पर्धेत विभागातील ३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यांनी भारतीय बँकामधील अलिकडील प्रवाह, भारतीय बँकातील विलीनीकरणाची प्रक्रिया, ई-बँकिंग या विषयावर भित्तीपत्रके सादर केली. या स्पर्धेमध्ये कु.प्रतीक्षा रघुनाथ पवार या विद्यार्थिनीने द्वितीय क्रमांक प्राप्त केला.



Scanned with CamScanner

दि. २८/०२/२०१९ रोजी विज्ञान दिनानिमित्त आयोजित केलेल्या संशोधनच्या भित्तीपत्रक स्पर्धेत ३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यामध्ये 'सातारा जिल्ह्यातील निरनिराळ्या पिकांखालील क्षेत्राचा अभ्यास', 'सातारा जिल्ह्यातील दुग्ध सहकारी संस्थांचा अभ्यास', 'सातारा जिल्ह्यातील लोकसंखेचा अभ्यास' या विषयावर भित्तीपत्रके सादर केली.

दि. ०६/०३/२०१९ रोजी अर्थशास्त्र विभाग व वाणिज्य विभाग यांचे संयुक्त विद्यमाने 'अर्थशास्त्र, वाणिज्य व व्यवस्थापन शास्त्र विषयातील अलिकडील प्रवाह' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. उद्घाटक म्हणून डॉ.आर.बी.बावधनकर (प्राचार्य यशवंतराव चव्हाण कॉलेज पाचवड) तर बीजभाषक म्हणून डॉ.व्ही.एम.कुंभार (डी.जी. कॉलेज सातारा) यांनी 'तंत्रज्ञान आणि बँकिंग' या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ.बी.एच.जंगले यांनी 'बॅकिंग सुधारणा' या विषयावर मार्गदर्शन केले. द्वितीय सत्रामध्ये डॉ.एम.जी.थोपटे यांनी 'चलनविषयक धोरणातील बदल' या विषयावर मार्गदर्शन केले. तिसऱ्या सत्रामध्ये डॉ.डी.एम.बागडे यांनी 'भारतीय अर्थव्यवस्थेतील शेती, उद्योग, सेवा क्षेत्र यातील नवीन बदलांचा आढावा घेतला. सदर चर्चासत्राचा समारोप समारंभ डॉ.एस.एम कांबळे (प्राचार्य कला वाणिज्य महाविद्यालय, पुसेगाव) यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या चर्चासत्रामध्ये १७२ विद्यार्थी व २० प्राध्यापकांनी सहभाग घेतला.

वरील सर्व उपक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.टी.जाधव सर व विभागातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

**डॉ.एस.आर.जावळे**
**विभागप्रमुख**

## पर्यटन

बी.ए.भाग-३ भूगोल विषयासाठी पर्यटन या कोर्ससाठी ३३ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे. या कोर्सचा अभ्यासक्रम विभागातील सर्व सहकार्यानी तयार करून पूर्ण केलेला आहे.

**प्रा.ए.जे.बरकडे**
**चेअरमन**

## *Induction cum Orientation Programme*

In this activity, first year students from various faculties were oriented on 2nd, 3rd, and 4th August 2018 on "Higher Education, Future Opportunities & Research Awareness". In this activity experts from our college had oriented and guided students on various issues, Prof.Dr.Dadas A (Higher Education in India), Prof.Dr.Gaikwad V.P. (Skill Development & Competitive Exams.), Prof.Dr.Lubal M.J.(CoC's & STC Courses), Prof.Dr.Pawar N.K., Prof.Dr. Khetre (Research Methodology), Prof.Lokhande N.D. (Placement and Career Counselling), Prof.Dr.Barkade A.J., Prof.Kolekar A.H., Prof.Mhetre (CBCS) contributed a lot.

Co-ordinator Asst.Prof.Patole V.S. along with Dr.Pawar K.M. executed the programme under the guidance of Hon. Principal Dr. B.T. Jadhav.

**Prof.V.S.Patole**
**Head of the Department**

## *Quality Improvement Programme*

In this activity few programmes had been selected to gain the quality among the students of various faculties. Programmes like debate competition, workshop on calligraphy, Effect of social media on human life, interview skills, Guidance for progressive batch and Talent batch etc.had been included in the QIP programme.

In the first term In-charge professor Dr. Shinde N.V. had successfully executed "debate competition" on 07th September 2018 in hall No. A12. Total 12 students had actively participated in such event and expressed their views on "Social media and Social Health", "Reservation and Indian Society", "Well educated Society and Protection of women", GST, "Journey of higher education -Decline or progress". Dr. Pawar K.M. & Prof. Patole V.S. were the examiners for this event.

In second term, workshop on "Improving handwriting skills and writing style" had been



Scanned with CamScanner

organized on 3rd January 2019 in competitive examination Hall. Resource person Shri. Shaikh S.S. Art teacher of P.M. Shinde Girls' Highschool, Dahiwadi had delivered lecture with the demonstration. Almost 86 students from Arts stream were directly benefitted through this workshop.

**Prof.V.S.Patole**
**Head of the Department**

## *Department Of Education*

In the academic year Department of Education had successfully carried out the following activities.

**Research Poster Presentation**

For the all-round development of the students, various curricular and co-curricular activities were organized in the college. On 15th August 2018, 05th September 2018, 22nd September 2018, 26th January 2019 "Poster presentation" activities were executed by the students from the department of education on topics like 'No smoking', 'Famine', 'U.P.S.C. exam','Cancer', 'Open School', 'Global warmning', 'Savitribai Phule', 'Maharshi Dhondo Keshav Karve', 'Ravindranath Tagore', 'Liver Transplantation', 'Tooth implanting', 'Clear vision' etc. Almost 25 students from the department had actively participated. These students were guided by Shri.Patole V.S. students were appreciated by the Principal Dr. B.T. Jadhav and entire staff of the college and students.

**"AVISHKAR" Research paper Presentations 07th Dec. 2018**

Following Students from F.Y.B.A. (STD/ Education) had been actively participated and presented research papers.

1) Gend Dilip Dashrath, F.Y.B.A., दहिवडी न्यायालयात चालू असलेल्या वेगवेगळ्या खटल्यांच्या सद्यस्थितीचा अभ्यास
2) Tapkire Aniket Bharat & Shinde Hrishikesh, F.Y.B.A. माध्यमिक स्तरावरील शिक्षकांत मोबाईलचा अध्ययन अध्यापनासाठी प्रभावी वापर : एक चिकित्सक अभ्यास
3) Kadam Komal Harishchandra & Jadhav Mayuri, F.Y.B.A., महाविद्यालयीन विद्यार्थ्यांत कॉपी करण्याच्या मानसिकतेच्या कारणांचा अभ्यास

**Research Paper Poster Presentation 2018-19**

In the academic year 2018-19 almost 545 students from Arts/Commerce/Science (I/II/III) had presented Research Papers on various issues on the occasion on 15th August 2018, 5th September 2018, 22nd September 2018 and 28th January 2019, 28th February 2019. On the occasion of science day, an interdisciplinary Research Poster book containing 100 images of the research posters presented throughout the year is published and unveil on 2nd March, 2019 by the Hon.Dr.Savitribai Phule Pune University, Pune.

**Prof.V.S.Patole**
**Head of the Department**

## *Depatment Of Physics*

Department of Physics organized different activities in academic year 2018-2019, such as poster presentation, model presentation, project presentation competition on recent topics in Physics. Under Lead College Activity, a one day workshop on "Career Opportunities After B.Sc." and "Advances in Research" was organized on 5th Feb 2019. Dr. Torane A.P. and Mr. Pagare P.K. from Y.C.I.S Satara were invited as resource persons for the workshop. One day Study tour was arranged near incubation centre Green Power Sugar Pvt Ltd, Gopuj on 25th Jan 2019.

**Prof.Mrs.S.B.Mane**
**Head of the Department**

## *Institution's Innovation Council*

In college Institution's Innovation Council and Innovation Lab was established under



Scanned with CamScanner

Ministry of Human Resource Development. Govt. of India. The programmes organized by this Ministry were conducted in college according to prescribed schedule. We arranged live session or webinar on India's Leadership Talk Series by Hon. Dr. Anand Mahindra, Hon. Ms. Shwetashree Majumder. Hon. Dr. Anand Deshpande organized by Ministry of Human Resource. One day workshop on 'Student's Workshop on Innovations Basic', "Cognitive skills. Design Thinking and Critical Thinking", and "Intellectual Property Rights" was organized in Multipurpose Hall. Also we organized idea competition for B.Sc. Students total 70 students participated in the competition. In Innovation Lab we collected ideas from students and send to Rayat Shikshan Sanstha. "Ramp for Disabled Person in S.T. bus" was selected as best idea.

**Prof.Mrs.S.B.Mane**
**President**

## वाणिज्य विभाग

वाणिज्य विभागामध्ये सन २०१८-१९ मध्ये बी.कॉम.भाग १-२११, बी.कॉम.भाग २-१८०, बी.कॉम भाग ३-१३५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबर प्रक्टीकल ज्ञान मिळावे व अनेक करिअरचे मार्ग उपलब्ध आहेत ते प्राप्त करण्यासाठी बी.कॉम.भाग-१,२,३ मधील विद्यार्थ्यांसाठी सी.ए. व सी.पी.टी., IBPS, FALI, Office Automation, Business Etiquettes and soft skills, Certificate course in Tally आणि COC- Computer Accountancy Tally Package Course इत्यादी कोर्स राबवले जातात.

वाणिज्य विभागातर्फे Certificate Course in Tally and COC in Computer Accountancy Tally Package या दोन कोर्सेसच्या उद्घाटन कार्यक्रमाचे आयोजन केले गेले. दि. २९/०९/२०१८ रोजी वाणिज्य विभागातील प्रा.व्ही.एन.क्षीरसागर सर यांचा सेवानिवृत्ती सत्कार समारंभ आयोजित केला.

वाणिज्य विभागातर्फे यावर्षी ''ग्राहक जागरूकता व वित्तीय साक्षरता'', ''महिला सबलीकरण आणि सुरक्षितता'', ''बँकिंग क्षेत्रातील करियर संधी'', ''उद्योजकता विकास कार्यशाळा'', ''परफ्यूम मेकिंग प्रशिक्षण कार्यक्रम'' आणि "Food Festival" इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन केले.

**प्रा.एम.बी.शिकलगार**
**विभागप्रमुख**

## परीक्षा विभाग

सिनियर महाविद्यालयातील बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी./ बी.व्होक./बी.सी.ए. व एम.एस्सी. भाग १ व २ या वर्गाची पहिल्या सत्रातील विद्यापीठाच्या अभ्यासक्रमानुसार घटक चाचणी १ दिनांक ३०, ३१ जुलै व १ ऑगस्ट २०१८ व १७ ते १९ ऑक्टोबर रोजी घटक चाचणी २ ही परीक्षा २५ गुणाची घेण्यात आली. जून, जुलै व ऑगस्ट मध्ये झालेल्या अभ्यासक्रमावर विषयानुसार ५० गुणाची वेळापत्रकाप्रमाणे सकाळी ८.३० ते ९.३०, १० ते ११, १२ ते १ आणि १.३० ते २.३० या कालावधीत घेण्यात आली. दुसऱ्या सत्रात डिसेंबर व फेब्रुवारी महिन्यात घटक चाचणी ३ व चार घेण्यात आली. डिसेंबर व जानेवारी महिन्यात झालेल्या अभ्यासक्रमावर ५० गुणाची मिड टर्म परीक्षा घेण्यात आली. ही परीक्षा एकत्रित घेण्यात आल्यामुळे उत्तर पत्रिकेचे मूल्यमापन करून वाणिज्य विभागाकडून गुणपत्रके तयार करून घेतली. विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढावी व निकालामध्ये वाढ व्हावी यासाठी ही परीक्षा महत्त्वाची ठरली. विद्यापीठ परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी अंतर्गत भरारी पथक, ज्युनियर सुपरवायझर नॉनटीचिंग स्टाफ यांचे मोलाचे सहकार्य लाभले. चालू शैक्षणिक वर्षापासून महाविद्यालयीन पातळीवर पदवीदान प्रमाणपत्र समारंभ पार पडला.

**डॉ.ए.जे.बरकडे**
**चेअरमन**

## व्यवसाय अभ्यासक्रम विभाग

- व्यवसाय विभागातर्फे खालील उपक्रम राबवण्यात आले. 'सी.ए.फाऊंडेशन कोर्स, टॅली कोर्स, कंपनी सेक्रटरी कोर्स', दि. १९/८/२०१८ रोजी व्याख्यान वक्ते : श्री.सुरज राऊत यांनी दिले.
- विद्यार्थी कौशल्य विकास कार्यक्रम अंतर्गत दि. २१/९/२०१८ रोजी याविषयावर कार्यशाळा घेतली त्यात : १.फोटो ग्राफी २.चित्रकला ३.कोलाज ४.पाककला ५.सॅलेड अरेंजमेंट ६.केशरचना ७.मेहंदी ८.अकाशकंदील ९.मेणबत्ती १०.भेटकार्ड ११.वक्तृत्व स्पर्धा १२.निबंध स्पर्धा १३.सुंदर सही १४.सुंदर हस्ताक्षर या स्पर्धा घेण्यात आला याचा विद्यार्थी कौशल्य पारितोषिक वितरण समारंभ दि. १७/१०/२०१८



Scanned with CamScanner

रोजी मा.महेंद्र अवघडे, व्हाईस चेअरमन, प्राथमिक शिक्षक सहकारी बॅक लि. सातारा व मा.सौ.सोनाली पोळ, जिल्हा परिषद सदस्या, सातारा यांच्या उपस्थितीत घेण्यात आला. विद्यार्थी मार्गदर्शन कार्यशाळा दि. ०६/१२/२०१८ रोजी घेण्यात आली त्यात मा.एस.एम.धुमाळ, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, सातारा मा.सागर घोरपडे, श्री अॅग्रो ग्रुप ऑफ कंपनीज, पुणे यांनी मार्गदर्शन केले.

- दि. २१/१/२०१९ रोजी रयत शिक्षण संस्थेने केलेल्या पर्यवेक्षणात सदर विभागाला बी श्रेणी प्राप्त झाली.
- औद्योगिक व सहकारी संस्था भेटी, तज्ञ मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाचे आयोजन, शिकाऊ उमेदवारी योजना, ऑन दि जॉब ट्रेनिंग इत्यादींची अंमलबजावणी केली जाते.

**प्रा.बी.एन.नरळे**
विभागप्रमुख

## कॉम्प्युटर सायन्स विभाग

कॉम्प्युटर सायन्स विभाग B.Sc-I साठी १०९, B.Sc-II साठी ७१ व B.Sc-III १९ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.

१५ ऑगस्ट साठी ५ Poster १0 विद्यार्थी सहभागी झाले. तसेच ५ सप्टेंबर (Teachers Day) साठी ५ पोस्ट १0 विद्यार्थी सहभागी झाले, २२ सप्टेंबर (Karmver Jayanti) ४ पोस्टर ८ विद्यार्थी सहभागी झाले, १0 ऑक्टोबर (Rayat Shatabdi Mahotsav) १५ पोस्टर ३0 विद्यार्थी सहभागी झाले. २७ ऑक्टोबर Model Exhibution मध्ये ७ Model १४ विद्यार्थी सहभागी झाले. संगणक विभागातून विविध कार्यक्रमांमध्ये एकूण ७२ विद्यार्थी सहभागी झाले.

या शैक्षणिक वर्षात BSC-III साठी Project Development System या विषयावरती Guest Lecture दि. १९/0१/२०१९ रोजी आयोजित केले होते. या Guest Lecture च्या प्रसंगी प्रा.एस.एस.घाटगे यांचे स्वागत प्रा.रूपनवर व्ही.एस. यांनी केले व Resource Person यांनी Software निर्मिती हेतू आणि महत्त्व याबद्दल माहिती सांगितली.

कॉम्प्युटर सायन्स विभागातील BSc-II मधील विद्यार्थ्यांनी दि. २६/0१/२०१९ रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त whatsapp suicide game, The Road to Digital Litercy, Green Computing, Recycle of E-Waste India व After Demonitization विषयावरती भित्तिपत्रक प्रदर्शित केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.टी.जाधव व सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

कॉम्प्युटर सायन्स व BCA विभागातील दि. १५/0२/२०१९ रोजी One Day State level Seminar On "New Trends in computer & IT" (DCD QUEST-2019) चे आयोजन केले होते सदर कार्यक्रमांसाठी प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ.आर.जी.पवार, अध्यक्ष प्राचार्य डॉ.जाधव बी.टी.तसेच कॉम्प्युटर सायन्स व BCA विभागातील सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

या कार्यक्रमामध्ये कॉम्प्युटर सायन्स व BCA विभागातील विद्यार्थी तसेच बारामती, सातारा, कराड, शिरवळ आणि फलटण कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

BSc-I मधील विद्यार्थ्यांनी दि. २८/0२/२०१९ रोजी विज्ञान दिनानिमित्त Virtual Reality, Measures of Prevention Cyber, The path to a New Digital India, Negative effect of Video Games on Childrens व impact of GST विषयावरती भित्तीपत्रक प्रदर्शित केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य. Dr.Jadhav B.T. व सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

**प्रा.एस.व्ही कोळेकर**
विभागप्रमुख

## गुणवत्ता वाट प्रकल्प : कनिष्ठ विभाग

महाराष्ट्र राज्य शालेय शिक्षण व क्रिडा विभागाने नेमून दिलेल्या विषय निहाय कार्यभार सांभाळून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी व त्याने निवडलेल्या विषयामध्ये अधिक प्राविण्य मिळविण्यासाठी इ. ११वी व १२वी विज्ञान शाखेसाठी गुणवत्ता वाढ प्रकल्प महाविद्यालयात कार्यान्वित आहे.

सदर प्रकल्पाअंतर्गत प्रत्येक आठवड्यामध्ये प्रत्येक विषयासाठी एक जादा तास घेण्यात येतो. तसेच विषयनिहाय तज्ज्ञ मार्गदर्शकांची व्याख्याने उन्हाळी व दीपावली सुट्टीमध्ये जादा अध्यापनाचे (eo तासिकेचे) नियोजन केले होते. या प्रकल्पांअंतर्गत ओपन बुक टेस्ट, सी.ई.टी., नीट, जे.ई.ई. या परीक्षा घेण्यात आल्या. ताण तणाव विरहित अभ्यास, संशोधनाची आवड निर्माण व्हावी, तसेच सी.ई.टी. / नीट परीक्षांच्या बाबत तज्ञ मार्गदर्शकांची व्याख्याने आयोजित केली होती.

या प्रकल्पाअंतर्गत प्रत्येक आठवड्याला प्रत्येक विषयाची एक जादा तासिका घेण्यात येते, प्रत्येक विषयाचे तज्ञ मार्गदर्शकांची



Scanned with CamScanner

व्याख्याने, उन्हाळी सुट्टी व दीपावली सुट्टी मध्ये जादा ९० तासिकेचे नियोजन केले होते. त्याशिवाय गुणवत्ता वाढ प्रकल्पाअंतर्गत जादा परीक्षा घेण्यात आल्या. उदा.सरप्राईज टेस्ट, वस्तुनिष्ठ स्वरूपात परीक्षा, ओपन बुक टेस्ट इ.

एकंदरीत पाहता विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढ करणे हेच एकमेव ध्येय महाविद्यालयाचे आहे. यासाठी महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्य डॉ.बी.टी.जाधव, पर्यवेक्षक बी.एस्.खाडे यांचे मार्गदर्शन लाभले.

**प्रा.टी.एस.माने, प्रा.व्ही.एस.मस्के**
**प्रा.जी.बी.लोहार, प्रा.बी.एन.नरळे**
विभागप्रमुख

## विद्यार्थी समुपदेशन समिती

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले. दि. ७ जानेवारी रोजी आयोजित 'व्यक्तिमत्त्व विकास समुपदेशन' कार्यशाळेत शिवाजी कॉलेज, सातारा येथील प्रा.आनंद मारगम व दहिवडी येथील सामाजिक कार्यकर्त्या डॉ. भारती पोळ यांनी मार्गदर्शन केले १४८ विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेचा लाभ घेतला. दि. २५ फेब्रुवारी रोजी विद्यार्थी समुपदेशन समितीमार्फत 'विद्यार्थ्यांचे वर्तन' याविषयी एकदिवसीय कार्यशाळेत डॉ.सविता गिरे कला व वाणिज्य महाविद्यालय वडूज यांनी 'युवकांचे महाविद्यालयातील वर्तन' याविषयावर तर ह.भ.प.श्री.दादासाहेब नरळे यांनी 'युवकांचे समाजातील वर्तन', 'युवकांचे घरातील वर्तन' या विषयावर मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या पैलूंना स्पष्ट केले. या कार्यशाळेचा लाभ १५० विद्यार्थ्यांनी घेतला. समिती सदस्य प्रा.शिकलगार एम.बी. व अग्रणी कॉलेज समितीचे प्रमुख डॉ.खेत्रे एस.एम. यांचे सहकार्य लाभले.

**डॉ.के.एम.पवार**
चेअरमन

## वाङ्मय मंडळ

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ विद्यार्थ्यांच्या अभिरूचि, संवेदना व व्यावहारिकतेसाठी वाङ्मय मंडळामार्फत विविध कार्यक्रम आयोजित केले. वाङ्मय मंडळ उद्घाटन प्रसंगी मा.सचिन कुंभोजे कोल्हापूर, प्रा.शिवाजीराव यादव, माणदेश तरंग वाहिनी, म्हसवड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दि. ७ ऑगस्ट रोजी युवतींसाठी कौशल्य विकास मार्गदर्शन एकदिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. सौ.अंजोरी कुंभोजे, मा.सचिन कुंभोजे, व मा.सचिन मेनकुदळे यांनी तरूणींनी व्यावसायिक कौशल्य याविषयी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेचा लाभ ७१ विद्यार्थिनींनी घेतला. १७ डिसेंबर २०१८ रोजी आयोजित 'कथालेखन कौशल्य व कथाकथन' एकदिवसीय कार्यशाळेत माणदेशी कथाकार श्रीमती विजया वाघर, श्रीमती कांता भोसले, श्री.रवींद्र कोकरे, श्री.लक्ष्मण मोहिते व प्रा. शिवाजीराव यादव यांनी कथालेखन कौशल्य याविषयी मार्गदर्शन करून कथाकथन केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.बी.टी.जाधव हे होते. त्यांनी त्यांची 'मशाल' ही कथा ऐकवली. शुद्धलेखन स्पर्धेत व सुंदरलेखन स्पर्धेत महाविद्यालयातील ५८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कविता वाचन स्पर्धेत १८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्राध्यापकांनीही आपल्या कविता सादर केल्या. यावेळी उपप्राचार्य डॉ.बी.एस.बलवंत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. राजभाषा मराठी दिनाच्या कार्यक्रम प्रसंगी माणदेश तरंग वाहिनीच्या रेडिओजॉकी श्रीमती केराबाई सरगर यांनी मार्गदर्शन, अनुभव कथन करून माणदेशी कविता सादर केल्या.

**डॉ.के.एम.पवार**
चेअरमन

## विज्ञान मंडळ समिती

विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानातील विविध विषयांतील कुतुहल जागृत करणे व त्यांना विज्ञानातील विविध शोध व इतर माहिती देण्यासाठी विज्ञान मंडळ समिती कार्यरत आहे. विज्ञान मंडळाचे औपचारिक उद्घाटन दि. १७/०९/१८ रोजी प्रा.आर.एस.देशमुख, एस.जी.एम.कॉलेज कराड यांचे शुभहस्ते झाले. विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक शंकांचे निरसन करण्यासाठी 'Curiosity Box' ठेवण्यात आले व त्यामध्ये विद्यार्थ्यांनी त्यांचे वैज्ञानिक प्रश्न व शंकांसंबंधी स्लीप, प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी ते उघडण्यात आले. प्रत्येक विभागामार्फत त्यांच्या विषयांच्या संदर्भात व्हीडीओ फिल्म दाखवण्यात आली. विविध विषयातील तज्ञ प्राध्यापक बोलावून विद्यार्थ्यांसाठी त्यांचे मार्गदर्शनपर प्रबोधन करण्यात आले.

वनस्पतिशास्त्र विभागामध्ये Medicinal weeds, प्राणीशास्त्र विभागामार्फत पक्षांची शास्त्रीय माहिती दिली. वनस्पतिशास्त्र विभागामार्फत कोयनानगर, महाबळेश्वर, हर्णे, दापोली, रायगड इ.ठिकाणी शैक्षणिक सहल आयोजन प्रमुख विज्ञान मंडळ समिती: रसायनशास्त्र विभागाची अभ्यास सहल सिरम



Scanned with CamScanner

इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया, पुणे इथे आयोजित केला. २८ फेब्रुवारी २०१९ रोजी राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करणे.

प्रा.व्ही.व्ही.कांबळे
चेअरमन

## गुणवंत विद्यार्थी सत्कार समिती

सिनियर व ज्युनियर विभागातील मार्च/एप्रिल २०१८ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत प्रथम क्रमांकाने आलेल्या या वर्षी ८९ विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभाचे प्रमुख पाहुणे माजी प्राचार्य आर.डी.गायकवाड माजी सचिव रयत शिक्षण संस्था सातारा व माजी विद्यार्थी संघटनचे अध्यक्ष मा.नंदकुमार खोत यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. ज्युनियर विभागातील सीईटी, नीट व जेईई या परीक्षेत प्रथम क्रमांकाने येणाऱ्या विद्यार्थ्यांचा व सिनियर विभागातील बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी/ व बी.सी.ए. भाग-१,२ आणि ३ व एम.एस्सी. भाग-१ व २ या वर्गातील मार्च/एप्रिल २०१८ मध्ये विद्यापीठाने घेण्यात आलेल्या परीक्षेत वर्गात सर्वप्रथम आलेल्या विद्यार्थ्यांना रोख रक्कम, ट्रॉफी व प्रशस्ती पत्रक देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास माजी विद्यार्थी संघटनेने आर्थिक मदत केली.

महाविद्यालयात नेट/सेट परीक्षेत यश संपादन केलेल्या गुणवंत शिक्षकाचा सत्कार दिनांक २३/०८/२०१९ रोजी घेण्यात आला. या कार्यक्रमास विद्यार्थी, गावातील ग्रामस्थ, पालक व शिक्षक, शिक्षकेतर यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी समितीतील सर्व सदस्यांनी नियोजन करून काम पार पाडले.

डॉ.ए.जे.बरकडे
चेअरमन

## हजेरी समिती

सिनियर महाविद्यालयातील बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी./ बी.व्होक./बी.सी.ए. व एम.एस्सी. भाग १ व २ या वर्गाचे प्रवेश पूर्ण झाल्यानंतर महाविद्यालयातील ऑफिसच्या दृष्टीने महत्त्वाचे काम म्हणजे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना रोल नंबर देणे. प्रथम वर्षाच्या एकूण २५७२ विद्यार्थ्यांचे रोल कॉल तयार केले. रोल कॉल देताना विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार १ ते ५००, ५०१ ते १०००, १००१ ते १५०० असे रोल कॉल देण्यात आले. ते विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी नोटीस बोर्डवर लावण्यात आले. यानंतर मा.प्राचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली शाखानुसार व विषयानुसार विद्यापीठाच्या व शासनाच्या नियमानुसार तुकड्या तयार केल्या. तयार केलेल्या तुकड्यांना ३३ वर्ग शिक्षक देण्यात आले. या वर्ग शिक्षकांना रोल कॉल व हजेरी पुस्तके देण्यात आली. रोल कॉल मुळे ऑफिस, ग्रंथालय, स्कॉलरशीप विभाग, जिमखाना, एन.एस.एस. अकौंट विभाग विद्यार्थी दत्तक-पालक योजना व महाविद्यालयात परीक्षा घेण्याचे काम फार सोपे झाले.

डॉ.ए.जे.बरकडे
चेअरमन

## विद्यार्थी कल्याण व तक्रार निवारण समिती

सिनियर महाविद्यालयातील बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी./ बी.सी.ए. व एम.एस्सी. भाग १ व २ या वर्गातील पहिले सत्र व दुसऱ्या सत्रातील परीक्षेविषयी, निकालाबाबत, पात्रतेविषयी, एसटी पासबाबत व अभ्यासक्रमाबाबत इ. तक्रारी मा.प्राचार्य व उपप्राचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली तक्रारी सोडवण्यात आल्या.

डॉ.ए.जे.बरकडे
चेअरमन

## *Training Workshop on "Five Year Perspective Plan of University" Under Lead College Scheme and NSS*

Our College organized "One Day Training Workshop on "Five Year Perspective Plan of University" Under Lead College Scheme and NSS Sponsored by Shivaji University Kolhapur Tuesday, 12th June 2018.

Dr. S. M. Khetre (Coordinator) of the training workshop explained the theme of the workshop. Dr. B. S. Balwant vice principal of the college supported to students and teachers for survey. Hon.Principal Dr. B. T. Jadhav presides over the function and he was the chairperson for this function. Eight different colleges participate in the training workshop. Hon Principal Dr. B.T. Jadhav also inspires to the students and motivated them for survey of Five year 2019-2024 perspective plan of Shivaji University Kolhapur.

Dr. S. M. Khetre (Coordinator) of training workshop took training from Shivaji University



Scanned with CamScanner

Kolhapur on 11/6/2018 regarding Five year perspective plan 2019-2024. This survey was online mode. Therefore it is necessary to train the students who is actually doing the survey in various rural areas likes, Mhaswad, Dahiwadi, Vaduj, Khatav, Pusegaon, Phaltan...

35 students and 8 teachers from cluster lead colleges were participated in the training workshop. There were three technical sessions conducted by Dr. S. M. Khetre. He explained the Mobile app (SUK PP19) developed by Shivaji University Kolhapur for the survey of Five year perspective plan. There were 12 categories including Sudents, Parents, Employers, Industralist, NGO's, Principals, Teachers, Members, Alumini, Eminent Academicians, Administrative staff, Santha Secretary. Dr. S. M. Khetre trained the students on their mobile apps. Open play store-download apps-installed apps.

In last session Dr. S. Khetre personally took care of students for actually handling of mobile app (SUK PP19) and feeding the information.

Hon.Prin.Dr.B.T.Jadhav guided, motivated and inspired for making this prospective plan successful.

**Dr.S.M.Khetre**
**Coordinator**

## *One Day Industrial Visit Report*

Department of chemistry has organized 'One Day Industrial Visit' to Serum Institute of India Pvt,Ltd. [Cyrus Poonawala group] On Thursday, 20th December 2018. For this industrial visit we first took permission of Rayat Shikshan Sanstha then our Dr. S. M. Khetre organized all program to visit the industry.

Total 37 students and 7 staff members were present for this industrial visit. G.M.I. Santosh Lonkar guided to all students. We visited the cold room, then we see the physical inspection of vaccine.

Mr. Ashish Choudhary sir explained the entire process of liquid vaccine and its importance. Total 21 Serum products transported to near about 170 different countries.

Mr. Vishram Vaidya General Manager delivered a insightful lecture to the student. On 20th Dec. 2018 all the students and teachers reached at our college at 10.45 pm.

Prin.Dr.B.T.Jadhav Inspired Motivated, Guided Supported to make this industrial visit successful.

**Dr.S.M.Khetre**
**Head of the Department**

## *Rayat Inspire Camp (26-30 Nov .2018)*

Five days Rayat Inspire Camp 26-30 Nov 2018 for VII, VIII & IX student organized by Dahiwadi College Dahiwadi in association with Rayat Shikshan Sanstha Satara. 37 students from M.G. Highschool Dahiwadi, Parshuram Shinde Kanya Vidyalaya Dahiwadi, S. S. Vidhayalaya Pusegaon and five teachers were participated in the camp. Various activities were organized during the camp period like planetary lectures, Laboratory task, computer tasks, garden Visit etc. Students were prepared science based model. Highschool students were benefited through this camp.

Hon Prin. Dr. B.T. Jadhav motivated, guided and inspired for this camp. All Science faculty members were supported and guided to the students. Dr. S. M. Kherte worked as a coordinator of the five day camp.

**Dr. S. M. Khetre**
**Cordinator**

## प्लेसमेंट सेल

शै.वर्ष २०१८-१९मध्ये प्लेसमेंट सेलच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. १५ जुलै २०१८ रोजी महाविद्यालय आणि उद्योजकता, कौशल्यविकास व रोजगार मार्गदर्शन केंद्र सातारा यांचे संयुक्त विद्यमाने भव्य रोजगार



Scanned with CamScanner

मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये सातारा, पुणे आणि कोल्हापूर जिल्ह्यातील एकूण ३० कंपन्यांनी सहभाग घेतला. यावेळी एकूण ९८८ उमेदवारांनी नोकरीसाठी मुलाखती दिल्या तसेच २८९ विद्यार्थ्यांची प्राथमिक निवड करण्यात आली. एकूण ४२ उमेदवार अंतिम निवडीसाठी पात्र ठरले.

Tata Consultancy Services मार्फत दि.५ जानेवारी २०१९ रोजी घेण्यात आलेल्या 'An India Online Test' साठी महाविद्यालयातील २१६ विद्यार्थ्यांनी Online Registration केले. कोल्हापूर येथे झालेल्या या परीक्षेतून एकूण २० विद्यार्थ्यांची TCS मध्ये अंतिम निवड झाली.

याशिवाय TCS मार्फत जून २०१९मध्ये Campus to Corporate मोहिमेअंतर्गत होणाऱ्या मुलाखतीसाठीही २१० विद्यार्थ्यांनी प्रशिक्षणार्थी म्हणून नावनोंदणी केलेली आहे. सदर विद्यार्थ्यांना एकूण ७० तासांचे प्रशिक्षण दिले जात असून मुलाखतीसाठीची पूर्वतयारी करून घेतली जात आहे. याचाच एक भाग म्हणून दि. ६ फेब्रवारी २०१९ रोजी प्लेसमेंट सेलच्या वतीने Mock Interview चे आयोजन करण्यात आले होते. अंतिम वर्षाच्या एकूण ५२ विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला.

दि.२३ जानेवारी २०१९ रोजी प्लेसमेंट सेलच्या वतीने C.V. Writing व Interview Skills यावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये तज्ञ मार्गदर्शक म्हणून श्री.प्रशांत निंबाळकर उपस्थित होते. यावेळी Career Opportunities in Insurance याविषयी श्री.सुधाकर जाधव यांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेसाठी सर्व शाखांचे अंतिम वर्षाचे एकूण १३१ विद्यार्थी सहभागी झाले होते.

**डॉ.एन.डी.लोखंडे**
समन्वयक

## स्टाफ ॲकॅडमी व स्टाफ वेलफेअर समिती

महाविद्यालयातील स्टाफ ॲकॅडमी व स्टाफ वेलफेअर समितीमार्फत प्राध्यापकांसाठी मार्गदर्शक व्याख्यानांचे आयोजन केले जाते. या शैक्षणिक वर्षामध्ये प्रसिध्द मराठी लेखक राजन खान यांच्या व्याख्यानाने सर्वच प्राध्यापकांना वैचारिकदृष्ट्या समृध्द केले. दि.२२ डिसेंबर २०१८ रोजी राजन खान यांनी 'सुंदर जगण्यासाठी' या विषयावरील आपल्या दीर्घ व्याख्यानातून मानवी मूल्ये, धर्मनिरपेक्षता व संविधानाचे महत्व अधोरेखित केले आणि आदर्श माणूस होण्याची गरज विशद केली. तसेच स्टाफ व उद्योजकता विकास केंद्राच्या वतीने प्रसिध्द मराठी उद्योजक व लोधवडे गावचे सुपुत्र श्री.रामदास माने यांचे 'असा घडतो उद्योजक' या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याशिवाय मार्चच्या तिसऱ्या आठवड्यात प्रा.अमोल कोळेकर व श्री.संजीवकुमार शिंदे यांची अनुक्रमे Corporate Manners व कररचना या विषयांवरील व्याख्याने नियोजित आहेत.

स्टाफ वेलफेअर समितीतर्फे २६ जानेवारी २०१९ रोजी विविध क्षेत्रात यशस्वी झालेल्या सेवकांचा तसेच विवाह, वास्तुशांती व अपत्यप्राप्ती बद्दल सत्कार करण्यात आला.

**डॉ.एन.डी.लोखंडे**
समन्वयक

## वसतिगृह समिती

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये ८० विद्यार्थिनी वसतिगृहात प्रवेश घेतला आहे. विद्यार्थिनीच्या आरोग्याच्या दृष्टीने शनिवार दि. ११/०८/२०१८ रोजी हिमाग्लोबिन व इतर तपासणी करून घेतली. यावेळी शासकीय रूग्णालयाचे डॉ.खाडे, डॉ.जाधव व त्यांचा स्टाफ यांनी विद्यार्थिनींची तपासणी करून दिली.

महाविद्यालयातील मुलींचे वसतिगृहामध्ये रयत शिक्षक संस्था शताब्दी महोत्सवर्षानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन दि. ०७/१०/२०१८ रोजी केले. यामध्ये वक्तृत्व व रांगोळी स्पर्धा घेण्यात आल्या. प्रा.एस.डी.वाघमारे, प्रा.ए.आर.हुलवान, प्रा.पाटील, प्रा.सौ.सुप्रिया माने, प्रा.शेख, प्रा.माने यांनी परीक्षक म्हणून काम केले. त्याचबरोबर सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले.

सायंकाळी सात वाजता कर्मवीर पुतळा परिसरात प्रमुख पाहुण्या व वक्त्या मा.मुख्याध्यापिका सौ.इंद्रायणी मस्के यांनी व्याख्यान दिले. या कार्यक्रमाला विशेष उपस्थित असलेल्या मा.सौ.आर.पी.पवार यांनी 'रयत माऊली सौ.लक्ष्मीबाई पाटील यांचे सामाजिक योगदान' उलगडून दाखविले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षा मा.डॉ.किरण कारंडे यांनी अध्यक्ष पद भूषवून मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी समिती सदस्य व महिला प्राध्यापिकांनी सहकार्य केले. यावेळी बहुसंख्येने ग्रामस्थ प्राध्यापक व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

दि. ११ फेब्रुवारी २०१९ रोजी 'हॉस्टेल डे' निमित्ताने 'कथाकथन', संगीत खुर्ची व चमचा लिंबू स्पर्धा घेण्यात आल्या. 'ॲक्शन जॅक्शन' नक्कलांचा कार्यक्रम याबरोबर सांस्कृतिक कार्यक्रम यामध्ये गायन सामुहिक नृत्य, वैयक्तिक डान्स, लावणी



Scanned with CamScanner

अशा विविध कार्यक्रम घेण्यात आले. स्पर्धेतील विद्यार्थिनींना प्राचार्य डॉ.बी.टी.जाधव यांच्या हस्ते प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

वसतिगृहातील विद्यार्थिनींसाठी ब्युटीपार्लर कोर्स सुरू केला आहे. यामध्ये चाळीस विद्यार्थिनी सहभागी झाल्या आहेत. शैला दडस यांनी ब्युटी पार्लरचे प्रशिक्षण दिले. वसतिगृहात अभ्यास जेवण यासाठी स्वतंत्र खोल्या आहेत. सी.सी.टी.व्ही. कॅमेरे, ॲक्वागार्ड, सोलर बंब, सौर उर्जेद्वारे लाईटची सोय, मेस सुविधा, वॉचमन इत्यादी सुविधा आहेत.

**डॉ.एस.बी.वाघमोडे**
चेअरमन

## स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र

**स्पर्धा परीक्षा फाऊंडेशन कोर्स :**

रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर विद्याप्रबोधिनीच्या मार्गदर्शनानुसार महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रामार्फत राज्यसेवा, एम.पी.एस.सी., यु.पी.एस.सी. परीक्षा फाऊंडेशन कोर्स चांगल्या प्रकारे चालवला जातो. सन २०१८-१९ मध्ये या कोर्सला एकूण ९४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. या विद्यार्थ्यांसाठी लेखी तयारीसाठी सकाळच्या बॅचसाठी ८ ते ९.३० व दुपारच्या बॅचसाठी १ ते २.३० या वेळेत तास घेतले जातात. स्पर्धा-परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी फेब्रुवारी २०१९ अखेर २४ सराव परीक्षा घेण्यात आल्या आहेत. या विद्यार्थ्यांसाठी दर महिन्याला एकूण १२ मासिके, १० वर्तमानपत्रे तसेच इंटरनेटची सोय केली आहे. तसेच स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राची अभ्यासिका सकाळी ६ ते रात्री ११ पर्यंत उपलब्ध असते. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे स्वतंत्र ग्रंथालय असून यामध्ये १,५०,०००/- रुपये किंमतीची विविध स्पर्धा परीक्षांची पुस्तके व महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तके तसेच NCERT ची सर्व पुस्तके विद्यार्थ्यांना उपलब्ध केली आहे. सन २०१९मध्ये होणाऱ्या राज्यसेवा, PSI/STI/ASO, UPSC तसेच विविध सरळ सेवेसाठी विद्यार्थ्यांनी पूर्व व मुख्य परीक्षेसाठी फॉर्म भरले आहेत. या वर्षी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे कार्यशाळा, व्याख्याने घेण्यात आली आहेत ती यादी खालीलप्रमाणे.

दि.२७-०१-२०१८ रोजी मा.विशाल कदम यांची (Excise PSI) मध्ये निवड झाल्याबद्दल सत्कार व मार्गदर्शन घेण्यात आले.

दि.११-०७-२०१८ रोजी श्री.सचिन काटकर (PSI), श्री.अतुल मडके (PSI), श्री.नितीन नरळे (PSI), श्री.समाधान केंगार (PSI), तसेच कु.गौरी कट्टे (PSI) यांचे पालक श्री.तानाजी कट्टे उपस्थित होते. श्री.कृष्णा काटे (PSI), श्री.वैभव धनवडे (PSI) व कु.अमृता खाडे (PSI) या माण तालुक्यातील महाराष्ट्र लोकसेवा आयोग मध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

दि.०७-०९-२०१८ रोजी मा.सुशील यादव, मा.पी.डी.गोरे मा.संभाजी पाटील (निवृत्त उपप्राचार्य पोलीस सेंटर तुरची-तासगाव) यांच्या उपस्थितीत एकदिवसीय कार्यशाळा पार पडली.

दि.२७-१०-२०१८ रोजी मा.प्रतापराव भोसले (सहाय्यक संचालक लेखा व कोषागरे विभाग, मुंबई) यांचे व्याख्यान झाले.

दि.०५-१२-२०१८ रोजी मा.बापूराव दडस (DYSP) यांचा सत्कार व मार्गदर्शन घेण्यात आले.

दि.१०-१२-२०१८ रोजी मा.प्रविण इंगवले (IPS), मा.तुषार जाधव (IFS) यांचा सत्कार मा.सौ.साधना गुंडगे, नगराध्यक्षा-(दहिवडी नगरपंचायत) यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आला.

दि.२७ व २८ फेब्रु. व १ व २ मार्च २०१९ रोजी २४ मार्च २०१९ला झालेल्या (MPSC) संयुक्त परीक्षेसाठी लेक्चर सीरीजकरिता श्री.पी.डी.पाटील, सौ.माधवी शिंदे, श्री.महेश पाटील, श्री.बापूराव आडके, श्री.धुमाळ सर यांचे मार्गदर्शन लाभले.

**पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र :**

महाविद्यालयात पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र सुरु आहे. हा प्रशिक्षण कोर्स ४ महिन्यांचा असून या सन २०१८-१९ मध्ये प्रथम सत्रामध्ये १४ विद्यार्थी व द्वितीय सत्रामध्ये २५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. त्याचबरोबर दहिवडी कॉलेज दहिवडी व माणदेशी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मुलींसाठी मोफत पोलीस भरतीपूर्व मार्गदर्शन बॅच सुरु करण्यात आली आहे. या बॅचसाठी एकूण ६१ मुलींनी प्रवेश घेतला असून या मुलींना मोफत शारीरिक व लेखी परीक्षेची तयारी व एक वेळचा पौष्टिक अल्पोपहार दिला जातो. या विद्यार्थ्यांसाठी सकाळी ७.३० ते ९.३० या वेळेत मैदानी सराव करून घेतला जातो. तसेच दुपारी १२ ते २ या वेळेत लेखी परीक्षेची तयारी करून घेतली जाते. या विद्यार्थ्यांना खेळाचे ग्राऊंड तसेच प्रशस्त ग्रंथालय व अभ्यासिका उपलब्ध करून दिली



Scanned with CamScanner

आहे. या विद्यार्थ्यांसाठी गेस्ट लेक्चर्स व दर पंधरा दिवसातून सराव परीक्षा घेतली जाते.

**बँकिंग परीक्षा (IBPS) मार्गदर्शन केंद्र :**

